
# हाकारा



। वर्ष पहिले । अंक दुसरा । एप्रिल ते जून १९८० ।



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ


| | |
|---|---|
| अध्यक्ष | गं. बा. सरदार |
| उपाध्यक्ष | अनंतराव बोधनकर |
| | काळूराम दोधाडे |
| चिटणीस | रा. के. मुटाटकर |
| सहचिटणीस | जगदीश गोडबोले |
| | अनिल गोरे |
| खजीनदार | विजय भानू |
| सभासद | गोविंद गारे |
| | माधव कुलकर्णी |
| | अनंतराव पाटील |
| | जनार्दन वळवी |
| | शरद कुलकर्णी |
| | विल्किनसन |


## सल्लागार मंडळ


| | |
|---|---|
| बाबा आढाव | जयंत पाटील |
| बाबा आमटे | विजय परुळकर |
| रावसाहेब कसबे | अनुताई वाघ |
| सुधा काळदाते | विलास संगवे |
| विजय तेंडुलकर | वाहरू सोनवणे |
| वि. म. दांडेकर | गीता साने |
| चित्रा नाईक | छाया सुरतवंती |
| आ. ना. नारळकर | दत्ता सावळे |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता ।

# हाकारा



( महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक )

## अनुक्रमणिका


संपादकीय २

'अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा' – प्रा. गं. बा. सरदार यांच्या अध्यक्षीय भाषणातून ३

महाराष्ट्रातील आदिवासी – **अनिल गोरे** ५

**आदिवासी शिक्षण खास विभाग** ७

आदिवासी आता शिकू व बोलू लागला – **डॉ गोविंद गारे** ९

विकासवाडीचे विकसते कमळ – **अनुताई वाघ** १२

आदिवासी मुलांचे शिक्षण व आदिवासी भाषा – **गो. म. बोंबले** १५

आदिवासी शिक्षणाचे नियोजन – १९

शैक्षणिक मानवशास्त्र **रा. के. मुटाटकर** २२

आदिवासी शिक्षणाची पाहणी २४

चालतवडचे शैक्षणिक शिबिर २७

आश्रमीय शिक्षण–पद्धती : काही अपेक्षा – **जनार्दन पोह्न्या वळवी** २९

दिंडोरीचे प्रौढ शिक्षण शिबिर – **थियो रेमिडियोस** ३०

लोकविज्ञान ३१

जीवनोपयोगी वनस्पती – **डॉ. माधव गाडगीळ** ३२

'गोदड' (कविता) – **वाहरू सोनावणे** ३४

आदिवासी मतदारसंघातील मतदान प्रवाह ३६

पुस्तक परीक्षण – **ग्रंथप्रेमी** ४०

मुक्काम मार्गाची वाडी – **प्रदीप गायकवाड** ४१

संवाद : (वाचकांचा पत्रव्यवहार) ४४

मानव विज्ञान परिषद : चर्चासत्र ४७

विदर्भ आदिवासी साहित्य परिषद : एक प्रतिक्रिया – **डॉ. श. गो. देवगावकर** ४९

संस्था परिचय ५०


---


वर्ष पहिले, अंक दुसरा

एप्रिल–जून १९८०

वार्षिक वर्गणी : १२ रुपये

या अंकाची किंमत : ३ रुपये

पत्रव्यवहाराचा पत्ता :
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
द्वारा : मानवशास्त्र विभाग,
पुणे विद्यापीठ, पुणे ७

**कार्यकारी संपादक**
जगदीश गोडबोले

**संपादक मंडळ**
रा. के. मुटाटकर
शरद कुलकर्णी
भाऊ मांडवकर

प्रकाशक : प्रा. रा. के. मुटाटकर, सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांनी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यासाठी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून प्रसिद्ध केले.


मुखपृष्ठ व सजावट :
दिलीप भंडारे

# संपादकीय

'हाकारा'चा पहिला अंक जानेवारी महिन्यात प्रकाशित झाला. दलित–आदिवासींच्या समस्यांबद्दल डोळस जाणीव निर्माण व्हावी, त्या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा आपसात आणि इतरांशी संवाद घडावा यासाठी आम्ही हा 'हाकारा' घातला होता. आमचा 'हाकारा' रानावनात–गावकुसाच्या आत–बाहेर, हस्तीदंती मनोऱ्याच्या आरपार पोहोचतो की नाही याची आम्हाला उत्सुकता होती. थोडी धागधुगही होती; परंतु प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते, या प्रश्नांबद्दल आस्था असणारे असंख्य लोक, वृत्तपत्रे–मासिके यांनी आमच्या 'हाकाऱ्या'ला जो उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, त्यांनी आम्हाला दिलासा मिळाला. कारण दलित–आदिवासींच्या समस्यांच्या काटयाकुटयांतून, अनवट जंगलातून वाट शोधणाऱ्या मुशाफिराला आपल्या हाकाऱ्याला प्रतिसाद मिळण्यासारखे जगात दुसरे काही असू शकत नाही. आपल्यासारखेच वाट शोधणारे अनेक मुशाफीर आहेत. ही जाणीव उज्ज्वल उद्याकडे कूच करण्याची त्याची हिंमत वाढवते.

'हाकारा'च्या या जथ्यामध्ये प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी अक्षर–रूपाने सामील व्हावे अशी आमची मनापासूनची इच्छा आहे. प्रयत्न आहे. पण दुर्दैवाने अनुभव असा की, बहुसंख्य कार्यकर्त्यांना एकतर लिखाणाचे महत्त्व पटत नाही किंवा आपल्याला चांगलं लिहिता येत नाही, येणार नाही अशी भीती वाटत असते. निव्वळ घटा–पटाच्या चर्चेवर वा लिखाणावर आमचा पण विश्वास नाही. चार कपटे खरडून क्रांती होईल अशा भ्रमात आम्ही पण नाही; पण कृतीला विचाराची भक्कम बैठक हवी व त्यासाठी लिखाणाचे महत्त्व आम्ही मानतो. कारण एरवी मनात भरकटणाऱ्या विचारांना लिखाणाचे लगाम घातले की ते उगाच दिशाहीन भटकत नाहीत. चौखूर उधळत नाहीत व उधळले तरी त्यातले फोलपण चटकन् नजरेस येते असे आम्ही मानतो. शिवाय प्रत्यक्ष क्षेत्रात जिवंत आणि धगधगते अनुभव घेणाऱ्या कार्यकर्त्यांनी प्रस्थापित साहित्यगुणांची आणि बंधनांची फारशी फिकीर करू नये. त्यांच्या पायाखाली जळणारे आणि नजरेतून फुलणारे अंगार आकाशाच्या दिमाखदार नक्षत्रांपेक्षा जास्त जिवंत असतात, जवळचे असतात. आपला दाह, दु:ख, आशा–निराशा, आकांक्षा इतरांपर्यंत पोहोचविणे हे त्यांचं सामाजिक कर्तव्य असतं. वसंत बापटांच्या कवितेतील 'एक डोळा आणि एक डोळा' या द्विधा प्रवृत्तीची अनेक माणसं समाजात असतात. किंबहुना अनेकदा एकाच माणसात या दोन प्रवृत्तींची झुंज चालू असते. अशी माणसं या धगधगत्या अनुभवांनी आत–बाहेर उलथून जातात. समाजाला गोलपीठा नवीन नव्हता. आपलीच पापं झाकण्यासाठी समाजाने तो दूर अंधारात झाकून ठेवला होता इतकंच; पण नामदेव ढसाळांनी तो शब्दरूप केला आणि जातिवंत माणसाला जाणवला आपलाच बाजार–बसवेपणा ! वाहरू सोनवणेने टांगलेल्या 'गोदडी'त दिसली त्याला आपल्याच तथाकथित उच्चभ्रू संस्कृतीची–मूल्यांची लक्तरं !

समाजपरिवर्तनाच्या महायात्रेत कार्यकर्त्यांना आपल्याबरोबर आणखी चार लोकांना जोडून घ्यायचे आहे. धोरण आणि गरज म्हणून 'हाकारा' दूरवर फैलावायचा आहे. आपल्याच बंदिस्त चौकटीत रममाण झालेला समाजही हलेल. कार्यकर्त्यांचे विचार–अनुभव अस्सल असतील तर आणि ते लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कष्ट त्यांनी घेतले तर !



# ‘अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा–’

प्रा. गं. बा. सरदार

दलित साहित्याच्या चळवळीवर गेली दहा-बारा वर्षे बरेच बोलले जात आहे; उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. सर्वांचे लक्ष वेधून घेणारी जणू एक जोरदार लाटच दलित साहित्याच्या रूपाने मराठी वाङ्मयात आलेली आहे. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीमुळे दलित समाज खडबडून जागा झाला. पिढ्यान्‌पिढ्या हिरावून घेण्यात आलेल्या स्वतःच्या नैसर्गिक मानवी अधिकारांची त्याला जाणीव झाली अस्पृश्यता आणि सामाजिक विषमता ही ईश्वरदत्त किंवा निसर्गनिर्मित नसून ती मनुष्यकृत आहे हे दलितांना कळून चुकले आणि संघटितपणे झगडून, आपल्यावर होणाऱ्या या अन्यायाला व जुलमाला मूठमाती देण्याची त्यांनी उमेद बाळगली. स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेल्या दलित तरुणांना शैक्षणिक सवलतीमुळे आधुनिक शिक्षणाचा लाभ झाला. बाहेरच्या शहरी जगाशी त्यांचा संपर्क आला. सामाजिक न्याय, स्वातंत्र्य व समता या सर्वश्रेष्ठ मूल्यांचे महत्त्व त्यांना उमगले. आपला देश स्वतंत्र झाला तरी अजूनही दलितांचे दैन्य-दुःख संपले नाही; पिढ्यान्‌पिढ्या होत आलेले त्यांचे शोषण थांबले नाही. राजकीय सुधारणांच्या संदर्भात लोकमान्य टिळकांनी ‘उजाडले, पण सूर्य कोठे आहे?’ असा प्रश्न विचारला होता. स्वातंत्र्योत्तर काळातील भोवतालची परिस्थिती पाहताना या नवजागृत संवेदनशील दलित तरुणांनाही हाच प्रश्न सतावत आहे. स्वातंत्र्याचा प्रकाश आपल्या गरीब, अस्पृश्य बांधवांच्या झोपडीत का जाऊन पोचला नाही? त्यांचे सारे जग आजतागायत अंधारानेच ग्रासलेले आहे.

“ उठा तुमच्या जगावर सूर्य उगवला आहे  
त्यांना कोणी जागे केले  
आणि ते डोळे चोळीत उठले  
पाहू लागले उगवता सूर्य  
ते आश्चर्यचकित झाले  
त्यांना दिसत होता फक्त अंधार  
पूर्वीइतकाच भयानक. ”

हा उद्‌गार दलित साहित्यिकांच्या भ्रमनिरासाचा द्योतक आहे. डॉ. आंबेडकरांचे व्यक्तित्व, विचार आणि कार्य यांनी प्रभावित होऊन त्यांनी आपल्यातील न्यूनगंड, दुबळेपणा व लाचारी झटकून टाकली आणि ते संघर्षाच्या पवित्र्यात उभे राहिले. त्यांच्या या नव्या जाणिवांचे व युयुत्सू वृत्तीचे पडसाद त्यांच्या साहित्यात जागोजाग उमटले आहेत.

“ नरकाच्या कोंडवाड्यात  
किती दिवस राहायचं आम्ही ?  
श्वास घुटमळत !  
मुक्त छंदाच्या संजीवनीने  
आम्ही जिवंत झालो आहोत–  
–तुमच्या पापाचे छिनाल घट फोडण्यासाठी!  
–शब्द म्हणाले  
अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा.”

या दलित कवीच्या उक्तीतून त्याच्यातील नवजागृतीचे व नव्या जाणिवांचे दर्शन घडते.

सामाजिक जीवनाच्या हरएक क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडून येण्याची सर्वांत जास्त गरज दलितांना आहे. धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय अशा सर्वंकष क्रांतीची त्यांनाच खरी निकड आहे. शेकडो वर्षे त्यांच्यावर लादल्या गेलेल्या अस्पृश्यतेविरुद्ध, त्यांच्या मनुष्यत्वाची विटंबना करणाऱ्या परंपरेविरुद्ध त्यांच्या मनात विद्रोहाची भावना उद्‌भवली असली, तर ते स्वाभाविकच आहे. मात्र बाहेरच्या जगातील प्रतिगामी शक्तींविरुद्ध लढा देत असतानाच आपल्या स्वत:च्या अंत:करणातील पूर्वसंस्कारांविरुद्धही दलित साहित्यिकांना झगडावे लागत आहे. कोणताही क्रांतिकारक संघर्ष हा तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे ‘ रात्रंदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ’ असा दुहेरी स्वरूपाचा असतो. आपल्या स्वत:च्याच तीक्ष्णतर नखांनी आपले हृदय फाडून मी त्याचे चिवट दोर काढले आहेत; आणि—

“ गाठ मारुनी वैराची
गोफण केली छान
कठिण शब्द या धोंड्यांनी
करितों हाणाहाण !”

केशवसुतांच्या कवितेतील या वैराचीच सध्याच्या बदललेल्या परिस्थितीत दलित साहित्यातील विद्रोहात परिणती झाली आहे. कालमानानुसार ह्या विद्रोहाचा आशय काहीसा वेगळा आहे हे तर खरेच; परंतु शब्द हे शस्त्र म्हणून वापरणाऱ्या संघर्षप्रवण मराठी साहित्यिकांच्या वाङ्मयाशी त्याचे जवळचे नाते आहे .....


......दलित साहित्याने आपल्या विद्रोहाच्या स्फोटकतेतील सुप्त सामर्थ्य ओळखले आहे. या साहित्यात नवा प्रक्षोभक आशय आहे आणि त्याची तितकीच जोरदार अभिव्यक्ती आहे. शतकानुशतके अलक्षित व उपेक्षित राहिलेल्या आपल्या विदारक अनुभवविश्वाचा आविष्कार त्यांनी प्रभावीपणे मराठी साहित्यात आणला आहे. दलित साहित्याच्या सध्याच्या स्थितीत समाजपरिवर्तनाला उपकारक ठरणारी निषेधपरता व नकारप्रवृत्ती यांना प्राधान्य मिळाले तर ते स्वाभाविकच आहे. कारण कोणत्याही क्रांतिकारक साहित्याचा तो आवश्यक भाग असतो. जुन्या कालबाह्य झालेल्या परंपरेवर प्रहार केल्याखेरीज, तिच्यातील जीर्णांश निपटून काढल्याखेरीज परिवर्तन होत नाही; परंतु सामाजिक क्रांतीचे दुसरेही एक विधायक अंग असते, त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. जुने नष्ट करीत असतानाच त्याच्या जागी नवे कसे निर्माण करायचे याचाही विचार करावा लागतो. शिवाय नवे म्हटले तरी ते काही स्वयंभूप्रमाणे शून्यातून अस्तित्वात येत नाही. वास्तवाच्या आधारेच त्याची उभारणी होऊ शकते. जुन्याची पाळेमुळे वास्तवात इतकी खोलवर गेलेली असतात की, जुने नष्ट करताना वास्तवाची पुनर्घटना करण्याचा प्रश्न उपस्थित होतो. जुने कधीच एकदम नष्ट होत नाही; इतकेच नव्हे तर परिवर्तनाच्या प्रक्रियेमधून जुन्यातील सत्त्वांश नव्या चौकटीत, नव्या व्यवस्थेत अंतर्भूत होतो. जुन्यातील काही अंश जेव्हा नव्या व्यवस्थेचा घटक बनतो, तेव्हा त्याचे जुनेपण संपलेले असते. त्याचे स्वरूप बदलते; त्याला नवा अर्थ प्राप्त होतो. जीवनाच्या प्रत्यक्ष परिवर्तनामध्ये अशा प्रकारे सातत्य असतेच. ‘ जुने जाउं द्या मरणालागुनि ’ असे बजावणारे केशवसुतच ‘ जुन्यातून जी निष्पत्ति नवी, काय नव्हे ती श्रेयस्कारक ? ’ असे का म्हणतात ते समजून घ्यावयास हवे. हा केवळ भावनेचा प्रश्न नाही. भावनोत्कटतेची, प्रक्षोभाची तर गरज आहेच. परंतु त्याबरोबर सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप व प्रक्रियाही जाणून घ्यावयास हवी. त्यासाठी केवळ भारतीय समाजाच्या स्थितिगतीचेच नव्हे, तर जगात इतरत्र झालेल्या मुक्तिसंग्रामांचे व क्रांतिकारक आंदोलनांचे परिशीलन केले पाहिजे.

दलित साहित्याचा हा प्रारंभकाल आहे. त्याचा उत्तरोत्तर विकास होत जावा, ते अधिकाधिक कसदार व कलात्मक व्हावे म्हणून या नवोदित लेखकांना एक सूचना करावीशी वाटते. दलित साहित्याच्या मुळाशी जी बंडखोरपणाची प्रेरणा आहे ते त्याचे प्राणतत्त्वच आहे; पण फक्त तेवढ्यावर विसंबून राहणे हितावह होणार नाही. तत्त्वचिंतन, विद्याव्यासंग, तंत्रसाधना, भाषाप्रभुत्व या गोष्टींचीही दलित वाङ्मयाच्या प्रगतीला आवश्यकता आहे. त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात हशील नाही. आपले साहित्य ही एका मोठ्या व्यापक चळवळीची आघाडी आहे याचा दलित साहित्यिकांनी क्षणभरही स्वत:ला विसर पडू देता कामा नये. त्याची वाढ खुंटू नये, त्याचा प्रभाव कमी होऊ नये म्हणून त्यांनी सदैव जागरूक राहिले पाहिजे.

( बार्शी येथे संपन्न झालेल्या चौपन्नाव्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष श्री. गं. बा. सरदार यांच्या अध्यक्षीय भाषणातून )

# महाराष्ट्रातील आदिवासी

अनिल गोरे



महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या सुमारे ६ टक्के म्हणजे जवळपास ३० लाख लोक आदिवासी आहेत. आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्राचा क्रमांक भारतातील राज्यांमध्ये पाचवा लागतो. मध्यप्रदेश, ओरिसा, बिहार व गुजराथ या चार राज्यांतच महाराष्ट्रापेक्षा जास्त आदिवासी आहेत. भारतातील एकूण आदिवासींपैकी सुमारे ८ टक्के आदिवासी महाराष्ट्रात आहेत.

भौगोलिकदृष्टचा महाराष्ट्रातील आदिवासींची वस्ती मुख्यत: तीन विभागात आहे. महादेव कोळी, मल्हार कोळी, वारली ठाकर, कोकणा वगैरे जमाती सह्याद्री भागात आहेत. या भागात राज्यातील आदिवासींपैकी जवळपास निम्मे लोक आहेत. भिल्ल, गाबीत, कोरकू वगैरे जमाती सातपुडा भागात आहेत. त्यांचे प्रमाण सुमारे ३५ टक्के. उरलेले १५ टक्के आदिवासी म्हणजे गोंड, कोलाम वगैरे विदर्भात गोंडवन भागात आहेत. विदर्भात आणखी सुमारे ८ लक्ष आदिवासी आहेत; परंतु ते अधिकृत आदिवासी विभागाबाहेर रहातात म्हणून त्यांची गणती होत नाही.

जिल्हावार पाहता अकोला, बुलढाणा, भंडारा, वर्धा व नागपूर या जिल्ह्यांत आदिवासी जवळपास नाहीतच. सातारा, सांगली, कोल्हापूर, बीड, उस्मानाबाद यातील आदिवासींची संख्या नगण्य आहे. नांदेडमध्ये ५६,००० आंध व गोंड, परभणीमध्ये ४२,००० आंध, औरंगाबादमध्ये ३२,००० भिल्ल, रत्नागिरीमध्ये १०,००० कातकरी व सोलापूरमध्ये ८,००० पारधी आहेत. अन्य दहा महत्त्वाच्या जिल्ह्यांची माहिती सोबत तक्त्यामध्ये दिली आहे.

एकंदरीत पाहता आदिवासीवस्ती काही प्रमुख ठिकाणीच केंद्रित झालेली दिसते. ठाणे जिल्ह्यांतील तळासरी, जव्हार व मोखाडा, नाशिकमधील सुरगणा व पेठ आणि धुळचातील अक्राणी, अक्कलकुवा व नवापूर या आठ तालुक्यांतील ८०% वस्ती आदिवासी आहे. विदर्भातील आदिवासीसुद्धा फक्त सात तालुक्यांत आढळतात. मेलघाट ( जिल्हा अमरावती ), वणी, केलापूर, यवतमाळ ( जिल्हा यवतमाळ ), राजुरा, गढचिरोली व सिरोंचा ( जिल्हा चंद्रपूर ) हे ते तालुके होत.

दुबळा, पारधी वगैरे अपवाद वगळता, बहुतेक सर्व जमाती मुख्यत: ग्रामीण भागात आहेत. सुमारे ९६% आदिवासी खेडचांत आहेत. या आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार अत्यल्प आहे. १०% पेक्षा जास्त साक्षरता असलेले महादेव कोळी व गाबीत हे दोनच गट. स्त्रियांमध्ये ५% पेक्षा जास्त साक्षरता असलेली एकहि महत्त्वाची

जमात नाही. ठाकर, कोलाम, आंध यांच्या स्त्रियांमध्ये तर १% सुद्धा साक्षरांचे प्रमाण नाही.

बहुतेक सर्वांचा धर्म हिंदूच म्हणावा लागेल. जळगाव भागात काही मुस्लिम धर्मी भिल्ल आढळतात. ख्रिश्चनांचे प्रमाण नगण्य आहे.

आदिवासी बोलीभाषांची संख्या पाऊणशेच्या आसपास आहे; पण ७०% आदिवासी मराठी वा तिच्या उपभाषा बोलतात.

आदिवासींच्या प्रश्नाबाबत महाराष्ट्रातील चित्र भारतातील सर्वसाधारण परिस्थितीपेक्षा फारसे वेगळे नाही. बहुसंख्य आदिवासी छोटे शेतकरी वा शेतमजूर आहेत. त्यांची उत्पन्नाची साधने फार तुटपुंजी असल्याने राहणीमान खालावलेले आहे. मृत्यूचे प्रमाण हजारी ३० (इतर जनतेत हे हजारी १२ आहे) इतके जास्त. कारण पोटभर खायला मिळत नाही. रोगराईवर उपचाराची सोय नाही, भगत व जादूटोणा करणाऱ्यांचा पगडा इ. कर्जबाजारीपणा सर्वत्र आढळतो. व्यापारी व सावकार यांची पकड विलक्षण दिसते. व्यसनांचा पगडा, कर्ज काढून लग्न करण्याची पद्धत यामुळे सावकारी पाश घट्ट होतो. जमिनीचे हस्तांतर होते. जंगलातील परंपरागत वहिवाटी व अधिकार घटत जातात. सरकारी योजना व कायदे यांचा फायदा घेऊन आपला विकास घडवून आणण्याचेही त्राण राहात नाही.

आदिवासी प्रश्नांवर काम करण्याची महाराष्ट्रामध्ये मर्यादित स्वरूपाची परंपरा आहे. यात शिक्षण, आरोग्य या क्षेत्रात ख्रिस्ती मिशनरी मंडळींनी कार्याची सुरुवात केलेली दिसते. त्यानंतर भारतीयांनीही त्यांचे अनुकरण केले. खानदेशात काकासाहेब बर्वे व शंकरराव ठकार, ठाण्यात आचार्य भिसे, नाशिकमध्ये भाऊसाहेब हिरे, यवतमाळमध्ये ए. के. मोरे वगैरेंच्या संस्थांनी काही प्रमाणात या प्रश्नांना हात घातला.

राजकीय आघाडीवर १९४५–४६ साली गोदावरी परुळेकरांच्या नेतृत्वाखाली झालेली वारल्यांची चळवळ सर्वांना माहीत आहे. आजही ठाण्यात भूमिसेना व कष्टकरी संघटना, धुळ्यांत श्रमिक संघटना व ग्रामस्वराज्य समिती वगैरे गट आदिवासी दुःखांना विविध ठिकाणी वाचा फोडत आहेत. ❋


**महाराष्ट्रातील १० मोठे आदिवासी गट व त्यांची लोकसंख्या (लाखांत)**

| | |
|---|---|
| भिल्ल | ६·४१ |
| महादेव कोळी | ३·४० |
| गोंड | ३ १२ |
| वारली | २·९४ |
| कोकणा | २·६४ |
| ठाकर | १·८० |
| कातकरी | १·४७ |
| गावीत | १.२० |
| मल्हार कोळी | १·०० |
| आंध | ०·७६ |

**आदिवासी वस्तीचे प्रमुख जिल्हे व त्यातील जमाती**

| जिल्हा | संख्या | प्रमुख जमाती |
|---|---|---|
| ठाणे | ५·८० | वारली, महादेव कोळी, ठाकर, कोकणा, कातकरी |
| नाशिक | ५·६१ | भिल्ल, कोकणा, ठाकर वारली, महादेव कोळी |
| धुळे | ६·१५ | भिल्ल, गावीत, कोकणा धानका |
| जळगाव | १·२५ | भिल्ल, धानका |
| कुलाबा | १·१४ | कातकरी, ठाकर |
| अहमदनगर | १·४६ | भिल्ल, महादेव कोळी, ठाकर |
| पुणे | १·०८ | महादेव कोळी, ठाकर |
| अमरावती | ०·८० | कोरकू |
| यवतमाळ | १·९७ | गोंड, कोलाम, परधान |
| चंद्रपूर | २·३१ | गोंड, परधान |

# आदिवासी शिक्षण : खास विभाग



आदिवासी समाजातील दारिद्र्य, पिळवणूक, अंधश्रद्धा व संकुचित विश्व या समस्या सोडविण्यास शिक्षित आदिवासी हवेत, या भूमिकेतून औपचारिक शिक्षणपद्धतीचा प्रसार आदिवासी जगात करण्यात येत आहे; परंतु या शिक्षणातील आशय, शिक्षणाचे माध्यम, शिक्षक व पालकांची अनास्था, आर्थिक परिस्थिती इत्यादी अनेक कारणांमुळे आदिवासी समाजात शिक्षणाबद्दल उदासीनता आढळून येते.

आदिवासी शिक्षणविषयक वेगवेगळ्या पैलूंचे दर्शन घडविणारे लेख या खास विभागात समाविष्ट केले आहेत. शहादे-अक्राणी भागात दहावी परीक्षेत मराठी विषयात नापास होणाऱ्यांची संख्या मोठी आहे. आदिवासींना मराठी येत नाही, की आपल्या मराठीच्या कल्पना अवास्तव आहेत ? आदिवासींना बोलीभाषेतून शिक्षण द्यावे, की मराठीतून याबद्दल अनेक मतप्रवाह आहेत. श्री. बोंबले यांनी आपल्या लेखात त्याबाबत चर्चा केली आहे. महाराष्ट्रात माडियाव्यतिरिक्त इतर आदिवासी गटांच्या बोलीभाषा मराठीशी मिळत्या-जुळत्या आहेत. अनेक आदिवासी पुढाऱ्यांना इतर समाजाबरोबर येण्याची संधी मिळावी या भावनेतून शिक्षणाचा दर्जा नागर समाजातील दर्जाप्रमाणे असावा असे वाटते. त्यामुळे सर्व शिक्षक आदिवासी नसावे या कल्पनाही पुढे येतात. नांदेड जिल्ह्यात किनवट भागात इंग्रजी माध्यमाची शाळा आदिवासी भागात काढण्यात आली आहे.

शिक्षणामुळे मुले आपल्यापासून व संस्कृतीपासून दुरावतात असे बऱ्याच पालकांना वाटते. सुशिक्षित आदिवासी युवक आपल्या जमिनी सोडून नोकऱ्यांकडे व शहरांकडे धाव घेतात असा आरोप करण्यात येतो. श्रीमती अनुताई वाघ यांनी आदिवासी संस्कृतीशी मिळते-जुळते घेऊन शिक्षणाचे प्रयोग केले आहेत. त्याविषयी लेख या विभागात आहे.

एकशिक्षकी शाळा या 'पिशवी' शाळा झाल्या आहेत. इमारत असते, शिक्षक कोठे तरी असतात; परंतु विद्यार्थी शाळेत नसतात. शाळा ही गुरुजींच्या पिशवीत असते. आश्रमशाळा आदिवासी शिक्षणावर एकमेव तोडगा आहे असे मत बहुतेक सभा-संमेलनांतून मांडण्यात येते. विद्यार्थी व शिक्षकांनी एका ठिकाणी राहावे, अभ्यासाचे वातावरणात, स्वच्छ परिसर, सकस आहार, नियमित जीवन, शिक्षणाच्या सोयींनी उपलब्ध अशा आश्रमशाळांत शिक्षणाचा प्रसार अपेक्षित आहे. डॉ. शर्मा यांच्या लेखात याची चर्चा आहे.

आदिवासी शाळांत गळतीचे प्रमाण प्रचंड असल्याने मिळणारे शिक्षण वाया जाते. तसेच बहुतेक शिष्यवृत्त्या मॅट्रिकनंतर असतात. त्याचा काय उपयोग ? आदिवासी मुले पालकांना अर्थार्जनास हातभार लावतात. त्यामुळे पालक मुलांना शाळेत पाठविण्याबद्दल उदासीन असतात. विशेषत: मुलींच्या शिक्षणाची तर दैन्यावस्था आहे. प्रोत्साहन म्हणून दुपारचे जेवण, न्याहारी, दूध अशा अनेक योजना राबविल्या जात आहेत. मजुरीचा मोबदला म्हणून पालकांना कांही मदत मिळावी असेही एक मत विचार करण्यासारखे आहे. मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून मोठ्या प्रमाणावर बालवाड्या सुरू कराव्या अशी शिफारस आदिवासी प्रतिनिधींनी केलेली आहे.

अलीकडे सामाजिक जागृतीच्या माध्यमातून अनौपचारिक शिक्षण, प्रौढशिक्षण याबाबतचे प्रयोग चालू आहेत. श्री. थियो यांनी अशा प्रयोगांचा आढावा दिला आहे. डॉ. गोविंद गारे यांनी शिक्षणाच्या प्रसारामुळे होणाऱ्या आर्थिक विकासाची व निर्भयतेची उदाहरणे दिली आहेत.

आदिवासी शिक्षणाशी निगडित बऱ्याच प्रश्नांची चर्चा या विभागात केली आहे. त्यावर प्रतिक्रिया, जास्त माहिती व आपले अनुभव, आपली मते वाचकांनी जरूर कळवावी. —संपादक


'हाकारा'ला शुभेच्छा

# श्रीधर आणि कंपनी

कापडाचे व्यापारी

**माधवनगर ( जि. सांगली )**

# आदिवासी आता शिकू व बोलू लागला




**डॉ. गोविंद गारे**
[ संचालक : आदिवासी संशोधन संस्था ]

महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवर सातपुडा, तर पश्चिम किनाऱ्यालगतचा सह्याद्रि. या पर्वतांच्यामधील त्रिकोणी पठाराच्या मध्यावर पसरलेला बालाघाटाचा डोंगर. आदिवासींची वस्ती विखुरली आहे ती या पर्वतावरील डोंगरदऱ्यांतूनच. ठाणे जिल्ह्यात वारली, कातकरी, ठाकर, धुळे जिल्ह्यात भिल्ल, मावची, गावीत, कोकणा, नाशिक जिल्ह्यात महादेव कोळी, कोकणा, भिल्ल, यवतमाळ जिल्ह्यात कोलाम गोंड, अमरावती जिल्ह्यात कोरकू तर चंद्रपूर जिल्ह्यात गोंड माडिया अशा आदिवासींच्या विविध जमाती दीर्घ कालापासून या दऱ्याखोऱ्यांत नांदत आल्या आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील भामरागड भागातील आदिवासी अजूनही प्राचीन अवस्थेतच आहेत.

डोंगरदऱ्याखोऱ्यांतील सृष्टिसौंदर्य आदिवासींना मनमुराद लुटावयास मिळते; पण असे असूनही आदिवासी विभागात पाऊल टाकले; त्यांची घरे, राहणी, आहार पाहिला म्हणजे नजरेत भरते त्यांची निकृष्ट स्थिती आणि त्याच्या हालअपेष्टा. भात, नाचणी, वरी, सावा, कोदो, कुडकी तिखट आणि मीठ हेच त्यांचे अन्न. घरे झोपडीवजा. कपडे जेमतेम लाज झाकण्यापुरते !

पण शासन व समाज यांच्या प्रयत्नामुळे, विविध संस्थांच्या कार्यामुळे त्यांची स्थिती आता बदलत चालली आहे. कारण आदिवासींना हळूहळू जाग येत आहे. सारे जंगलच जागे होत आहे. आदिवासींतून नवा माणूस घडत आहे.

### जंगलचा वनवासी माणसात आला

गेली वीस वर्षे उभ्या महाराष्ट्रातील आदिवासींचे जीवन मी पाहात आहे. गोंड, माडिया, कोरकू कोलामपासून माझ्या शेजारी कातकरी, वारली, कोकणा आणि भिल्ल साऱ्यांचे जीवन जवळून पाहिले आहे, अनुभवले आहे. त्याच्या जीवनात काबाडकष्ट भरपूर आहेत. जीवनाची अशाश्वती आहे. अपार औदासीन्य पसरलेले आहे. दारिद्र्य आहे. तशी दिलदारीही आहे. मनात आणले तर आदिवासी कामाला कधी हटणार नाही. तो दिवसभर राबेल आणि रात्रभर नाचेल. तो नेहमीच मृत्यूच्या मांडीवर खेळत असतो. जंगली जनावरे, सर्व रोगराई व उपासमार ही त्याच्या जन्मापासूनच आलेली असतात. अशा आयुष्यातही तो तडफेने जगतो. काळचाकुट्ट रात्री हातात एक पेटते लाकूड घेऊन एकटा आदिवासी सरळ जंगलात घुसेल. कोणाला भिणार नाही. जंगलचा हवालदार आला, सावकार आला की मात्र त्याच्या मनात काहूर उठते. त्यामुळेच की काय, सावकार–कंत्राटदाराला देव मानून तो त्यांची जन्मभर सेवा करतो. पाठीचा कणा मोडेपर्यंत त्यांचे काम करतो. पोटाला घासभर अन्न नसेल, अंगावर वीतभर कपडा नसेल, पण तुम्ही मागाल ती गोष्ट सरळ सरळ तुम्हाला देण्याची दिलदारी त्याच्यापाशी आहे. असा हा निष्पाप, पापभीरू, जंगलचा वनवासी आता तुमच्यात येऊ पहात आहे. आपली जुनी परंपरा, संस्कृती, मागासलेपणा हळूहळू सोडून त्याच्यात तो नवेपणा ओतत आहे.

आदिवासी भागात दळणवळण वाढल्यामुळे परंपरागत नृत्य, गाणी यांचा पगडा कमी होत आहे व आदिवासी आता आधुनिकतेच्या जवळ येत चालला आहे. तारपा वाद्यांच्या तालावर जे गीत वारली आज गातो त्याचा विषय आधुनिक भासतो. प्राचीन गाणी लोपत आहेत. शिकलेली मुलेमुली त्यांच्या जुन्या पद्धतीप्रमाणे नाचावयास लाजतात. आजारी माणसावर उपचार करणाऱ्या "भगता"चे महत्त्व कमी होऊन दवाखान्याची गोडी आणि विश्वास त्यांच्यात वाढत आहे. ग्रामपंचायतीच्या स्थापनेनंतर गावाचा सर्व कारभार पंचायत पाहू लागली आहे. दिवसेंदिवस ग्रामपंचायतीचे महत्त्व वाढत आहे. जुन्या पंचायतीचे महत्त्व हळहळू कमी होत आहे. त्यांत जुन्या–नव्याचा संघर्षही होत आहे.

हे सारे नवचैतन्य त्यांच्या भेटीने आम्हाला कळले. जुनी पिढी सुधारत नसते. नवी पिढी सुधारावयास ती फक्त वाव देते. आदिवासींची अनेक मुले शाळांत जाऊ लागली आहेत. नीटनेटकी कपडे करू लागली आहेत. नाचगाण्याइतकीच शिकण्यातही रस घेऊ लागली आहेत व त्यायोगे जंगलाला जाग येऊ लागली आहे. आदिवासीला आपणही 'माणूस आहोत' याची जाणीव निर्माण होऊ लागली आहे. **आदिवासींच्या भेटीत त्यांच्या नृत्यांनी जेवढा आनंद दिला, त्याहूनही किती तरी जास्त आनंद आश्रमशाळेतील त्या तरतरीत मुलांच्या दर्शनाने आपल्याला मिळाला. रात्रभर चाललेल्या नृत्यापेक्षा आदिवासींच्या नव्या जीवनाची ही पहाट जास्त विलोभनीय वाटली. तिथल्या मुलांच्या चेहऱ्यांवर जी चमक होती ती पाहून आनंद झाला.** आदिवासी स्त्री–पुरुषांच्या चेहऱ्यांवर एक प्रकारचा भित्रटपणाचा भाव असतो. नवा माणूस दिसला की आदिवासी घाबरतो, बुजतो, चाचरतो, शक्यतो त्याला टाळू बघतो; पण आश्रमशाळेतील मुले हा भित्रटपणा टाकून पुढे गेली आहेत. ती धीटपणे तुमच्याशी बोलतील. सुधारणेचे खरेखुरे दर्शन व नव्या दमाचा नवा माणूस खऱ्या अर्थाने तुम्हाला तेथे दिसेल. आदिवासींमध्ये असलेल्या चांगल्या गोष्टींची जोपासना करून त्यांना नागरी संस्कृतीचे भय वाटणार नाही इतपत धीट करण्याचे कार्य आश्रम–शाळा करीत आहेत. त्यामधून मानाने जगणारा, ताठ मानेने उभा राहणारा उद्याचा नागरिक निर्माण होणार आहे.

नुकताच एका आदिवासी खेड्यातील सार्वजनिक कार्यक्रम पाहण्याचा योग आला. तेथे जे ऐकले, अनुभवले ते अजब होते, आश्चर्याचा धक्का देणारे होते. जेमतेम एक हजार वस्तीचे आदिवासी जमातीचे ते गाव. शिक्षणाने व विचाराने गाव इतके पुढे कसे गेले याचे मला आश्चर्य वाटले. स्त्री–पुरुषांतील शिस्त, स्वच्छता, भाषणे करण्याचा सभाधीटपणा, अवघड शब्दांचे शुद्ध व स्पष्ट उच्चार, गाण्यातील आशावाद आणि जीवनातील उभारी रोमांचित करणारी होती. संस्कृती व परंपरेच्या जाळ्यात अडकलेल्या आदिवासी जमाती शिक्षणाच्या सुधारणेच्या आशाआकांक्षेने एवढी प्रगती करू शकतात याचा अभिमान वाटला. महिलांनी केलेली भाषणे अप्रतिम होती. संतति–नियमन, बालसंगोपन व थोर देशभक्त यांवरील स्त्री-पुरुषांची वक्तव्ये हे सारे उद्याचा नवा आदिवासी माणूस, त्याचे नवे जीवन यांची स्पष्ट कल्पना देणारी होती.

## सारे जीवनच पालटले


सामुदायिक सहकारी शेती हा नवयुगातील एक आधुनिक प्रयोग महाराष्ट्रात यवतमाळ व कुलाबा जिल्ह्यात आदिवासींनी केला आहे. यवतमाळजवळ सालेभट्टी व भाडेवाडी व कुलाबा जिल्ह्यात कर्जत-खोपोलीजवळ या मंडळींनी आदिवासी वसाहती स्थापन केल्या आहेत. सहकारी पद्धतीने घरे बांधली आहेत. त्यांच्या सामाजिक शेती–संघटना स्थापन झाल्या आहेत. जंगलखात्याची जमीन या संस्थांना मिळाली आहे. सामुदायिक शेतीचा अवलंब करणाऱ्या या वसाहती पाहून नवा आशावाद निर्माण होतो. पूर्वी एका जमातीचे आदिवासी दुसऱ्या जमातीच्या आदिवासींबरोबर राहात नसत; पण या वसाहतींमधून परधान, गोंड, माडिया, कातकरी व ठाकर सर्वच एकत्र राहात आहेत. या वसाहतीवर विहिरी काढून इंजिने बसविण्यात आली आहेत. विहिरीनजीक हिवाळ्यात कोथिंबीर, मिरची व इतर काही भाजीपाला, गहू आणि शाळू ही सारी पिके सामायिक शेतीच्या मालकीची आहेत आणि सारे आदिवासी येथे गुण्यागोविंदाने राहतात व सारी शेतीची कामे आत्मीयतेने करतात. हे पाहिल्यावर आदिवासींमध्ये नवा मानव तयार होत असल्याची चाहूल लागते व उद्याच्या आशा तरळू लागतात.

ठाणे जिल्ह्यातील कोसबाड येथील शिक्षणसंस्थेत आदिवासींना शेती, आरोग्य, पशुपालन, कुटीरोद्योग इत्यादि बाबतीत सुधारलेल्या पद्धतीचा उपयोग करण्याकरिता शिक्षण देण्यात येते. कोसबाडजवळील आदिवासी शेतकऱ्यांची कमाल जमीनधारणा ५ एकरांपेक्षा कमी आहे. अशा पाच–दहा गावांतील आदिवासी शेतकऱ्यांना निवडून त्यांना विहिरी काढण्यास कोसबाड संस्थेतर्फे मदत करण्यात आली आहे. हे आदिवासी भात, भाजीपाला, फळांचे उत्पादन करतात. अगदी नव्या पद्धतीने. या कुटुंबातील माणसे चांगली भाजीपालायुक्त अन्न घेऊ लागली आहेत. त्या कुटुंबातील मुले शाळेत जाऊ लागली आहेत. आदिवासी समाजात या कुटुंबांना प्रतिष्ठाही प्राप्त झाली आहे त्यांच्यात व त्यांच्या आजूबाजूच्या आदिवासी कुटुंबात शेती–सुधारणेचा, शिक्षणाचा नवा विचार निर्माण झाला आहे परंपरागत शेती सोडून हा नवा आदिवासी सुधारणेच्या युगाचा फायदा घेऊन पुढे येत आहे. हा नवा बदल आदिवासींना पुढे पुढे नेणारा आहे.

नवापूर, अक्रणीमहाल, भामरागड, तलासरी, मोरवाडा येथील अनेक जंगलच्या वनवासींना भेटलो. नागरी संस्कृतीला टाळणाऱ्या आदिवासींना त्यांच्या घरी जाऊन भेटलो. त्यांच्या भेटीत कळलं की, आदिवासींना आपल्यासारखी नीटनेटके कपडे घालावयास लावणे, त्यांना एका जागी घरे बांधून राहावयास शिकविणे, शेतीत नवे प्रयोग करणे, मुलांना शाळेत पाठविणे, आपला शेती–माल योग्य भावाने आदिवासी महामंडळाला घालणे, खावटीकर्ज फेडणे वगैरे सुधारणा बऱ्याच आदिवासींत झालेल्या आहेत व होतही आहेत; परंतु अजूनही गावोगाव चारदोन शिकलेली तरुण मुले आमच्या येण्याचे कारण, आमच्या बोलण्याचा आशय समजून घेत व तेव्हा कुठे सांगत. ते विश्वासाने आमच्याजवळ येत. स्वतःची कहाणी सांगत. एका आदिवासी बहाबाला (म्हाताऱ्याला) विश्वासात घेऊन विचारले, 'काय बहाबा, दारू खुली केली सरकारनं, बरं झालं ना?' जरा जवळ येऊन बहाबा म्हणाला, 'नाही साहेबा, दारू बंदच चांगली हाय, तां खायला कितीस मिळत नहा. दारू खुली होती त्या वेळी खायला पुरेसे मिळत नव्हते. कपडे भेटत नव्हते व कामही करत नव्हतो. आता भरपूर काम करतो, चांगले कपडे घालतो, दोन वेळेस जेवावयास मिळते. माझी मुले दारू पीत नाहीत. त्यांनी शपथ घेतली आहे. आमचा गावही दारूतून मुक्त करण्याचा आमचा प्रयत्न चालू आहे.'


आदिवासींच्या काही जमातीत दारूला फार महत्त्व. जन्मल्याबरोबर मुलाच्या तोंडात दारूचे दोन थेंब टाकलेच पाहिजेत. मरतेवेळी तीर्थ म्हणून दारूचे थेंब टाकलेच पाहिजेत. लग्नप्रसंग असो, भांडणतंटे मिटविणे असो, साखरपुडा असो, वाटाघाटी असोत, एवढेच काय पण सामाजिक, धार्मिक कार्यात देखील दारू ही हवीच. असे असता, मला भेटलेला बहाबा (म्हातारा) व त्याचे गावात आधुनिकतेचा साक्षात्कार झाला. नवापुराहून ४–६ मैलांवरील गावाला भेट दिली. तेथे सुरबसिंग वळवींना भेटलो. हा गृहस्थ जेमतेम ९ वी, १० वी शिकलेला; पण त्याने आम्हाला आश्चर्याचा धक्का दिला. त्याची उत्कृष्ट बागायत शेती, ट्रॅक्टर, ऑइल इंजिन्स, बैलाच्या जोड्या आणि आधुनिक शेतीने प्रगत झालेला तो आदिवासी तरुण पाहून मनाला बरे वाटले. हिम्मत वाढली. आदिवासी नवतरुणांमध्ये ही जिद्द, चिकाटी पाहून मला धन्यता वाटली.

आदिवासींचे सारे जीवन आता बदलू पहात आहे. हळूहळ नवनिर्मितीची प्रक्रिया वाढत आहे. आदिवासी पूर्वीसारखे आता शेणगोळे राहिलेले नाहीत. त्यांना समजूत आली आहे व येत आहे. ठक्करबापांसारखी देवमाणसे आता मिळणार नाहीत; पण नवी असलेली माणसकी असलेली माणसे आदिवासी भागात जोपासली पाहिजेत. कारण आता आदिवासी–प्रदेशाला जाग येत आहे. त्यांच्यातूनच नव्या विचारांचा नवा माणूस घडू लागला आहे. या भोळ्याभाबड्या जीवाला, नृत्य-संगीताची सोयरीक बांधलेल्या या माणसाला, आपल्या जंगलवासीय बांधवाला, त्याच्या जीवनातील साऱ्या आनंदासह आपण नव्या जगात घेऊन येऊ आणि त्याला दाखवू की आता तुमची शोषणमुक्ती संपली आहे. आता तुला भ्यायचे कारण नाही. तुझ्यातून निर्माण होणारा नवा मानव तुमचा सारा चेहरा–मोहरा बदलून टाकील.



# विकासवाडीचे विकसते कमळ

अनुताई वाघ



श्रीमती ताराबाई मोडक यांनी १९४५ साली ठाणे जिल्ह्यातील बोर्डी येथे प्रथम ग्रामीण बालवाडी सुरू केली. तेव्हापासून मी त्यांच्याबरोबर आहे. बोर्डी हे गाव समुद्रकिनारी आहे. शांत, सुंदर असा परिसर, सुसंस्कृत ग्रामस्थ आणि ऋषितुल्य आचार्य भिसेगुरुजी, चित्रेगुरुजी यांचे सत्प्रवृत्त करणारे कणखर वैचारिक प्रभुत्व, यामुळे बोर्डी गावाची मानसिक भूमी नव्या चांगल्या कामाचे सतत स्वागतच करीत असते.

ताराबाईंच्या बोर्डीच्या बालवाडीसही असेच ग्रामस्थांकडून सहकार्य मिळाले; पण खेडेगावात, कमी खर्चात परिसरातील वस्तूंच्या सहाय्याने बालमंदिर चालविण्याचा हा त्यांचा प्रयोग होता. त्यामध्ये अनेक अपेक्षित व अनपेक्षित अडचणी आल्या. लहानशा गावात हरिजनवाडा पण आहे. तेथे बुरुडकाम चालते. पुरुषमंडळी बहुधा मुंबईस कामाला जातात. बायकामंडळी चिकूसाठी करंडे, टोपल्या, सुपे वगैरे विणण्याचे काम करतात. बालवाडीला लागूनच ही वस्ती असल्यामुळे हरिजनांची मुले बालवाडीत मोठ्या संख्येने येत होती; म्हणूनच गावातील सवर्णांची मुले येत नव्हती. त्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागले. प्रत्येक घरी जाऊन समजावले. गावात निरनिराळ्या गल्लीतून एखाद्याच्या प्रशस्त ओटीवर, त्या विभागापुरती मुले गोळा करून गाणी–गोष्टी घेतल्या. या आमच्या प्रचारवाड्या. त्यामुळे गावातील मंडळींना बालवाडीचे महत्त्व पटले. मग गावाच्या मध्यवर्ती जागेत एक सात दिवसांचे बालशिक्षण-नगर भरविले. मुलांनी बालवाडीत खेळायचे. पालकांनी लांब उभे राहून पहायचे अशी व्यवस्था होती. गावातील व हरिजनवाड्यातील मुले एकत्र खेळतील, बसतील, खातील, पितील यासाठी वरीलप्रमाणे अनेक प्रयत्न झाले आणि सात आठ वर्षांत आम्हाला यश आले.

खेडेगावात बालवाडी कशी चालवावी, हे एक खास काम घेऊन श्रीमती ताराबाई बोर्डीस आल्या; पण तेथे एका कामातून दुसरे काम निघत गेले. एका समस्येतून दुसरी समस्या निघत गेली आणि त्याची पूर्ती करता करता आजची विकासवाडी विकसली आहे. विकसते आहे. म्हणूनच ग्रामीण शिक्षण — सरोवरातील विकासवाडी हे हळूहळू एकेका पाकळीने उमलत जाणारे कमळ आहे असे मी मानते.

बोर्डीला गावातील सर्व जातीजमातींची व समाजातील सर्व थरांतील बालके बालवाडीत येऊ लागली. यशाचा हा पहिला टप्पा होता; पण यात अजून एक उणीव होती. जवळपास आदिवासींची वस्ती होती. आदिवासी गावात निरनिराळ्या कामांसाठी येत असत. त्यांची मुलेही पुष्कळदा गावात येत असत. 'बालवाडीत मुले पाठवा' म्हटले तर 'का नाही, जरूर पाठवू' असे म्हणत. मुले बालवाडीत येतातच असा त्याचा भावार्थ होता; पण प्रत्यक्षात मात्र मुले आली नाहीत. मग आम्ही त्यांच्या वस्तीत

जायला सुरुवात केली. ही आमची 'अंगणवाडी' एक पाकळी उमलली. आदिवासींच्या वस्तीत एखाद्या मोठ्या झाडाखाली आम्ही मुले गोळा करीत असू. गाणी, गोष्टी, खेळ, थोडा हस्तव्यवसाय, लहानशा सहली इ. कार्यक्रम तेथे होत असत. स्वच्छता सर्वप्रथम व्हायची. पाण्याची अडचण. मग आम्ही मुलांची अंगे ओल्या रुमालाने पुसून घेत असू. खरजेवर कडुलिंबाचा पाला वाटून लावायचा. कधी कधी त्यातल्या त्यात जवळपासच्या विहिरीवर नेऊन मुलांना आंघोळी पण घालायच्या.

या आमच्या अंगणवाडीमुळे आम्हाला खूप नवे शिकायला मिळाले. आदिवासी मुले बालवाडीत येत नाहीत. कारण (१) त्यांना त्यांची लहान भावंडे सांभाळण्यासाठी घरी राहावे लागते. (२) त्यांना गुरे चारण्यासाठी जावे लागते. (३) थोड्याशा कमाईसाठी देखील त्यांना कामाच्या पाठीमागे धावावे लागते. ही त्यांची परिस्थिती लक्षात घेऊन योग्य अशी शाळा असायला हवी. यावर श्रीमती ताराबाईंनी चिंतन केले व अशी नवी शाळा – म्हणजेच 'विकासवाडी' स्थापन केली. येथे तान्ह्या बाळांसाठी पाळणाघर, मधल्या मुलांसाठी बालवाडी, मोठ्या मुलांसाठी प्राथमिक शाळा असे तिन्ही विभाग एकत्र चालतात. 'विकासवाडीची' ही आणखी एक पाकळी उमलली. अंगणवाडी चालविताना आणखीही काही गोष्टी आमच्या लक्षात आल्या. आदिवासी लोक कष्टाळू आहेत. प्रामाणिक आहेत. त्यांना संस्कृती आहे. अनेक वर्षं डोंगरकपारीत राहिल्यामुळे ही मंडळी सुधारित जगापासून दूर राहिली आहेत, म्हणून त्यांची अस्मिता निद्रिस्त राहिली आहे.

**आदिवासी मुले ही बुद्धिमान, चपळ, काटक आणि प्रसंगास तोंड देणारी आहेत त्यांचे डोळे तीक्ष्ण आहेत. नेम अचूक आहेत. विनोदवृत्ती, नृत्य आणि अभिनयकला त्यांच्यात भरपूर आहे. आदिवासींतील मंदबुद्धी अगर प्रश्नार्थी असे एकही मूल मला या वीस वर्षांत अजून आढळले नाही. खाणीत पडलेल्या या हिऱ्यांना वेचले पाहिजे. पैलू पाडले पाहिजेत. आमच्या भारताची ही चमकणारी रत्ने आहेत.**

बोर्डीलाच १९५४ साली आम्ही एक लहानशी प्रयोगात्मक विकासवाडी चालविली. ती लोकांना आवडली. 'सर्व भारतभर आदिवासी बालकांच्या शिक्षणाबाबत हीच समस्या आहे. तरी हा प्रयोग तुम्ही करा' असा श्रीमती ताराबाईंना मंडळी आग्रह करू लागली, म्हणून मग जरा मोठ्या प्रमाणावर 'विकासवाडी' योजना त्यांनी तयार केली. विकासवाडी कमळाची ही आणखी एक पाकळी उमलली.

विकासवाडी योजनेमध्ये पाळणाघर, बालवाडी व प्राथमिक शाळा, खालचे वर्ग मिळून एकत्र चालणारी विकासवाडी. हे विकासवाडीचे तंत्र समजून घेऊन त्या यशस्वीपणे चालविण्यासाठी शिक्षण हवे म्हणून प्राथमिक शिक्षक ट्रेनिंग कॉलेज इतक्या गोष्टींचा अंतर्भाव होतो.

विकासवाडी योजनेद्वारा आदिवासी शाळांच्या शिक्षणाची समस्या सोडवावयाची होती म्हणून जेथे आदिवासींची भरपूर वस्ती आहे, अशा ठिकाणी काम करावे असे श्रीमती ताराबाईंनी ठरविले. श्री. हरिश्चंद्र पाटील (माजी कुलगुरु, राहुरी कृषी विद्यापीठ) यांनी कोसबाडला आग्रहाने बोलाविले आणि १९५७ साली बोर्डीची संस्था कोसबाडला आली. त्या वेळी समस्या होती–(१) आदिवासी मुले शाळेत नियमितपणे येती कशी होतील ? (२) ती शिकती कशी होतील ? (३) कोणत्या प्रकारचे शिक्षण त्यांच्या जीवनास उपयोगी पडेल ? या तीनही समस्या सोडविताना तेथे विकासवाडी—कमळाच्या आणखी पाकळ्या उमलल्या.

मुलांना गुरे चारायला न्यावे लागते म्हणून तेथे कुरणात शिक्षकांनी जायचे. तेथे भुरभुरत्या पावसात, झाडांच्या छायेखाली शाळा भरवायची. गुरे इकडे तिकडे चरत असतात. मुलांची तिरपी नजर त्यांच्याकडे असते. तेथे या कुरणात गुरुजी मुलांचा गोष्टी, नाटके, अभिनयगीते, गप्पा-गोष्टी इत्यादिद्वारा भाषा, विज्ञान, भूगोल, आरोग्य, नागरिक–शास्त्र इत्यादि विषयांमध्ये प्रवेश करून देतात. पाने, फुले, पिसे, काटक्या, अंडी, शंख, शिंपले आदिद्वारा गणित होते. निसर्गात विपुल शैक्षणिक साधने लपली आहेत. विनामूल्य मिळतात फक्त आमची दृष्टी हवी. तेव्हा अशी ही 'कुरणशाळा' ही एक नवी पाकळी उमलली.

मुलांना काम करावे लागे म्हणून शाळेस जोडून छोटे छोटे व्यवसाय सुरू करण्यात आले. 'बालउद्योगालय' ही एक आणखी पाकळी उमलली. इतके करूनही कित्येक मुले शाळेत येत नाहीत त्यांच्यासाठी 'रात्रीची शाळा' ही आणखी एक नवी पाकळी उमलली. मुली शाळेत येत नव्हत्या त्यासाठी स्त्री-शिक्षिका नेमल्या. अनेक खटपटी करून मुलांना शाळेत आणले तरी त्यांचे शिकण्याकडे लक्ष लागत नव्हते. त्यासाठी अध्यापनपद्धतीत फरक केले. आदिवासी जीवनातून त्यांच्या परिसरात घडणाऱ्या घटना

लक्षात घेऊन निरनिराळ्या विषयांची मांडणी करणे, वाचन, धडे, उदाहरणे, गाणी, गोष्टी, गप्पागोष्टी या सर्वांमध्ये त्यांच्या जीवनाची संगती लावणे याकडे कटाक्ष होता. ही मुले रानात भटकतात तर 'भटका' पण ती वस्तू शाळेत घेऊन या असे सांगितले. एक छान वस्तुसंग्रहालय तयार झाले. या संग्रहालयात मारलेले साप, मुंग्यांचं वारूळ, माणसाची कवटी, माशाचा दात, शेंगा, बिया, घरटी, पिसे अशा अनेक वस्तू आहेत. या वस्तूंवरूनच गप्पागोष्टी, उदाहरणे, चित्रकला, वाचन, धडे, असे अनेक विषय घेतले जातात. स्वाभाविकपणे मुलांचे लक्ष विषयाकडे लागते आता वीस वर्षांनंतर इतकी खटपट करावी लागत नाही कारण ऐकणे, लक्षात ठेवणे व पुन: प्रकट करणे या गोष्टींची आता मुलांना सवय लागली आहे. वीस वर्षांपूर्वी तशी सवय मुळीच नव्हती. तेव्हा वस्तुसंग्रहालय हाही एक विकासवाडीचा महत्त्वाचा भाग आहे

पाड्यापाड्यावर जाऊन मुलांचे रंजन करणे, पालकांना वेळोवेळी शाळेत बोलावणे, पावसाळ्याशिवाय इतर वेळी जवळ जवळच्या पाड्यावरून अंगणवाड्या चालविणे वगैरे कार्यक्रमामुळे मनी धरलेला हेतू बराच सिद्ध होत होता. आता २० वर्षांनंतर प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली मध्ये ५ ते ६ वर्षे वयाची ४०–४५ मुले नेहमी उपस्थित असतात. म्हणून ४ थीपर्यंत सरळ जातात. फारच कमी गळती होते. इ. ५ वीपासून पुनः गळती होण्यास सुरुवात होते. कारण आता १०-१२ वर्षे वयाची मुले पालकांना घरकामाला अगर थोडी कमाई करायला हवी असतात. शिवाय इयत्ता ७ वीपर्यंतचे सध्याचे पुस्तकी शिक्षण घेऊन पुढे मुलांना भवितव्य काय? सगळ्यांना ८ वींत जाता यावयाचे नाही आणि हा शाळेत शिकलेला मुलगा शेणात हात घालायचा नाही. पालकांच्या या समस्या काही अंशाने सोडविण्यासाठी प्राथमिक शाळेच्या इ. ५ वी ते ७ वी इयत्तामधून 'कार्यानुभव प्रकल्प' सुरू केला आहे. विकासवाडीची ही आणखी एक पाकळी उमलली आहे. सुतारकाम, लेथवर्क, शिवण काम व शेतीकाम असे व्यवसाय जोडलेले आहेत. शाळेव्यतिरिक्त रोज दोन तास मुलांनी काम करावयाचे आहे. कच्च्या मालाचा खर्च वजा जाता उरलेली रक्कम शिष्यवृत्ती म्हणून मुलांना मिळते,

या नवीन उपक्रमामुळे (१) तीन वर्षे एक व्यवसाय प्रत्यक्ष हातून गेल्यामुळे मुलांच्या हातात काही कौशल्य येते. (२) आत्मविश्वास वाढतो. (३) श्रमप्रतिष्ठा वाढते. (४) थोड्याशा का होईना शिष्यवृत्तीमुळे पाट्या पेन्सिली, पुस्तके, वह्या व गणवेश यांचा प्रश्न सुटतो. गेली तीन वर्षे ५ ते ७ इयत्तामध्ये गळती नाही.

अनेक उपायांनी साक्षर झालेल्या मंडळींची साक्षरता टिकून राहावी म्हणून कित्येक अडचणींना तोंड देत देत संस्थेने एक छापखाना चालविला आहे. श्रीमती ताराबाईंची ही अंतिम इच्छा होती. या छापखान्यात शिकलेली आदिवासी मुलेच काम करीत आहेत. त्यात तीन मुली आहेत. जुळवणे, छापणे कापणे, बांधणी करणे वगैरे सगळी कामे ही मंडळी कसतात तेव्हा हा 'छापखाना' म्हणजे कमळाच्या कळ्यातील एक पाकळी' आहे. आणि आता नुकतीच एक उमललेली एक पाकळी म्हणजे 'डोंगरीपाडा' येथील विकासवाडी. ही अगदी आदिवासी वस्तीत आहे. कुडाच्या झोपडीत पाळणाघर, बालवाडी व प्राथमिक शाळेची १ ली व २ री इयत्ता आहे. ही झोपडी बांधण्यासाठी जमीन आदिवासी ग्रामस्थांनी दिली आहे व स्वत: देखरेख करून झोपडी बांधून घेतली आहे. झोपडीचे बरेचसे सामान जिल्हा परिषदेने दिलेले आहे.

या विकासवाडीची प्रमुख शिक्षिका आदिवासीच आहे ती कोसबाडच्या आमच्या बालवाडीत, नंतर रात्रीच्या शाळेत व नंतर बालसेविका प्रशिक्षण वर्गात शिकून तयार झाली आहे. अशा आणखी तिघी तयार झाल्या असून त्या स्वतंत्रपणे बालवाड्या चालवीत आहेत.

एक समस्या सुटत असताना दुसरी उभी राहते. एक काम वाढते. पुन्हा नवी समस्या उभी. ती आणखी एका समस्येस उभी करून सुटते. अशा रीतीने विकासवाडीचे काम वाढत आहे. आज कोसबाडला आमच्या संस्थेच्या ११ बालवाड्या, तीन पाळणाघरे, एक पूर्वप्राथमिक शाळा, ट्रेनिंग कॉलेज, बालसेविका प्रशिक्षण वर्ग, तीन किसान शाळा, एक बाल उद्योगालय, कार्यानुभव प्रकल्प आदि शिक्षणविभाग चालू आहेत.

विकासवाडीचे हे कमळ फुलविण्यात कै. पूज्य ताराबाईंचे प्रेरक विचार, चिंतन, जिद्द व खंबीर प्रयत्न कारण आहेत. त्याबरोबरच त्यांच्या सुदैवाने त्यांचे विचार समजून घेऊन निष्ठेने काम करणारे तज्ज्ञ कार्यकर्ते त्यांना लाभले आहेत.

# आदिवासी मुलांचे शिक्षण व आदिवासी भाषा



**गो. म. बोंबले**

[ संचालक, शिक्षणशास्त्र संस्था, पुणे-३०. ]

१९७१ च्या जनगणनेप्रमाणे देशामधील आदिवासींची एकूण संख्या ३ कोटी ऐंशी लक्ष होती. ही एकूण लोकसंख्येच्या ६·९ टक्के भरते. मात्र देशांतील सर्व शैक्षणिक संस्थांतून त्या वेळी केवळ ४·१ टक्के आदिवासी विद्यार्थी शिकत होते. योग्य त्या प्रमाणात आदिवासींच्या शिक्षणाकडे लक्ष दिले गेले नाही हे यावरून स्पष्ट दिसते आदिवासी समाज केवळ शिक्षणाच्या बाबतीतच नव्हे, तर जीवनाच्या जवळजवळ इतर सर्व बाबतीत असाच मागे पडल्याचे आपणास दिसून येईल महाराष्ट्र राज्यातील परिस्थितीही थोड्याफार फरकाने अशीच आढळते. आपल्या राज्यात आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ५·९५ टक्के आहे. शासनाने आता आदिवासी क्षेत्रासाठी 'आदिवासी उपयोजना क्षेत्रे' जाहीर करून आदिवासी क्षेत्रात विकासाच्या अनेक योजना हाती घेतल्या आहेत. अर्थात त्याचे फलित मिळायला थोडा अवधी लागणार आहे. या क्षेत्रामध्ये राज्यातील १३ जिल्ह्यांची ६,४२६ खेडी आणि १४ शहरे मोडतात. या क्षेत्रात शिक्षणाचा जलद गतीने प्रसार व्हावा यासाठीही काही योजना हाती घेण्यात आल्या आहेत.

## भाषा हा शिक्षणाचा पाया

बालकांना मातृभाषेतून शिक्षण मिळणे अगत्याचे आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३५० अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व अल्पसंख्याक समूहांच्या मुलांमुलींना प्राथमिक शिक्षण त्यांच्या मातृभाषेतून मिळायले हवे. शाळेत विशिष्ट भाषा बोलणारे किमान ४० विद्यार्थी असल्यास किंवा एखाद्या वर्गात असे किमान १० विद्यार्थी असल्यास संबंधित भाषेतून शिक्षण देण्यासाठी एका शिक्षकाची नेमणूक करावी अशी अपेक्षा आहे. आदिवासींच्या प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत या तत्त्वाचे भान राखल्याचे फारसे दिसून येत नाही. एक तर यासंबधी मागणी नसावी किंवा त्यासाठी लागणारे अध्ययन-अध्यापन-साहित्य व प्रशिक्षित शिक्षक आज उपलब्ध नसावेत. नागालँड, आसाम, मेघालय आणि मिझोराम ही राज्ये मात्र याला अपवाद आहेत.

मातृभाषेतून शिक्षण न मिळाल्यास मुलांच्या शिक्षणात मोठ्या अडचणी निर्माण होतात. कृती व त्यासंबंधीची चर्चा हे शिक्षणाचे दोन मोठे आधार आहेत. ही चर्चा शिक्षक व विद्यार्थ्यांत तसेच विद्यार्थ्यांत आपापसात घडायली हवी. आज आदिवासी क्षेत्रातील शाळांतून असे घडते का हा प्रश्न आहे. मुलांना परभाषेत मोकळ्या रीतीने कुठल्याही विषयावर विचार करता येणार नाही की चर्चा करता येत नाही. त्यामुळे त्यांच्या बौद्धिक विकासातही अडथळा येतो. असे अडथळे विशेषत: बाल्यावस्थेत बौद्धिक विकासाच्या बाबतीत अधिक मारक ठरतात म्हणून बालकांना प्राथमिक शिक्षण त्यांच्या मातृभाषेतून मिळणे शिक्षणशास्त्र व मानसशास्त्रदृष्टचा आवश्यक ठरते. आदिवासी बालकांचे शिक्षण योग्य रीतीने व्हावयाचे असल्यास ते निदान आरंभी तरी त्यांच्या मातृभाषेतूनच दिले गेले पाहिजे.

## आदिवासी भाषा व प्रादेशिक भाषा

आदिवासी मुलांना नाही तरी पुढील काळात राज्यातील सामान्य जीवनप्रवाहात सामील व्हावे लागणार आणि त्या दृष्टीने त्यांना मराठी भाषेचे चांगले ज्ञान असणे आवश्यक आहे. मग त्यांनी अगोदर त्यांची मातृभाषा असलेली एखादी आदिवासी भाषा शिकावी व नंतर राज्याची प्रादेशिक भाषा असलेल्या मराठीकडे वळावे, हा खटाटोप कशाला ? त्यापेक्षा मराठीतच या मुलांचे शिक्षण झालेले बरे, असे काही लोकांचे मत आहे. आदिवासी भाषेत व मराठी भाषेत खूपच साम्य आहे म्हणून त्या आदिवासी भाषेचे शिक्षण नको असेही काही जमातींचे म्हणणे आहे. बालकांच्या विकासात मातृभाषेचे स्थान किती महत्त्वाचे ही गोष्ट ही मंडळी लक्षात घेत नाहीत म्हणूनच ते असले अशास्त्रीय विधान करतात. काहींचे म्हणणे असे की, आरंभी आदिवासी भाषेचे शिक्षण मुलांना दिल्यास त्यांना आपली मातृभाषा ( आदिवासी ), मराठी, हिंदी व इंग्रजी अशा चार भाषा शिकाव्या लागणार; पण एकंदर परिस्थितीचा विचार केल्यास असे दिसून येईल की याला यापेक्षा सोपा पर्याय नाही. या संदर्भात उर्दू भाषिकांचे मत अनुकरणीय ठरेल. उर्दू मातृभाषा म्हणून मुलांनी अवश्य शिकावी. प्रादेशिक भाषा म्हणून मराठीचे, राष्ट्रभाषा म्हणन हिंदीचे व आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून इंग्रजीचेही अध्ययन करणे इष्ट आहे. मग राज्यातील इतर मुलांपेक्षा एक भाषा जादा शिकण्याची पाळी आली तरी चालेल. त्या दृष्टीने उर्दूभाषिक समूहांनी त्यांच्या मुलांना प्राथमिक व माध्यमिक पातळीवर एकूण चार भाषा शिकविण्याची सोय करावी अशी शासनाकडे मागणी केली आहे आणि त्याप्रमाणे सोयही करण्यात आलेली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या बाबतीत प्राथमिक शिक्षणाची निदान प्रारंभिक काळाच्या प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था ज्या त्या आदिवासी भाषेतून करणे शास्त्रशुद्ध व अधिक सोयीचे ठरणार आहे. केंद्रीय भारतीय भाषासंस्थेचे संचालक डॉ. डी. पी. पट्टनायक यांनी याबाबतीत आपले मत अनेक ठिकाणी स्पष्टपणे मांडले आहे आणि कनिष्ठ प्राथमिक शिक्षणपातळीवर आदिवासी मुलांसाठी आदिवासी व प्रादेशिक अशा दोन भाषांचा शिक्षणासाठी उपयोग करावा असे प्रतिपादन केले आहे. अर्थात शिक्षणाचा प्रारंभ आदिवासी भाषेतून ( मातृभाषेतून ) झाला पाहिजे हेही त्यांनी मांडले आहे.

अनेक भारतीय आदिवासी भाषा केवळ बोलीभाषा आहेत. त्यांना लिपी अशी नाही. अलीकडे या बोलीभाषा लिपीबद्ध कराव्यात असे प्रयत्न अनेक ठिकाणी सुरू झाले आहेत. पण त्यात काही अडचणी आहेत; त्या दूर केल्या पाहिजेत. नागालँड, मिझोराम, पश्चिम बंगाल इत्यादि राज्यांतील काही आदिवासी भाषा रोमन लिपीमध्ये लिहिल्या जात आहेत. पश्चिम बंगाल व बिहारच्या काही भागामध्ये बोलली जाणारी संताली भाषा रोमन व बंगाली या दोन लिपींमधून दिली जात आहे. देशात इतरत्र काही आदिवासी भाषा देवनागरी लिपीतूनही लिहिल्या जात आहेत. देशाची राष्ट्रभाषा हिंदी, सांस्कृतिक भाषा संस्कृत व अनेक प्रादेशिक भाषा एक तर देवनागरी लिपीचा वापर करतात किंवा या लिपींचा आधार तरी देवनागरी आहे. यामुळे आदिवासी बोलीभाषा देवनागरी लिपीत लिहिल्या गेल्यास ते अधिक सोयीचे होणार आहे. म्हणूनच आदिवासी मुलांना प्रादेशिक भाषा शिकविताना नवीन लिपी शिकावी लागणार नाही. शिवाय यामुळे राष्ट्रीय एकात्मतेच्या दिशेने पाऊल टाकल्यासारखे होईल. रोमन लिपीमुळे हे साधणे शक्य नाही. देवनागरी लिपीच्या साह्याने सर्व भारतीय भाषा व बोलीभाषांची बहुतेक सर्व व्यंजने लिहिता येतात. दोनचार नवीन चिन्हांचा वापर केल्यास आदिवासी बोलिभाषांच्या वैशिष्ट्यपूर्ण स्वरांचे व व्यंजनांचे देवनागरीत सहज लेखन करता येणार आहे. उदाहरणार्थ आ व्यतिरिक्त अ कमी अधिक लांबीच्या स्वरामुळे काही नवीन चिन्हांचा वापर करून लिहिता येईल. ए किंवा ओ चे— ही दोन प्रकार काही आदिवासी भाषांत आढळतात. हे स्वरही एखाद्या नवीन चिन्हाचा वापर करून लिहिता येतील. आदिवासी भाषांमधील विशिष्ट अशा व्यंजनांचाही प्रश्न अशा रीतीने सोडविता येईल.

## नव्या टाइपाची गरज

काही नवीन चिन्हांचा वापर करून आदिवासी बोलीभाषा लिहिता येतील. त्यात फारशी अडचण भासणार नाही हे वरच्या परिच्छेदात म्हटले आहे. असे जरी असले तरी मुद्रण व टंकलेखनाच्या संदर्भात काही अडचणी उद्‌भवतात. ज्या नव्या चिन्हांचा देवनागरी लिपीतील विशिष्ट अक्षरांसह वापर करायचा आहे त्या प्रकारचा टाइप आज मुद्रणालयातून व टंकलेखनयंत्रात सापडणार नाही. अशा चिन्हांसहित काही

अक्षरांचे टाइप नव्याने पाडावे लागतील आणि ते विविध आकाराचे पाडावे लागतील. हा खटाटोप कोण करणार ? खाजगी टाइप फाउण्ड्रीवाले याबाबतीत लक्ष घालतीलच असे नाही. या बाबतीत शासकीय मुद्रणालयासारख्या सार्वजनिक मुद्रणसंस्थांनी पुढाकार घ्यायला हवा. आरंभी असे टाइप तयार करणे थोडेफार खर्चाचे होईल. त्यांचा देवनागरीच्या इतर अक्षरांसारखा फार मोठ्या प्रमाणात उपयोगही होणार नाही. त्यामुळे तो बराच काळ पडूनही राहील. या दृष्टीने हे प्रकरण थोडे महागडे असेच वाटेल; पण त्याला पर्याय नाही. आदिवासी भाषांतून ग्रंथनिर्मिती जसजशी वाढेल तसतसे या प्रश्नाचे गांभीर्य कमी होईल. देवनागरी टंकलेखनयंत्रामध्येही या नवीन चिन्हांची सोय करावी लागणार आहे. त्या दृष्टीने त्याचा कळफलक थोडाफार बदलावा लागेल.

मुद्रणाच्या बाबतीत लिथोपद्धतीने छपाईचा एक पर्याय पुढे करता येणे शक्य आहे. मात्र लिथोपद्धतीचा स्वीकार करणे आदिवासी भाषांच्या एकंदर विकासामध्ये विशेषतः त्यातील ग्रंथनिर्मितीच्या मार्गात मोठी धोंड ठेवण्यासारखे होणार आहे. उर्दू लिथोपद्धतीच्या छपाईमुळे त्या भाषेतील ग्रंथनिर्मितीत व वर्तमानपत्रांच्या मुद्रणात किती अडचणी येतात हे सर्वविदित आहे. या अडचणीमुळे या भाषेची ग्रंथसंपदा खुरटलेली दिसते. अशी अडचण आदिवासी बोलीभाषांच्या विकासाच्या मार्गात निर्माण होऊ नये. याबाबतीत भाषाशास्त्रज्ञांनी व इतरांनी जागरूक राहिले पाहिजे

देवनागरी लिपीचा काही नवीन चिन्हांसहित देशातील विविध आदिवासी बोलीभाषांच्या लेखनासाठी उपयोग करण्याच्या कामी देशात अनेक ठिकाणी प्रयत्न करावे लागतील. या सर्व प्रयत्नांत सारखेपणा यावा, कुठलीही आदिवासीभाषा ठराविक चिन्हांसहित देवनागरी लिपीत लिहिता यावी, या चिन्हांचा सबंध देशात एक अर्थ लावता यावा, एकाच प्रकारचा कळफलक देशातील सर्व भाषांसाठी वापरता येणे शक्य व्हावे यासाठी या चिन्हांचे देशपातळीवर प्रमाणीकरण होणे आवश्यक आहे. हे कार्य केंद्रीय भारतीय भाषासंस्था करू शकेल. केंद्र शासनाला याबाबतीत लक्ष घालावे लागल. हे कार्य तातडीने हाती न घेतल्यास चिन्हांच्या बाबतीत विविधता निर्माण होईल व त्यामुळे या बाबतीत एक प्रकारची अनागोंदी निर्माण होईल. ती टाळली पाहिजे. या बाबतीत काही समान व्यवस्था झाल्यास अनेक संशोधकांचे कार्य सुकर होईल व विविध आदिवासी भाषांच्या वाचन–लेखनात, तसेच टंकलेखन व मुद्रणातही सुकरता निर्माण होईल. या चिन्हांसहित देवनागरी लिपी जाणणाराला या लिपीत लिहिलेला किंवा मुद्रित केलेला कुठलाही मजकूर सहज वाचता येईल. यामुळे राष्ट्रीय एकात्मतेच्या दिशेनेही आणखी पाऊल टाकल्यासारखे होईल.

## आदिवासी भाषांचे अध्ययन

आदिवासी मुलांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण द्यायचे झाल्यास त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांनाही ती भाषा अवगत असली पाहिजे. आज आदिवासी क्षेत्रात काम करणारे सर्व शिक्षक ज्या त्या भागातील आदिवासी भाषा बोलू शकतात असे मात्र नाही. ज्यांना ती भाषा येत नाही त्यांनी ती शिकून त्यावर प्रभुत्व मिळवायला हवे त्याशिवाय त्यांना त्या भाषेतून प्रभावीपणे शिकवता येणार नाही. शिक्षकांप्रमाणेच अनेक अन्यभाषी व्यक्ती शासनाच्या विविध विकासयोजनांच्या अंमलबजावणीसाठी व प्रशासनाच्या निमित्ताने आदिवासी क्षेत्रात वावरतात. संबंधित आदिवासी बोलीभाषेच्या अज्ञानामुळे त्यांच्या कार्यालयात बऱ्याच मर्यादा पडण्याचा संभव असतो. या व्यक्तींनी आपापल्या कार्यक्षेत्राची आदिवासी भाषा शिकणे अत्यावश्यक ठरते. आदिवासींमध्ये निरक्षरतेचे प्रमाण फार मोठे आहे. महाराष्ट्रात १९७१ च्या जनगणनेप्रमाणे ते ८८·३ टक्के आहे. शासनाच्या प्रौढ शिक्षणकार्यक्रमात आदिवासींना अगोदर त्यांचीच भाषा लिहिणे, वाचणे अधिक उपयुक्त ठरेल. या सर्व दृष्टींनी अन्यभाषी प्रौढांना आदिवासींची बोलीभाषा शिकता यावी, तसेच आदिवासी प्रौढांना स्वतःच्या भाषेचे लेखन–वाचन करता यावे याकरिता विविध प्रकारचे अध्ययन–अध्यापनसाहित्य तयार करावे लागेल. तसेच आदिवासी भाषा मुलांना व प्रौढांना कशी शिकवावी यासंबंधी शिक्षकमार्गदर्शिकाही तयार कराव्या लागतील. याशिवाय या भाषांचे व्याकरण, तसेच आदिवासी भाषा–मराठी व मराठी–आदिवासी भाषा शब्दकोशही तयार करावे लागतील.

आदिवासी भाषा इतरांसाठी नवीन असतील. त्यासंबंधीचे लेखन–वाचन–साहित्य उपलब्ध असेल वा

नसेल. ते उपलब्ध नसल्यास या भाषांमधील संवाद, लोककथा, लोकगीते इत्यादी साहित्य ध्वनिमुद्रित करावे लागेल. या भाषांचे ध्वनी, शब्दसंग्रह व वाक्य-रचना इत्यादींचे भाषाशास्त्रीय विश्लेषण करावे लागेल. या विश्लेषित साहित्याच्या मदतीने विविध प्रकारचे अध्ययन–अध्यापन–साहित्य तयार करता येईल. हे सर्व काम नवीन भाषेच्या संदर्भात असल्या-मुळे मोठ्या जिकिरीचे असेल. शिवाय याला शास्त्रीय बैठक असणे आवश्यक आहे. भाषाविज्ञानाचा अभ्यास केलेल्या व्यक्तींना नवीन भाषेच्या विश्लेषणाचे, तसेच त्यासंबंधीच्या अध्ययन–अध्यापन–साहित्य निर्मितीचे कार्य प्रभावीपणे करता येईल. मात्र त्यांना शिक्षण-शास्त्र, मानसशास्त्र व संबंधित समाजजीवनाची माहिती असणे आवश्यक आहे. आदिवासी संशोधन संस्थेस तसेच विद्यापीठांच्या भाषाशास्त्रविभागांना हे कार्य आपल्या हाती घेता येईल. या संशोधनकार्याचा जनजीवन सुधारण्यासाठी मोठा उपयोग होऊ सकेल.

## महाराष्ट्रातील प्रयत्न

महाराष्ट्र शासनाने आदिवासी बोलीभाषांमधील द्वैभाषिक साहित्यनिर्मितीचा प्रकल्प हाती घेतला असून तो १९७५ पासून राज्यशिक्षणशास्त्रसंस्था, पुणे, येथे राबविला जातो. या कामी आरंभी केंद्रीय भारतीय भाषासंस्थेचे मार्गदर्शन लाभेल. पुण्याच्या डेक्कन कॉलेजचे भाषातज्ज्ञ या प्रकल्पाचे मार्गदर्शन करतात. सध्या या चंद्रपूरमधील माडिया गोंडी, यवतमाळची कोलामी व ठाणे जिल्ह्याची वारली या भाषांमध्ये द्वैभाषिक साहित्याची निर्मिती होत आहे. प्रशिक्षित भाषातज्ज्ञांच्या मार्फत या भागात या भाषांमधील विविध प्रकारच्या मौखिक साहित्याचे ध्वनिमुद्रण करण्यात येऊन त्याचे भाषाशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले आहे. या तिन्ही भाषांचे शब्दसंग्रह, व्याकरण व प्रौढांसाठी वाचनसाहित्य तयार करण्याचे काम सुरू आहे. माडिया व कोलामी मुलांच्या प्राथमिक शिक्षणास उपयोगी पडावे म्हणून माडिया गोंडी व कोलामी या भाषांची पहिली पुरवणी वाचनपुस्तकेही तयार करण्यात येऊन त्यांची त्या त्या भागातील शाळांमध्ये चक्रमुद्रित प्रतींच्या मदतीने प्राथमिक चाचणी घेण्यात आली आहे. चाचणीच्या निष्कर्षांच्या मदतीने या वाचनपुस्तकांत सुधारणा केल्या आहेत. या वाचनपुस्तकांच्या सुधारित आवृत्तीच्या मुद्रणाचे काम सध्या सुरू आहे. या वाचनपुस्तकांची पुन्हा मोठ्या प्रमाणात त्या त्या भागात चाचणी घेण्यात येणार आहे. पहिल्या इयत्तेत मराठी बालभारती शिक-विण्यात येणारच आहे. या पुरवणी वाचनपुस्तकांच्या शिक्षणमार्गदर्शिकांचीही चाचणी घेण्यात येणार आहे. त्यानंतरच या साहित्याचे अंतिम स्वरूप निश्चित करण्यात येणार आहे. या चाचणीच्या आधारावरच साहित्याचा या भागातील शाळांमध्ये सर्रास उपयोग करण्यासंबंधी निर्णय घेता येतील. या अध्ययन-अध्यापनसाहित्याचा नीट उपयोग व्हावा यासाठी संबंधित शिक्षकांचे प्रशिक्षणही करण्यात येणार आहे.

याशिवाय यापुढे दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तांच्या विद्यार्थ्यांसाठीही पुरवणी वाचनपुस्तके तयार करण्याचे ठरले आहे. दुसऱ्या इयत्तेसाठी तयार होणाऱ्या माडिया व कोलामी पुरवणी वाचनपुस्तकांत त्या त्या भाषेचे व मराठी भाषेचे पाठ असतील. संबंधित आदिवासी जनजीवनाचे प्रतिबिंब या पाठांत निश्चितच असेल. या पुस्तकांत आदिवासी भाषेचा भाग मोठ्या प्रमाणात दिला जाईल. तिसऱ्या इयत्तेच्या पुरवणी वाचन-पुस्तकात मुख्यत्वेकरून मराठी भाषेचे परंतु आदिवासी जनजीवनाशी संबंधित पाठ असतील. काही पाठ आदि-वासी भाषेतही असतील. आदिवासी मुलाचे आरंभीचे शिक्षण मातृभाषेतून देता यावे, त्यासाठी देवनागरी लिपीचा उपयोग करावा व पुढे क्रमाक्रमाने प्रादेशिक भाषेच्या अध्यापनाचा भाग वाढवावा व आदिवासी भाषेचे प्रमाण कमी करावे आणि शेवटी चौथ्या इयत्तेत या मुलांना भाषेच्या अध्ययनाच्या बाबतीत इतर मुलांच्या बरोबरीला आणून सोडावे अशी या योजनेत व्यवस्था आहे. शासनाच्या या योजनेच्या अंतर्गत तयार होणाऱ्या साहित्याचा माडियागोंडी, कोलामी व वार्ली आदिवासींना निश्चित उपयोग होणार आहे. शिवाय या भागात काम करणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय अधिकाऱ्यांना व कार्य-कर्त्यांनाही हे साहित्य उपयुक्त ठरणार आहे. तूर्त हे कार्य जरी तीन आदिवासी बोलीभाषांपुरते मर्यादित असले तरी त्याच्या कक्षा राज्यातील इतर आदिवासी बोलीभाषांच्या अभ्यासाचा अंतर्भाव करण्याच्या दृष्टीने क्रमशः वाढण्याची शक्यता आहे.

# आदिवासी शिक्षणाचे नियोजन



[ आदिवासी–प्रश्नांचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या, त्या प्रश्नांमध्ये लक्ष घालून ते सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या वरिष्ठ व व्यासंगी सरकारी अधिकाऱ्यांमध्ये डॉ. ब्रह्मदेव शर्मा यांचे नाव घेतले जाते. Occasional Papers on Tribal Development या केंद्रीय गृहखात्यातर्फे छापल्या जाणाऱ्या लेखमालिकेत त्यांचे अनेक अभ्यासपूर्ण व उपयुक्त लेख छापले गेले आहेत. सध्या ते ट्रायबल कमिशनर, मध्यप्रदेश या हुद्द्यावर आहेत. त्यांच्या "आदिवासी क्षेत्रातील शैक्षणिक विकासाचे नियोजन" या १९७६ सालच्या मूळ इंग्रजी लेखाचा येथे गोषवारा देत आहोत ]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षणक्षेत्रात भारताने बरीच प्रगती साधली. महाविद्यालयीन पातळीवर तर संख्यात्मक वाढ इतकी इतकी झाली की, सुशिक्षित बेकारांचे प्रश्न भेडसावू लागले. (आज भारतात जवळपास १५ लक्ष तंत्रज्ञ व वैज्ञानिक आहेत. रशिया, अमेरिका व जपान वगळल्यास इतर कोणत्याही देशात इतकी संख्या नाही.) प्राथमिक शिक्षण व साक्षरताप्रसार या बाबतीत मात्र म्हणण्यासारखे यश आलेले नाही. आदिवासींमध्ये तर साक्षरतेचे प्रमाण अगदीच कमी आहे. इतर ग्रामीण विभागांपेक्षा आदिवासी अर्धे शतक मागे आहेत.

आदिवासी निरक्षर असले तरी त्यांची निसर्गाची जाण व निसर्गापासून जीवनावश्यक गोष्टी मिळवण्याचे कौशल्य या गोष्टी निर्विवाद आहेत; परंतु आता आदिवासी दिवसेंदिवस आधुनिक जग व समाजाच्या संपर्कात येऊ लागला आहे. या नव्या परिस्थितीत मार्गदर्शक ठरेल असे शिक्षण मात्र त्याच्याजवळ नाही आणि आसपास जमातीतील कोणीच सुशिक्षित नसल्याने अमक्याचे उदाहरण पाहून शिकावे–शिकवावे वाटले असेही घडत नाही. म्हणून एका अर्थाने लहान मुलांबरोबर तरुण व प्रौढांना शैक्षणिक कार्यक्रमात गुंतविण्याची गरज आहे ढोबळ मानाने 'नागरिक शिक्षण' असे याला म्हणता येईल.

नागरीक शिक्षणास खालील गोष्टी येऊ शकतील : १. भारताच्या इतिहासाची रूपरेषा २. सरकार व सरकारी यंत्रणेची माहिती ३. नागरिकाचे अधिक व कर्तव्य. ४. आपल्यावरील अन्यायाचा प्रतिकार करण्याचे महत्त्वाचे मार्ग. ५. पैशावर आधारित अर्थरचनेची ओळख. ६. तोंडी व्यवहार व लेखी व्यवहार यांतील फरक. ७. सहकारी संस्था व इतर आर्थिक संस्थांची माहिती ८. आधुनिक शेतीची ओळख ९. परिसरातील प्रश्नांच्या संदर्भात विज्ञान व तंत्रज्ञानाची ओळख.

## शैक्षणिक नियोजनाची गरज

आदिवासींनी शिकणक्रमाबाबत उदासीन होऊ नये अशी अपेक्षा असेल तर दैनंदिन जीवनाशी निगडित व उपयुक्त अशा गोष्टी शिकवल्या पाहिजेत व त्याच्या श्रद्धांना एकदम धक्का लावता कामा नये. म्हणूनच आदिवासीक्षेत्रातील शैक्षणिक नियोजन गटासारख्या छोटया पातळीवर करावे लागेल, अन्यथा केंद्रीभूत नियोजनात आदिवासींमधील विविधतेचा पुरेसा विचार होणार नाही.

एकाच विभागातील विविध शैक्षणिक कार्यक्रमांत

सुसूत्रता हवी. प्राथमिक शिक्षण हे शिक्षणखात्याकडे, आश्रमशाळा आदिवासी–कल्याणखात्याकडे, बालवाड्या समाजकल्याण खात्याकडे असे होऊ नये. त्यातच प्रत्येक नवीन कार्यक्रमाचा फायदा आधीच त्यातल्या त्यात पुढारलेल्या भागाला मिळत रहातो. आश्रमशाळा व प्राथमिक शाळा एकाच गावात असल्याचे दिसते. तसेच माध्यमिक शाळा व इतर उच्चशिक्षणाच्या सोयी सारख्या वाटल्या जात नाहीत. चौथीनंतर शाळा सुटण्याचे मोठे प्रमाण कही अंशी गरिबीमुळे आहे तर काही अंशी जवळ शाळा नसल्यामुळेसुद्धा आहे. महाविद्यालयीन शिक्षणाकरिता सर्व मागासवर्गीयांना काही ना काही आर्थिक मदत मिळते; परंतु तुलनेने अधिक मागास समाजातील विद्यार्थी येथपर्यंत पोचतच नाहीत.

आदिवासी मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न बारकाईने तपासला पाहिजे. त्यांच्या खास शैक्षणिक मागासलेपणाची कारणे समजावून घेतली पाहिजेत. उत्तर हिंदुस्थानातील काही जातींमध्ये जसा मुलींच्या शिक्षणाला सांस्कृतिक विरोध आहे तसा आदिवासींमध्ये सहसा नाही. मुली व मुले यांनी मिसळता कामा नये वगैरे ग्रह त्यांच्यात नाहीत. म्हणून मुलींसाठी वेगळी शाळा वगैरे काढण्यात अर्थ नाही. आदिवासी मुलींचा रोजगार मिळविण्याच्या कामात सहभाग असतो. घरात लहान मुले सभाळण्याची जबाबदारी त्यांच्यावर जास्त असते. मुलाला शिकून निदान नोकरीची तरी आशा असेल; पण मुलीला शिक्षणाचा फायदा काय असा प्रश्न मनात असतो. तेव्हा हा प्रश्न वेगळ्या तऱ्हेचा आहे. मुलींना शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. स्त्रीशिक्षिका असल्यास त्यांचा उपयोग होईल. शिक्षक म्हणून जोडप्यांनाच नोकरी देण्याच्या कल्पनेला इथे पुष्टी मिळते.

शाळेत स्थानिक जनतेला रस नसतो आणि शिक्षकही चांगलीच टंगळमंगळ करतात. राहण्याच्या घराची अडचण, दोन बिऱ्हाडे ठेवण्याची गरज, स्थानिक सोयींचा (बाजार, औषधोपचार, दळणवळण, करमणूक) अभाव या गोष्टी लक्षात घेता शक्यतो स्थानिक वा जवळपासच्या मंडळींना नोकऱ्या देणे अगत्याचे ठरते. यात त्याच शाळेतून उत्तीर्ण झालेल्या गुणी विद्यार्थ्याला अर्धवेळ नोकरी देण्याचाही विचार करता येईल. त्यांचा आजूबाजूच्या विकासकार्यक्रमातही सहभाग होऊ शकेल.

## आश्रमशाळांची खर्चिक समस्या

आदिवासी शिक्षणाच्या संदर्भात आश्रमशाळेचा विचार फार महत्त्वाचा आहे. एकशिक्षकी शाळांना आश्रमशाळा हा पर्याय होऊ शकत नाही. कारण त्या खर्चिक शाळा आहेत. या महागड्या शाळा आहेत. थोड्या आहेत. त्यांच्या इमारती व दैनंदिन खर्च याकरता बरीच रक्कम वापरली जाते. त्यांच्यावर देखरेखही चांगली असते. तुलनेने इतर शाळांच्या बाबतीत नीट नियोजनही होत नाही. खरे तर थोड्या प्रगत आदिवासी गटांत प्राथमिक शाळांमधेही मुले मोठ्या संख्येने येतात व उत्तीर्णही होतात. तेव्हा आश्रमशाळेवाचून आदिवासींचे जमणारच नाही असे नव्हे. आश्रमशाळांवर भर दिला तर विद्यार्थ्यांच्या संख्येवर मर्यादा पडते व बव्हंशी सर्व आदिवासी मुलामुलींनी शाळेत गेले पाहिजे अशी इच्छा असल्यास शैक्षणिक सोयींबाबत तडजोड पत्करावी लागते. इमारत, शिक्षक, पुस्तके, शिष्यवृत्त्या वगैरे सर्वच मिळेल असे गृहीत धरता येत नाही. काही वेळा राहण्याच्या सोयीपेक्षा जेवण देणे महत्त्वाचे असेल. काही शाळांमधे दूरच्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असेल तर जवळचे विद्यार्थी आपापल्या घरीच राहातील. काही ठिकाणी छोटासा ग्रामस्थांनी चालविलेला आश्रम असेल व शिक्षक आठवड्यातून एकदोन वेळा तिथे जातील.

जिथे वस्त्या फारच तुरळक आहेत व प्रत्येक ठिकाणी एकशिक्षकी शाळा काढणे व्यवहार्य नाही तिथे आश्रमशाळा काढता येईल. त्या शाळेला आजूबाजूच्या वस्त्यांमध्ये शैक्षणिक कार्यक्रम हाती घेता येतील; पण त्यात आश्रमशाळेबद्दलचा दृष्टिकोन स्पष्ट हवा. तिच्याकडे आपण खास शाळा म्हणून पहात असू तर तेथील प्रवेशाबद्दलचे धोरण पक्के हवे. त्यामधील विद्यार्थ्यांचा उद्देश ( व आवाका ) बऱ्याच वरच्या पातळीवरचे शिक्षण मिळविण्याचा असला पाहिजे. आश्रमशाळेचे ठिकाण मग फारसे महत्त्वाचे राहत नाही. उलट आश्रमशाळा ही इतर शाळांना मार्गदर्शक ठरावी असे वाटत असेल तर तिची साधनसामग्री मर्यादितच ठेवली पाहिजे. नाही तर इतर शाळा तिच्या प्रगतीचे तेच (पैसा) एकमेव कारण आहे असे मानून आपल्यावरची जबाबदारी झटकतील. आदिवासी शिक्षणकार्यक्रमात आजवर मैदानी खेळांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. मैलोगणती चालणे व पळणे याबाबत आदिवासी तरु-

णांची शक्ती विलक्षण असते. ते बरेचदा नेमबाजीतही कुशल असतात. त्याना योग्य मार्गदर्शन देऊन आपले कर्तृत्व प्रांतिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरही दाखविण्यास संधी दिली पाहिजे. पुस्तकी शिक्षणापेक्षा जास्त भर मोकळ्या जागेतील खेळ व त्याद्वारे शिक्षण यावर दिला पाहिजे. यातून कदाचित मुले शाळेकडे जास्त आकर्षित होतील.

मुलांना शाळेत येण्याची सवय लागावी या दृष्टीने बालवाड्यांचा उपयोग आहे. एरवी बरेचदा आदिवासींना त्यांचे कौतुक नसते. बालवाड्यांचा आणखी एक उपयोग म्हणजे लहान मुले तेथे रंगली तर त्यांना संभाळणाऱ्या मोठ्या बहिणी तेवढा वेळ शाळेत जाऊ शकतील. त्यासाठी बालवाडी व प्राथमिक शाळा यांचे मिश्रण करावे लागेल. बालवाडीत कानावर नागरी भाषा सतत आली तर शैक्षणिक माध्यमाचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. अशी मिश्र-शाळा असल्यास जोडप्यांना शिक्षक म्हणून नोकऱ्या देणे सुलभ होईल व बऱ्याच आदिवासी शाळांमध्ये जेथे शिक्षक आहेत पण विद्यार्थी नाहीत अशी स्थिती असते ती सुधारेल. जोडप्याला नोकरी दिल्यावर पगारही बरा मिळेल. गाव सोडून जाण्याची गरज भासणार नाही. ग्रामस्थांशी संपर्क वाढेल व इतर स्थानिक प्रश्नात लक्ष घालणे शक्य होईल; पण पत्नी प्रशिक्षित शिक्षिका नसेल तर काय करायचे ? सुरुवातीला कमी पगार द्यावा व तो जशी पात्रता वाढवेल तसा वाढवावा. यातून तिला अभ्यास करण्याला प्रोत्साहन मिळेल. अशा शिक्षिकांना खास प्रशिक्षण देण्याची सोय करता येईल.

निदान सुरुवातीला तरी शिक्षणात यशस्वी होणारा आदिवासी तरुण नोकरी मिळवतो, शहरात जातो. बरेचदा त्याला आपल्या नातलगांची लाज वाटते. त्याच्या गावाच्या दृष्टीने तो नसल्यात जमा होतो. शिक्षणाचा प्रसार वाढतो तशा नोकऱ्या संपत जातात. गाव सोडून बाहेर जाण्याला मार्ग दिसत नाही; पण आश्रमशाळेत वा शहरातील हॉस्टेलमध्ये थोड्या आरामी सवयी लागलेल्या असतात. मोठी पंचाईत होते. ग्रामीण सुशिक्षितांना अशा अडचणी असतातच; पण त्यांच्यापैकी तुलनेने बऱ्या घरातील मुलांची तरी तेवढी अडचण होत नाही; पण आदिवासी समाज साधारण एकाच पातळीवर असतो. असे हे निराश सुशिक्षित तरुण पाहून इतरांची शिक्षणाबद्दलची मते बदलतात, विरोधी होतात.

कोणी म्हणेल की, सामाजिक बदलाच्या प्रक्रियेत कुठे तरी घर्षण होणारच. सगळेच सुखासुखी कसे मिळेल ? हे योग्यच आहे; परंतु एकदा विकासाचे नियोजन करायचे म्हटल्यावर अशा अडचणी निवारण कशा होतील याचा विचार टाळता येत नाही. आपल्या समाजापासून तरुण शिक्षणामुळे दुरावला असे होणे टाळण्यासाठी काही पथ्ये पाळायला हवीत. शाळेचे वातावरण आदिवासी जीवनाला अनुरूप हवे. त्यात शहरी शाळांचे अनुकरण नको. यामुळे सांस्कृतिक परात्मभावना टळेल व पैसेही वाचतील. शिक्षकाने प्रयत्नपूर्वक विद्यार्थ्यांसमोर नागरी जीवनाचे संतुलित चित्र ठेवले पाहिजे. त्यातली नवख्याला वाटणारी अद्‌भुतता काढून टाकली पाहिजे. स्थानिक समाजाची वैशिष्ट्ये, त्यांच्यातील समता, अवघड नैसर्गिक स्थितीवर मात करण्याची क्षमता, सुसंघटित समाज-जीवन, एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या वृत्तीचा अभाव ही सर्व किती कौतुकास्पद आहेत हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले पाहिजे. यासाठी आदिवासी शिक्षकांचे पुन्हा प्रशिक्षण करावे लागेल. ❋


---

# संवाद

'हाकारा' आपण वाचलेत !
आदिवासींच्या प्रश्नासंबंधी चर्चा घडवून
आणणाऱ्या या नियतकालिकाबद्दल आपणास
काय वाटते ? मजकुरांत आणखी कोणती
विविधता हवी, आणखी कोणत्या प्रश्नांचा
तपशीलवार विचार व्हावा याबद्दल
आपल्यालाही काही तरी म्हणायचं आहे,
कृपया हाकाराला ते त्वरित लिहून पाठवा.
आपल्या प्रतिक्रियांचा समावेश हाकाराच्या
पुढील अंकात 'संवाद' या सदरात
करण्यात येईल.

—संपादक

# शैक्षणिक मानवशास्त्र



रा. के. मुटाटकर

मानवशास्त्रात मानवाचा सर्वांगीण अभ्यास करण्यात येतो. मानवाचा जैविक विकास, त्याची शारीरिक जडण–घडण, वांशिक प्रकार, आनुवंशिक घटक व या सर्वांना घडविणारी त्याची संस्कृति, तसेच संस्कृतीवर होणारे यांचे परिणाम या सर्वांचा अंतर्भाव त्यात होतो. मानवाचा सांस्कृतिक विकास, मानवी संस्था, अर्थ-व्यवस्था, समाजरचना, राजकीय संघटना, धर्म, कला, साहित्य, संगीत, भाषा, आरोग्य इ. चा विचार मानव-शास्त्रात होतो.

मानवी बालकास, इतर प्राण्यांच्या तुलनेत, शारी-रिक स्वातंत्र्य मिळण्यास सर्वात जास्त काळ लागतो. अर्थार्जन करण्याची पात्रता मिळण्यास तर बराच काळ लोटावा लागतो व आजच्या नागरसंस्कृतीत तो काळ वाढतच आहे. त्यामुळे संस्कृती असलेला मानव हा एकमेव प्राणी आहे. मानवास त्याच्या शारीरिक दुबळे-पणाच्या कालावधीत संस्कृतीचे शिक्षण देण्यात येते व ते त्याच्या मृत्यूपर्यन्त चालू राहते. संस्कृती म्हणजे आपल्या इंद्रियांना आकलन होणारी किंवा न भासणारी परंतु आपली वागणूक, मूल्ये, धर्म, कला इत्यादींना घडविणारी व ऐतिहासिकदृष्टचा स्वत: घडलेली अशी सामाजिक ठेव. जन्म झाल्यापासून माणूस आपापल्या समाजाची संस्कृती शिकण्यास सुरुवात करतो. एका समाजात संगोपनाच्या पद्धती सारख्या असल्याने, सर्व बालकांस समान अनुभव प्रत्ययास येतात व त्यांतून एका समाजाच्या सर्व लोकांत व्यक्तिमत्त्वाचे समान गुण वाढीस लागतात.

पारंपरिक समाजात व्यक्तीचे स्थान जन्मत:च ठरते. जसे जाती–समाजात, सुताराचा मुलगा सुतार, सोनाराचा सोनार इ. हे स्थान मिळविण्यासाठी जे शिक्षण लागते ते कुटुंबातच प्राप्त होते. आदिवासी समाजात, संस्कृती शिकण्यासाठी कुटुंब, शेजारी, नात्याचे लोक हे पुरेसे असतात.

आधुनिक समाजात जेथे तंत्रज्ञानाचा प्रसार झालेला आहे तेथे व्यक्तीला अर्थार्जन करण्यासाठी कुटुंबाबाहेर जाऊन वेगळे शिक्षण घ्यावे लागते. डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, तंत्रज्ञ होण्यासाठी शाळांमधूनच शिक्षण घ्यावे लागते. पारंपरिक समाजाचे आधुनिक समाजात परि-वर्तन करावयाचे झाल्यास जशी आर्थिक–सामाजिक–राजकीय व्यवस्था बदलावी लागते, तसेच औपचारिक पद्धतीचाही अवलंब करावा लागतो

प्रत्येक समाजाची आपली एक वैशिष्टचपूर्ण संस्कृती असल्याने व त्यातील मूलतत्त्वे बाल्यावस्थेतच आत्म-सात झाल्याने शाळेतून कोणत्या मूल्यांचा पुरस्कार करावयाचा याबाबत वाद उत्पन्न होतात. आदिवासी मुलांनी शाळेच्या भिंतीत स्वत:ला का बंदिस्त करावे ? मिळणाऱ्या शिक्षणाचा त्यांच्या परिस्थितीशी एकरूप होण्यास किंवा बदलण्यास काय उपयोग आहे ? शाळेतील शिक्षणामुळे व्यक्तीचा आपल्या समाजापासून दुरावा निर्माण होतो तो कितपत योग्य आहे ? व तसे असेल तर संस्कृति–समाजास तोडणाऱ्या शिक्षणाचे अर्थार्जनास योग्य अशा तंत्रज्ञानप्राप्तीशिवाय काय महत्त्व आहे किंवा कार्य आहे ?

या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी संस्कृती, समाजरचना सामाजिक मूल्ये यांचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. मानवी समाज कोणत्या दिशेने वाटचाल करतो आहे ? आदिवासी समाजाचे काय व्हावे असे आपणास वाटते व ते वाटणारे आणि त्याबाबत धोरण ठरविणारे आपण कोण ? आर्थिक विकास व शिक्षण यांच्यात प्रगती झाल्याशिवाय आदिवासींचे मागासलेपणा, त्यांच्या जुन्या समजुती जाणार नाहीत असे वारंवार

ऐकावयास मिळते. आर्थिक विकासाशिवाय शिक्षण नाही व शिक्षणाशिवाय आर्थिक विकास नाही असे दुष्टचक्रही चर्चिले जाते. ग्रामीण संस्कृती व आदिवासी संस्कृती नागर संस्कृतीपेक्षा भिन्न असल्याने शिक्षणाचे माध्यम, त्यातील तत्त्व व आशय भिन्न असावा का? आदिवासींना शिक्षणात रस नाही असे म्हटले जाते. असे का? त्यांच्या पारंपरिक जीवनात शाळेतील शिक्षणाचा काय वाटा आहे? आदिवासींचे शोषण, भुकेचे प्रश्न आजार इ. प्रश्नांना त्यांच्या पारंपरिक संस्कृतीत–शिक्षणव्यवस्थेत समाधानकारक उत्तरे आहेत का?

सामाजिक आर्थिक परिवर्तनाचा केंद्रबिंदू म्हणूनही शाळेकडे बघितले जाते. शाळेमार्फत संस्कृतिपरिवर्तन शक्य आहे का? कोणतीही राजकीय व्यवस्था वा प्रणाली समाज–परिवर्तनाच्या नावाखाली शाळापद्धतीवर आपले लक्ष केंद्रित करते व आपल्या मूल्यांचा प्रसार शाळेमार्फत समाजावर लादण्याचा प्रयत्न करते. शिक्षणाच्या माध्यमातून नवीन समाजव्यवस्था उभी राहू शकते का? हा मूळ प्रश्न आहे.

या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न शिक्षणतज्ज्ञ करीत असतात. या प्रश्नांची उत्तरे शोधताना आपणास समाजरचना, संस्कृति, सांस्कृतिक मूल्ये, मानवी स्वभाव, त्याच्या आशाआकांक्षा यांचा सातत्याने विचार करावा लागतो. तो विचार मानवशास्त्रात अभिप्रेत आहे. आदिवासींच्या संस्कृतीत पारंपरिक व आधुनिक शिक्षणपद्धतीचे स्थान याविषयीचे अध्ययन मानवशास्त्रात करण्यात येते. नृत्य, लोककथा, संगीत, युवागृहे या माध्यमातून आदिवासींच्या संस्कृतीची जपणूक होत असते. प्रगत समाजातही पुराणकथा, धार्मिक ग्रंथ इ. मार्फत संस्कृतीची शाश्वत मूल्ये शिकविली जातात. समाज व संस्कृतीच्या संदर्भात शिक्षण–विषयक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे कार्य व त्याबाबत अध्ययन, संशोधन, शैक्षणिक मानवशास्त्र या उगवत्या विषयात करण्यात येते.


## हाकारा

[ फॉर्म ४, नियम ८ नुसार निवेदन ]

| | |
|---|---|
| **१. प्रकाशन स्थळ :** | मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ७. |
| **२. प्रकाशन काळ :** | त्रैमासिक |
| **३. मुद्रक व प्रकाशक :** | रामचंद्र केशव मुटाटकर |
| **राष्ट्रीयत्व :** | भारतीय |
| **पत्ता :** | मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ७. |
| **४. संपादक :** | जगदीश रंगनाथ गोडबोले |
| **राष्ट्रीयत्व :** | भारतीय |
| **पत्ता :** | ब ७ / सीमा अपार्टमेंटस्, शिरोळे रोड, पुणे ४. |
| **५. स्वामीत्व :** | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ७. |


मी, रामचंद्र केशव मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीनुसार खरा आहे.

१ मार्च, ८०

—प्रकाशक

# आदिवासी शिक्षणाची पाहणी

जे. पी. नाईक



१९६१ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण आदिवासी लोकसंख्या ३०·१३ दशलक्ष होती. आदिवासींची भारताच्या एकूण लोकसंख्येतील टक्केवारी ६·८ होती. १९६१ साली महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येच्या ६·१ टक्का आदिवासी होते.

१९६०–६१ ते १९६५–६६ ह्या ५ वर्षांच्या काळात इतर जमातींच्या तुलनेत आदिवासींनी शिक्षणाच्या विविध पायऱ्यांवर किती प्रगति केली त्याचा हा त्रोटक आढावा आहे. तुलनेकरिता साध्या शेकडेवारीचा उपयोग केला आहे. उदा. प्राथमिक क्षेत्रात आदिवासी→ इतर जमातींच्या तुलनेत कुठे आहेत हे पाहावयाचे असल्यास, आदिवासींच्या एकूण संख्येपैकी शेकडा किती प्राथमिक शाळेत आहेत, ह्या आकड्याची बिगर आदिवासींच्या तशाच प्रकारे मिळालेल्या आकड्यांची तुलना केली की त्या बाबतीत पुरेशी कल्पना येते.

१९६०–६१ साली मान्यताप्राप्त सर्व प्रकारच्या भारतातील शिक्षणसंस्थांतील आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या १९·२५ लाख होती ती १९६५–६६ साली २९·६६ लाख झाली. त्यापैकी मुलींची संख्या अनुक्रमे ४·७६ लाख आणि ८·०५ लाख होती.

| विद्यार्थी संख्या १९६०–६१ | मुलींची टक्केवारी | विद्यार्थी संख्या १९६५–६६ | मुलींची टक्केवारी | शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|
| मुले १४·४६ | | २१·६० | | ५०% |
| मुली ४·७६ | २४·७ | ८·०५ | २७·१ | ६९% |
| एकूण १९·२२ | | २९·६५ | | ५४% |

ह्यावरून हे स्पष्ट आहे की मुलींची टक्केवारी अपेक्षेपेक्षा जवळजवळ निम्मी आहे (मुलेमुली समान म्हणजे ५०% हव्या.) विचाराधीन ५ वर्षांत मुलांची संख्या ५०% नी वाढली व मुलींची २६% नी म्हणजे मुलींच्या वाढीचा वेग जास्त आहे हे साहजिकच आहे. कारण त्यांची संख्या मुलांच्या तुलनेत जवळजवळ २५% नी कमी होतीच.

आता वर उल्लेखिलेल्या पाच वर्षांच्या काळात शिक्षणाच्या विविध स्तरांवर आदिवासींनी बिगर आदिवासींच्या तुलनेने किती प्रगती केली हे पाहू →

| संस्थेचा प्रकार | आदिवासी विद्यार्थ्यांची बिगर आदिवासी विद्यार्थ्यांशी शेकडेवारी | |
|---|---|---|
| | १९६०–६१ | १९६५–६६ |
| पूर्वप्राथमिक | २·६ | ३·७ |
| प्राथमिक | ६·०० | ६·७ |
| पूर्व माध्यमिक | ३·६ | ३·७ |
| माध्यमिक, उच्च माध्यमिक | १·३ | १·७ |
| धंदेशिक्षण | × | २·७ |

भारतात आदिवासी लोकांची बिगरआदिवासी लोकांशी टक्केवारी ८·७ आहे. आदिवासींना बिगर-आदिवासींच्याबरोबर यायचे म्हणजे त्यांच्या विद्यार्थ्यांची बिगरआदिवासी विद्यार्थ्यांशी टक्केवारी लोकसंख्येच्या टक्केवारीएवढी म्हणजे ८·७ व्हायला हवी. वरील कोष्टकावरून हे स्पष्ट आहे की, शिक्षणाच्या कोणत्याही स्तरावर आदिवासी ही पातळी गाठू शकले नाहीत. एवढेच नव्हे तर प्राथमिक अवस्था सोडून इतर अवस्थांमध्ये ते फारच मागे आहेत. प्राथमिक अवस्थेतसुद्धा अजून बराच पल्ला गाठावयाचा आहे. प्राथमिकाच्या मानाने पूर्वमाध्यमिक अवस्थेत प्रगती खूपच कमी आहे. ह्याचा अर्थ असा की, इतर जमातींच्या मानाने आदिवासींमध्ये गळतीचे प्रमाण अधिक असते. शिक्षणाबद्दल औदासिन्य आणि घरापासून दूर अंतरावरची शाळा ही कारणे संभवतात. तसेच ह्या वयाची मुले थोडेफार काम करून संसाराला मदतही करतात. जसजसे माध्यमिक शिक्षणाकडे जावे तशी ही तफावत वाढतच जाते. ह्या स्तरावर शिक्षणशुल्क जरी माफ असले तरी मुलाला वसति-→ गृहात ठेवण्याचा व त्या मानाने लागणारा कपडालत्ता, जेवणखाण, पुस्तके इत्यादिवरचा खर्च फारच थोडच्या आदिवासींना परवडण्यासारखा असतो शिवाय ह्या वयांत मुलींना परगावी ठेवणे व मुलामुलींच्या मिश्र शाळेत धाडणे या गोष्टींनाही आदिवासी तयार नसतात.

माध्यमिक शिक्षणाची पातळी इतकी खाली असताना त्याचे प्रतिबिंब महाविद्यालयीन विद्यार्थीसंख्येत अपरिहार्यपणे पडले आहे. ह्या स्तरावर शिक्षण पूर्ण करणाऱ्या सर्वांनाच शिक्षणाची ओढ आणि कुवत असणे कठीणच. माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणाच्या बाबतीत त्यांच्या काय अडचणी आहेत ह्याचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात आदिवासीक्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने, अखिल भारताच्या तुलनेत महाराष्ट्रातील आदिवासी कोठे आहेत हे पहाणे उपयुक्त ठरावे. महाराष्ट्रातील आदिवासींचे इतर लोकसंख्येशी प्रमाण ६·१% होते.

| अवस्था | क्षेत्र | आदिवासी विद्यार्थ्यांची इतर विद्यार्थ्यांशी टक्केवारी १९६०–६१ | आदिवासी विद्यार्थ्यांची इतर विद्यार्थ्यांशी टक्केवारी १९६५–६६ |
|---|---|---|---|
| प्राथमिक | महाराष्ट्र | ७ ९ | ७·३ |
| ,, | भारत | ६·० | ६ ७ |
| पूर्वमाध्यमिक | महाराष्ट्र | २·५ | ३·४ |
| ,, | भारत | ३·६ | ३ ७ |
| माध्यमिक | महाराष्ट्र | १·१ | २.३ |
| ,, | भारत | १·३ | १·७ |
| व्यावसायिक, | महाराष्ट्र | × | २·८ |
| तांत्रिक संस्था | भारत | × | २·७ |
| विश्वविद्यालये, | महाराष्ट्र | × | ०·७ |
| सामान्य महाविद्यालये | भारत | × | १·२ |

वरील कोष्टकावरून दिसते की, प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्र भारतीय सरासरीपेक्षाही वर आहे. इतर अवस्थांच्या बाबतीत मात्र भारतीय सरासरीच्या जवळपासच इथला आदिवासी रेंगाळत→ आहे. प्राथमिकपासून पूर्वमाध्यमिक अवस्थेत जाताना मोठ्या प्रमाणावर गळती होते. निव्वळ प्राथमिकपर्यंत शिकलेले पुढे लवकरच बहुतांश निरक्षर होतात असा अनुभव आहे. म्हणून पूर्वमाध्यमिक अवस्थेत

होणाऱ्या गळतीवर उपाय करणे अत्यंत आवश्यक आहे. त्या गळतीच्या कारणांचा बारकाईने अभ्यास होऊन ती दूर करणे ही प्राथमिकवरील फुकट जाणारा खर्च कारणी लावण्यासाठी गुंतवणूकच समजली पाहिजे.

पूर्वमाध्यमिकची गळती थांबली नाही तर माध्यमिकमधील संख्या वाढणे शक्य नाही. माध्यमिक शाळा बहुधा आदिवासी वस्तीपासून दूर असतात. त्यामुळे मुलांना वसतिगृहात ठेवावे लागते. तेथील खर्च हा बहुतांश गरीब आदिवासींना परवडण्यासारखा नसतो. ह्या अवस्थेत आदिवासींना शुल्क माफ असते; पण त्यामानाने इतर खर्च अवाढव्य व त्यांच्या आवाक्या-→ बाहेरचा असतो. शिवाय ही मुले ज्या पूर्वमाध्यमिक शाळांतून येतात तेथील शिक्षणाचा स्तरही यथातथाच असतो. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांकरिता शाळेच्या व्यतिरिक्त व्यक्तिगत शिकविण्याची सोय केल्याशिवाय त्यांना इतरांबरोबर प्रगती करता येत नाही.

## आदिवासींमधील स्त्रीशिक्षण

महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रात अखिल भारतातील आदिवासींच्या तुलनेत कुठे आहेत ते आता पाहू–

| | | १९६०–६१ | | | १९६५–६६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शिक्षणाची अवस्था | क्षेत्र | एकूण आदिवासी विद्यार्थी | मुली | मुलींचे शे. प्रमाण | एकूण आदिवासी विद्यार्थी | मुली | मुलींचे शे. प्रमाण |
| पूर्वप्राथमिक | महाराष्ट्र | ३८० | १७३ | ४५.५% | ३७३ | १७१ | ४५.५% |
| | भारत | ४२९८ | २०६१ | ४७.९% | ७२६० | ३३५४ | ४६.२% |
| प्राथमिक | महाराष्ट्र | १,१७,५२४ | ३०,९८८ | २६.६% | १,२९,३०६ | ४०६५६ | ३ .४% |
| | भारत | १३,३६,७०३ | ३,४८,७१० | २६.८% | २०,२१,७२२ | ५,६५,६७९ | २७.९% |
| पूर्वमाध्यमिक | महाराष्ट्र | ५३,३५० | १२९०३ | २७.१% | १,०४५६५ | २४२६२ | २३.२% |
| | भारत | ३,५०,२५२ | ८५,९३० | २४.०% | ५,५५,३४८ | १४३१११ | २५.७% |
| | महाराष्ट्र | ८१३१ | ८८९ | १०.९% | २९,७०३ | ३४३२ | ११.५% |
| माध्यमिक | भारत | ९४,४८० | १४,१५७ | १४.९% | २०५३९८ | ३९८६५ | १९.४% |


आदर्श परिस्थितीत मुलामुलींचे प्रमाण समान पाहिजे म्हणजेच मुलींचे एकूणच्या ५०% पाहिजे. बिगरआदिवासी समाजात सुद्धा प्राथमिक अवस्था सोडून ही परिस्थिती क्वचितच आढळते. महाराष्ट्रात फक्त पूर्वप्राथमिक शाळांत (ज्यांची संख्या व त्यातील विद्यार्थीसंख्या एकूण संख्येच्या मानाने नगण्यच आहे) मुलींचे प्रमाण ५०% च्या बरेच जवळ आहे.

इतर सर्व अवस्थांत लक्षात येण्याजोगी गोष्ट म्हणजे महाराष्ट्र भारतीय सरासरीच्या जवळपास बरोबर→ आहे. ह्याला अपवाद फक्त माध्यमिक अवस्थेचा. ह्याचे कारण उघड आहे की, ह्या वेळी मुली मोठ्या झालेल्या असतात व मुलींच्या स्वतंत्र वसतिगृहांची पुरेशी सोय उपलब्ध नसते. शिवाय हा वसतिगृहात ठेवण्याचा खर्च बहुतेक आदिवासींना परवडणाराही नसतो. ✲

[ दिल्ली येथील भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेसाठी श्री. ज. पां. नाईक यांनी लिहिलेल्या 'अनुसूचित जमातीचे शिक्षण १९६५–६६' या अहवालाच्या आधारे. ]



# चालतवडचे शैक्षणिक शिबिर



[ पुणे विद्यापीठाच्या मानवशास्त्र विभागाने ठाणे जिल्ह्यातील मोरवाडा तालुक्यातील दुर्गम अशा साखरशेत–चालतवड या भागात पहाणी–शिबिर व जव्हार येथे एक चर्चासत्र काही वर्षांपूर्वी आयोजित केले होते. महाराष्ट्राच्या विविध भागांतील मानवशास्त्राचे प्राध्यापक विद्यार्थी यांच्याबरोबरच आदिवासीनेते, शिक्षक, कार्यकर्ते व शिक्षणक्षेत्रातील विचारवंतांनीही या चर्चासत्रात भाग घेतला होता. विशेष म्हणजे सुमारे दोनशे पालक, दीडशे शिक्षक व निवडक आदिवासीनेते यांच्या मुलाखतीतून मिळालेल्या आदिवासी शिक्षणविषयक मतांचे विश्लेषण त्या खेड्यातील वास्तव्यातच करण्यात आले होते. अशा प्रकारे झालेले महाराष्ट्रातील हे पहिलेच चर्चासत्र असावे, म्हणून त्याचा गोषवारा मुद्दाम देत आहोत.

आदिवासी शिक्षणासंबंधी या अंकात प्रसिद्ध झालेल्या डॉ. ब्रह्मदत्त शर्मांच्या लेखात ‘ एकशिक्षकी शाळांना आश्रमशाळा हा खर्चिक पर्याय असू शकत नाही ’ असे प्रतिपादन केले आहे. एका अर्थाने ते खरे असले तरी बहुसंख्य एकशिक्षकी शाळांच्या अत्यंत असमाधानकारक कामगिरीमुळे, आश्रमशाळांना आज तरी काही पर्याय दिसत नाही. चर्चासत्रात भाग घेतलेल्या आदिवासीनेत्यांचे पण हेच मत होते. आदिवासी उपयोजनेतही आश्रमशाळा हे केवळ एक वसतिगृह न होता ती आर्थिक व सामाजिक परिवर्तनाची केंद्रबिंदू ठरावी अशा शाळांचा ‘ आश्रमशाळा कॉम्प्लेक्स ’ योजनेत अंतर्भाव आहे. तथापि आश्रमशाळा व तिच्या कार्यपद्धतीबद्दलचा आपला दृष्टिकोन अजून स्पष्ट असला पाहिजे विविध जाणकार कार्यकर्ते व वाचकांनी याबाबत आपले विचार कळवावे अशी विनंती आहे. ]

**१९७१**च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात ४० टक्के लोक साक्षर आहेत. अनुसूचित जाती-जमातीमध्ये हे प्रमाण अनुक्रमे २६ व १२ टक्के आहे. आदिवासींचा आर्थिक विकास होण्यासाठी व पिळवणूक थांबविण्यासाठी शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला पाहिजे. अनेक आदिवासी विभागात कागदावर शाळा असतात; पण प्रत्यक्षात शिक्षक व विद्यार्थी यांचा लपंडाव चाललेला असतो. सात गावांनील पहाणीच्या निष्कर्षाप्रमाणे शाळेत जाण्याचे वय असणाऱ्या मुलांपैकी केवळ २५ टक्के मुले शाळेत जात होती. पालकांना, मुलांना शिकविण्याची इच्छा होती; पण शेत व घरी काम करण्याची निकड असल्याने ते मुलांना शाळेत पाठवू शकत नव्हते. मुलांनाही शाळेत चार भिंतींआड बसण्यापेक्षा पक्षी मारणे, मासे धरणे यात जास्त रस होता. आदिवासी भागात काही तुरळक आश्रमशाळा सोडल्या तर बहुसंख्य शाळा एकशिक्षकी असतात. या शाळेतील शिक्षक अनियमित असल्यास विद्यार्थ्यांच्या हजेरीत एकदम फरक पडतो. या सर्व कारणांमुळे आदिवासी भागात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण जास्त असते. पहिल्या वर्गातच ६६ टक्के विद्यार्थी गळतात. उरलेल्यांपैकी ६२ टक्के दुसऱ्या व त्यापैकी ६७ टक्के तिसऱ्या वर्गात गळतात. म्हणजे पहिलीत प्रवेश घेतलेल्या १०० विद्यार्थ्यांपैकी चौथीत केवळ तीन–चार विद्यार्थीच उरतात. (आणि आपल्या बहुसंख्य शिष्यवृत्त्या त्याच्या-




पुढे चालू होतात ! ) चौथीची परीक्षा ही जिल्हा परिषदेमार्फत घेतली जाते. त्यात विद्यार्थी मोठ्या संख्येने नापास झाल्यास शिक्षकांच्या पात्रतेबद्दल शंका निर्माण होतात. त्यावर तोडगा म्हणून शिक्षक शाळेत चौथी इयत्ता सुरूच करीत नाहीत !

चर्चासत्रात पुढील प्रमुख शिफारशी करण्यात आल्या : पाडा तिथे बालवाडी, तीन–चार खेड्यांच्या केंद्रभूत चौथीपासून पुढची शाळा असावी. तेथेच आस-पासच्या तीन–चार शाळांच्या प्राथमिक शिक्षकांकरिता घरे बांधावीत. शिक्षकांना एकापेक्षा जास्त वर्ग एकाच वेळी शिकवावे लागू नयेत शिक्षकांना शिक्षणाव्यति-रिक्त प्रशासकीय अंमलबजावणीची इतर कामे सांगू नयेत. शिक्षणाचे माध्यम मराठी असावे. आदिवासींना इतरांशी स्पर्धा करण्याची संधी व क्षमता लाभावी म्हणून शिक्षणात फरक नसावा. एकशिक्षकी शाळा अयशस्वी झाल्यामुळे, आश्रमशाळा हाच त्यावर पर्याय आहे. योजनेप्रमाणे त्यांची स्थापना लौकर करावी.

आदिवासी शिक्षकांत किंवा पुढाऱ्यांत शिक्षक आदिवासीच असावे असा सूर निघाला नाही. उलट पुढाऱ्यांनी, पुढारलेल्या समाजातील शिक्षक असावेत असे सुचविले. स्त्रीशिक्षणाकडे खास लक्ष देण्यात यावे असेही मत व्यक्त झाले.

आदिवासींना समाजातील इतर घटकांच्या बरोबरीने शिक्षण मिळावे याबद्दल आग्रही भूमिका बहुसंख्य आदिवासी पालक, शिक्षक व नेत्यांनी मांडली. यावरून शिक्षणाचे महत्त्व मोरवाडा तालुक्यातील आदिवासी भागात पसरले आहे हे स्पष्टपणे जाणवले.

❋

# आश्रमीय शिक्षण-पद्धती : काही अपेक्षा

**जनार्दन पोहऱ्या वळवी**
[ धडगाव, जि. धुळे ]

आदिवासींमध्ये आश्रमीय जीवन–शिक्षणपद्धतीचे शिक्षण असावे असे मला व्यक्तिश: वाटते. मात्र ह्याकरिता व्यवस्थापक वा व्यवस्थापिका यांना गृहपिता–गृहमाता बनावे लागेल. तसे आदिवासी मूलास वाटावयास हवे. तीच खरी आश्रमीय शिक्षणाची कसोटी आहे. मग ती शासकीय आश्रमशाळा असो, वा स्वयंस्फूर्त संस्थेची आश्रमशाळा असो. आश्रमातील मुलांबद्दल अशीच माता–पित्यासारखी आत्मीयता बाळगणारी कार्यपद्धती असेल, तर आश्रमशाळा यशस्वी होईल.

आश्रमशाळांतील शिक्षणाचे मूल्यमापन करताना केवळ त्यांच्यावर किती पैसा खर्च झाला अथवा किती मुले उत्तीर्ण झाली एवढाच संकुचित दृष्टिकोन ठेवून चालणार नाही. आदिवासी मुलांना शिक्षणाबरोबरच इतरही चांगले संस्कार घडविण्याचा प्रयत्न होतो का हेही पाहिले पाहिजे. अनेक आदिवासी मुले लहानपणी एका वेगळयाच वातावरणात वाढलेली असतात. काही वाईट रूढी अथवा व्यसनाचा प्रभाव त्यांच्यावर पडला असण्याची शक्यता असते. आश्रमीय शिक्षणात ही गोष्ट लक्षात घेऊन वाईट रूढीतून त्याला बाहेर काढून चांगले संस्कार घडविण्याकडे पद्धतशीर लक्ष दिले पाहिजे. त्याच्यावर परत पहिल्या गोष्टीचा परिणाम होऊ नये म्हणून उन्हाळा वा दिवाळीची सुट्टी केव्हा व किती असावी याचाही विचार होणे आवश्यक आहे.

अनेक आदिवासी मुलांना शालेय आश्रमातील जीवनाशी जुळवून घेणे सुरुवातीला जड जाते. त्यामुळे सुरुवातीला त्यांची शैक्षणिक प्रगतीही असमाधासकारक असते; पण केवळ तेवढयावरून ती शिक्षणाला कायमची वंचित होणार नाहीत याची दक्षता बाळगणे आवश्यक आहे. पुढारलेल्या समाजातील घरांमध्ये शिक्षणाची परंपरा असते. आई–बाप–भाऊ–बहीण बहुधा शाळेत गेलेले असतात. पाटी–पुस्तके नजरेस पडलेली असतात. याउलट बहुसंख्य आदिवासी घरांमध्ये शिक्षणाची परंपरा नसते. शेतीची कामे अथवा गुरे ढोरे राखणे, नाही तर धनुष्य–बाण, गलोल घेऊन पशु–पक्ष्यांमागे रानोमाळ भटकणे अशा मुक्त जीवनाची सवय मुलांना असते. साहजिकच त्यातून त्यांचे मन सोडवून शाळा–पाटी–पुस्तकात रमविण्यास मुलांना वा मास्तरांना दोघांनाही वेळ लागतो; पण त्यात अनेक अडचणी येतात. योग्य व पुरेशा शिक्षकांचा अभाव ही सर्वांत मोठी अडचण. चाळीस मुलांस एक शिक्षक असे सध्या प्रमाण आहे. शिवाय स्वयंस्फूर्त संस्थेत खर्चाचा हिशेब सांभाळण्यास कारकून अगर खास व्यवस्थापक अनुदानमान्य नसतो. तेही काम शिक्षकांवरच पडते. साहजिकच शिक्षकांना मुलांकडे नीट लक्ष देणे शक्य होत नाही व विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण वाढते.

शासनाने सरकारी आश्रमशाळा व स्वयंस्फूर्त संस्थेने चालविलेल्या आश्रमशाळा यांमध्ये दुजाभाव करू नये. चांगल्या–वाईट गोष्टी दोन्हीकडेही असतात. सर्व आश्रमीय शाळा सरकारने ताब्यात घेऊन, आदिवासी समाजात शैक्षणिक प्रगति झाली तर माझ्यासारख्या कार्यकर्त्याला आनंदच वाटेल. पण आश्रमशाळांचे सरकारीकरण झाल्याने आदिवासी समाजाच्या शिक्षणाचा प्रश्न सुटतो असा अनुभव नाही. सरकारी व स्वयंस्फूर्त आश्रमशाळांच्या कामाचे विद्यापीठ वा शिक्षण–शास्त्र-संस्थांनी यथायोग्य मूल्यमापन करावे व योग्य सुधारणा सुचवाव्या असे आवाहन आहे.

आदिवासींची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी शैक्षणिक प्रगतीशिवाय पर्याय नाही, ही गोष्ट स्पष्ट आहे. आदिवासी समाजातील शिकलेल्या तरुणांनीच त्यामध्ये जास्त पुढाकार घेतला पाहिजे. दुर्दैवाने आज शिक्षण घेतलेला आदिवासी मुलगा आपल्याच समाजापासून तुटला जातो, हे योग्य आहे का याचा त्यांनीच विचार करायला पाहिजे. शिवाय आज अनेक आदिवासी तरुणांनी लंगोटीचा पोशाख टाकून पँट वापरायला सुरुवात केली आहे ते ठीक आहे; पण पँटबरोबर आधुनिक दृष्टिकोन आपल्यात आला का किंवा पँट वापरायची कुवत आपल्यात आली का, याचाही त्यांनी डोळस विचार करायला पाहिजे. आज धुळे जिल्ह्यातील शहादा भागात श्री. झिपामहाराज ध्येयभावनेने आदिवासी शिक्षणाचे काम करीत आहेत. सर्वांनी त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवण्याची गरज आहे.

# दिंडोरीचे प्रौढशिक्षण शिबिर

थियो रेमिडियोस

नाशिक जिल्ह्यात दिंडोरी तालुक्यात प्रौढशिक्षणाचे कार्य चालू करण्याच्या उद्देशाने नाशिकच्या महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळाने बावन्न आदिवासी प्रशिक्षार्थींचे शिबिर २१ ते २७ जानेवारीच्या दरम्यान घेतले होते. प्रशिक्षार्थींचे शिक्षण तिसरी ते दहावी नापास असे होते.

शिबिराचे उद्देश – (१) सामाजिक परिस्थितीची जाणीव करून देणे (२) विचार करण्याची सवय लावणे (३) स्वतःची मते व्यक्त करण्यास मदत करणे (४) व्यक्तिमत्त्वाचा विकास, आत्मविश्वास व स्वतःस अवगत असलेल्या तंत्राची जाणीव (५) या तंत्राचा प्रभावीपणे वापर करणे (६) सहभाग व सहकारातून नवीन तंत्रांचा आविष्कार करणे.

प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाची विभागणी अशी केली–

१. सामाजिक जाणिवेचे विचारमंथन.

२. प्रौढ शिक्षण कार्यक्रम व त्याबाबतची तंत्रे याबद्दल जाणीव.

३. अभ्यासक्रमाचे विश्लेषण व चर्चा.

४. शिक्षणाकरिता आवश्यक साहित्य तयार करणे व शिबिराचे मूल्यमापन.

सात अध्यापकांनी संचालनाच्या कामात भाग घेतला. चर्चा, सहभाग व विचार लिहिणे यावर एकंदर शिबिराचा भर होता. खेळ, छोट्या नाटिका व त्यांत प्रत्येकाने एक भूमिका घेणे या पद्धतीत चर्चेस तोंड फुटावयाचे.

प्रशिक्षार्थींची पाच गटांत विभागणी करण्यात आली प्रत्येक गटाने सावकार, तलाठी, फॉरेस्टर, आदिवासी-उपाययोजना, दूधयोजना इत्यादींशी संबंधित नाटिका बसविल्या. त्यानंतर शिक्षकांच्या मदतीने प्रसंगातील महत्त्वाचे शब्द हेरण्यात आले व त्या शब्दांचा साक्षरता टिकविण्यासाठी उपयोग करण्यात आला. सावकार व पोलिसइन्स्पेक्टरचे संबंध, त्याला मिळणारी मित्रत्वाची वागणूक, गरीब आदिवासींना मिळणारी वागणूक, त्यांच्या समस्या या नाटिकेत मांडल्यावर त्यांतील शब्द–सावकार, प्रेमाची वागणूक, मारझोड इत्यादि बोर्डावर लिहिण्यात आले व त्या शब्दांच्या संदर्भात सामाजिक परिस्थितीची चर्चा करण्यात आली.

दारिद्रय, सभा, भ्रष्टाचार, अन्याय, नेतृत्व, आरोग्याचे प्रश्न अशा सामाजिक तणावांची जाणीव करून देण्यासाठी वेगवेगळे खेळ खेळण्यात आले. स्पर्धा, संघर्ष व सहकार हे निरनिराळे दृष्टिकोण समाज त कसे भिनलेले असतात हे दाखविण्याचा प्रयत्न या खेळांमार्फत करण्यात आला.

व्यक्तिविकासासाठी आपल्या परिसरातील वस्तूंचे निरीक्षण करून फूल, फळ, दगड इ. वस्तूंच्या गुणांची जंत्री तयार करण्यात आली. प्रत्येक व्यक्तीने आपल्यात त्यापैकी कोणते गुण आहेत ते कागदावर मांडून त्यावर विचार केला. जसे फूल सुंदर असते तशीच व्यक्तीही सुंदर व कोमल असते.

प्रौढशिक्षण कार्यक्रमाची चर्चा जमीन, जंगलजमीन, कायदेशीर सल्ला, निरीक्षण इत्यादींच्या संदर्भात करण्यात आली. तसेच सरकारी व स्वयंसेवी संस्थांची त्याबाबतची भूमिका व कार्य याबाबतही चर्चा झाली. अभ्यासक्रमाचे विश्लेषण करून त्याबाबत प्रत्येक गटाने पाठ सादर केला. गाणी, कठपुतळीचे खेळ व शिक्षण देण्याच्या कल्पनेवर चर्चा झाली. रोज रात्री, प्रशिक्षार्थींनी स्वतः रचलेली गाणी, नाटिका वगैरे प्रस्तुत केल्या. अशा तऱ्हेने हसत–खेळत सामाजिक जाणिवांच्या संदर्भात साक्षरतेचे प्रशिक्षणशिबिर भरविण्यात आले. ❋

# लोकविज्ञान

हाकारा त्रैमासिकाच्या शिक्षणविशेषांकाच्या निमित्ताने महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, बंगलोर, यांच्या सहकार्याने एक विज्ञानप्रकल्प सुरू करीत आहे. या प्रकल्पामधे आदिवासी भागातील शाळांमधील विज्ञानशिक्षक, विद्यार्थी व इतर उत्साही मंडळींना भाग घेता येईल. या प्रकल्पाचा पहिला टप्पा म्हणून वनस्पतींच्या अभ्यासाचा आराखडा सोबत दिला आहे. हा अभ्यास विविधांगी आहे. त्यात चित्रकला आहे. ( वनस्पतीच्या भागांची चित्रे काढणे ), गणित व संख्याशास्त्र आहे. वृक्षांची उंची व घेर मोजणे, दर एकरी प्रमाण काढणे.) समाजशास्त्र आहे. ( वनस्पतींचे आर्थिक, सामाजिक, धार्मिक उपयोग नोंदणे ). निसर्गशास्त्र (ecology) आहे. (विशिष्ट वनस्पतींना अनुकूल परिस्थिती, तिचे साथी यांचे निरीक्षण) इत्यादि. या अभ्यासात प्रत्यक्ष जंगलात जाऊन निरीक्षण करणे व वहीत नोंदविणे, वेगवेगळे नमुने शाळेत आणून अभ्यासणे व त्यावर चर्चा करणे, आदिवासी, शेतकरी वगैरेंना भेटून त्यांच्या मुलाखती घेणे अशा गोष्टी अभिप्रेत आहेत.

हे काम भाग घेणाऱ्या सर्व लहान–मोठ्यांनी सहकाराने करावयाचे आहे. शेवटी संपूर्ण अभ्यासावर आधारित असा अहवाल तयार करून मानव विज्ञान परिषदेकडे पाठवायचा आहे.


या अभ्यासात खर्चाची अशी विशेष बाब नाही. माहिती नोंदविण्यासाठी जे चक्रमुद्रित फॉर्म लागतील ते मानवविज्ञानपरिषद गरज वाटल्यास पुरवू शकेल. हवी आहे ती अभ्यासाची इच्छा व जिद्द. अशा अभ्यासातून निष्पत्ती काय होणार ? एक म्हणजे आजचा विज्ञानाचा अभ्यासक्रम हा प्रयोगशाळा, न परवडणारी उपकरणे व रसायने, अपरिचित सिद्धान्त यात अडकून गेला आहे. मागास भागातील शाळांत हा प्रश्न फारच अवघड बनतो. त्याऐवजी या प्रकल्पातून प्रत्यक्ष निसर्गाच्या निरीक्षणामधून, जीवनाशी निगडित बाबींच्या संदर्भात विज्ञान जोपासता येईल. यातून न जाणो भावी वैज्ञानिकही घडतील. त्याचप्रमाणे आज सामान्य माणसांना माहीत असलेले अनेक निसर्गनियम की ज्यांची शास्त्रज्ञांनाही पुरेशी जाण नाही, उजेडात येतील. विज्ञानाच्या प्रगतीला हातभार लागेल. या प्रकल्पातून गोळा होणाऱ्या माहितीचे विश्लेषण इंडियन इन्टिटयूट ऑफ सायन्स, बंगलोर, यांच्या मदतीने करण्यात येईल व काही अज्ञात माहिती उजेडात आल्यास वैज्ञानिक मासिकातून प्रसिद्ध करण्यात येईल. ती गोळा करणाऱ्या गटांना प्रशस्तिपत्रकेहि दिली जातील.

तेव्हा पुढच्या आराखडा वाचून पहा. असे काही करावेसे वाटत असेल तर आम्हाला पत्र लिहा. त्यात तुमचे नाव, पत्ता, संस्थेचे नाव, कितीजण अभ्यास करणार, कोणत्या काळात, पूर्वानुभव वगैरे सविस्तर माहिती द्या. आमच्याकडून मदत हवी असल्यास तसे कळवा. आम्ही तुमच्या गटाचे नाव नोंदवून घेऊ.

–संपादक



# जीवनोपयोगी वनस्पती



डॉ. माधव गाडगीळ

मानवाचे जीवन त्याच्या सभोवतालच्या वनस्पति-जीवनावर अनेक प्रकारे अवलंबून आहे. अन्न, औषधी, चारा, निवारा आणि मनोरंजनासारख्या अनेक गोष्टींसाठी तो वनस्पती वापरतो. यातील अनेक वनस्पती त्याने मुद्दाम जोपासलेल्या असतात. उदाहरणार्थ जोंधळा, आंबा, तुळस; परंतु याखेरीज आपोआप निसर्ग-क्रमाने वाढलेल्या अनेक वनस्पती आपण उपयोगात आणतो. अशा वनस्पतींबद्दलचे आपले ज्ञान फारच तुटपुंजे आहे आणि हे ज्ञान मुख्यत: ग्रामीण आणि आदिवासी भागात राहणाऱ्या जनतेच्याच आधीन आहे. हे ज्ञान संकलित करून कायमचे उपयोगात आणण्याचा प्रयत्न करणे फार महत्त्वाचे आहे. याची मुख्य कारणे दोन. पहिले म्हणजे आपल्या वनस्पतिजीवनाचा आणि तसेच पारंपरिक जीवनपद्धतींचा जसजसा नाश होतो आहे, तसतसे हे ज्ञान झपाट्याने लयाला चालले आहे. दुसरे म्हणजे आज वनविकासाचा सर्व भर औद्योगिक आणि नागरक्षेत्राच्या गरजा पुरवण्यावर आहे त्यामुळे वनविज्ञात्यांनी शास्त्रीय संशोधनाचा सर्व भर सागवानासारख्या झाडांच्या अभ्यासावर दिला आहे आणि जनतेच्या जीवनोपयोगी वनस्पतींकडे फारच कमी लक्ष पुरवले आहे; परंतु वनसंवर्धनाचे उद्दिष्ट केवळ नागर आणि औद्योगिक क्षेत्रांच्या गरजा पुरविणे हे नाही. आता हळूहळू सामाजिक गरजा पुरविण्यासाठी वनसंवर्धनाचे प्रयत्न जेव्हा सुरू होतील तेव्हा जीवनोपयोगी वनस्पतींची माहिती ही फार महत्त्वाची ठरेल. तेव्हा आज तशी ही बव्हंशी आदिवासी व ग्रामीण जनतेच्या आधीन असलेली माहिती ग्रथित करणे हे समाजोपयोगी कार्य आहे.

हे समाजोपयोगी कार्य हे वनस्पतिशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे शास्त्रीय कार्यही आहे. तेव्हा चटकन उपलब्ध न होणाऱ्या उपकरणांच्या व रसायनांच्या सहाय्याने जुने-जुने शास्त्रीय प्रयोग करत बसण्यापेक्षा ही नवी आणि महत्त्वाची शास्त्रीय माहिती संकलित करणे हे आदिवासी आणि ग्रामीण भागांतील शाळांच्या विज्ञान-शिक्षणाच्या कार्यक्रमाचा फारच उपयुक्त भाग होऊ शकेल.

ही माहिती आपण खालीलप्रमाणे गोळा करू शकू.

(१) भौगोलिक : गाव, तालुका, जिल्हा, लोकसंख्या, गावातील वेगवेगळे समाज व प्रत्येक समाजाची कुटुंब-संख्या, प्रत्येक समाजाचे पारंपरिक व आजचे व्यवसाय, प्रत्येक समाजाकडे किती शेतजमीन आहे ?

गांवाच्या आसपासचा भूप्रदेश डोंगराळ अथवा सपाट आहे. जवळपासचे ओढे, नदी-नाले, पर्जन्य-मान पडीक आणि जंगल जमिनीवर कितपत झाडोरा व झाडी आहे.

गावाच्या आसपासच्या भूप्रदेशाचे रेखाचित्र विद्यार्थ्यांकडून चित्रकलेच्या तासात काढून घ्यावे.

## वनस्पतींची माहिती

वेगवेगळ्या जातीच्या सर्व जीवनोपयोगी वनस्पतींबद्दल खालील माहिती गोळा करावी.

१) वनस्पतीची प्रचलित नावे.

२) ही वनस्पती केवळ हंगामापुरती जगते का अनेक वर्षे जगते ?

३) ती वनस्पती अगदी लहान भाजीपाल्यासारखी आहे, झुडूप आहे, वेल आहे, मध्यम आकाराचे झाड आहे का मोठा वृक्ष आहे ? वनस्पतीचे चित्र.

४) जमिनीखाली तिला काही कंद आहे काय ?

कंदाचे चित्र.

५) तिला काटे आहेत काय ? असल्यास ते केवढचा आकाराचे आहेत ? पानावर, खोडावर, फळावर अथवा कोठे आहेत ? काटचाचे चित्र.

६) वनस्पतीची पाने काय आकाराची आहेत ? पानगळ होते काय ? कोणत्या महिन्यात ? पानाचे चित्र.

७) वनस्पतीची फुले काय आकाराची, रंगाची, वासाची आहेत ? कोणत्या महिन्यात फुले येतात ? फुलांचे चित्र.

८) वनस्पतीची फळे काय आकाराची, चवीची आहेत ? टणक का मऊ ? त्यांना गर आहे काय ? फळे केव्हा येतात ? फळांचे चित्र.

९) वनस्पतीची साल सोलता येते का ? ती गुळगुळीत आहे का खडबडीत आहे ? तिच्यावर मोठचा भेगा आहेत काय ? सालीचे चित्र.

१०) वनस्पतीची उंची, खोडाचा व्यास (जमिनीजवळ व उंच असल्यास १३० सें. मी. उंचीवर)

११) ही वनस्पती कशा परिस्थितीत वाढते ? डोंगरउतारावर, डोंगरमाथ्यावर, सपाटीवर, ओढचा—नदीजवळ अथवा लांब, पाण्यात, चिखलात अथवा पूर्ण कोरडचा जमिनीत, खडकाळ, मुरमाड अथवा चांगल्या मातीत, दुसऱ्या झाडांवर अथवा स्वतंत्रपणे, उघडचावर, थोडचा किंवा दाट सावलीत ?

१२) या वनस्पतीच्या परिसरात आढळणाऱ्या इतर महत्त्वाच्या वनस्पतींची नावे.

१३) ही वनस्पती आढळते असा किती हेक्टर भू-प्रदेश गावाजवळ आहे ?

१४) प्रत्येक हेक्टरात साधारणतः किती वनस्पती असतात ?

१५) ह्या वनस्पतीचा उपयोग काय होतो ?

(क) जळण म्हणून—स्वयंपाकासाठी, विटा भाजण्यासाठी, इतर काही कामासाठी ? (ख) खाद्य किंवा पेय म्हणून—फळ, फूल, पान, कंदमुळे, कोंब — काय खाता अथवा पिता ? (ग) मसाल्याचा जिन्नस म्हणून, (घ) घरबांधणीसाठी — खांब, तुळई, भिंती, दारे, खिडक्या, छप्परशाकारणी, इतर काही कामासाठी ? (च) कुंपण, गोठा, इतर काही बांधणीसाठी, (छ) पावसाळचासाठी इरली बनविण्यासाठी (ज) दोर, दोरखंड बनविण्यासाठी (झ) नांगर, औते, भाले, काठचा, लोटे, कणग्या, टोपली बनवण्यासाठी ? (ट) औषधासाठी — मनुष्यांच्या, गुरांच्या ? कोणत्या जखमेसाठी अथवा रोगासाठी हे औषध वापरता ? (ठ) माशांना भूल देण्यासाठी ? पक्षी-पशू पकडण्यासाठी चीक, सापळे बनवण्यासाठी ? (ड) गुरांना चारा म्हणून—गुरे स्वतः खातात का तोडून घालता ? गोठचात आणून घालता? (ढ) अंमली पेय अथवा इतर काही नशेसाठी ? (ण) शोभेसाठी—डोक्यात घालण्यासाठी फुले अथवा गळचातील माळा किंवा इतर उपयोगासाठी ? (त) काही करमणुकीखातर ? सागरगोटे किंवा बासरी किंवा इतर काही उपयोग ? (थ) कपडे अथवा अंग धुण्यासाठी ? (द) काही तेल काढण्यासाठी ? तेलाचा काय वापर करता ? (ध) निवारा — सावलीसाठी ? मचाण बांधण्यासाठी ? (न) देव—धर्म, पूजे—अर्चेच्या कामासाठी ? (प) इतर काही उपयोग ?

१६) ह्या वनस्पतीचा कोणता भाग उपयोगात आणता ?

१७) ही वनस्पती कोणत्या महिन्यात उपयोगास येते ?

१८) एका वनस्पतीपासून दरवर्षी उपयुक्त भाग किती मिळतो ? किती ग्रॅम अथवा किलोग्राम ?


१९) ह्या वनस्पतीचा उपयोग—

(क) केवळ घरात होतो ? (ख) केवळ जमा करून मजुरी मिळते ? (ग) बाजारात नेऊन विकता ?

२०) ही वनस्पती गोळा करण्याची काही विशिष्ट समाजाची पद्धत आहे का सर्वच समाज तिचा वापर करतात ?

२१) ही वनस्पती तुमच्या गावातील लोकांच्या दृष्टीने कितपत महत्त्वाची आहे ?

(क) क्षुल्लक (ख) मामुली (ग) बरीच (घ) विशेष (च) नितांत गरजेची ?



## गोदड

१.

माझी फाटकी गोदड
मळलेली.
याच गोदडीत
पूर्वज विझत गेले
अश्रुने गोदड भिजत गेली
आणि
आंबट वास
आठवण देत राहिला
पूर्वज दु:खांची
आजच्या वारसदारांना.

गोदडीतल्या-गोदडीत
गुदमरत राहिलो
आंबट वासाने नाक
खाली-वर करून
कुशि बदलत राहिलो
गोदडीत नाक खुपसून
आंबट वास सोसत राहिलो
माझी फाटकी गोदड
मळलेली !

२.

सत्तेच्या हिरव्या पानाखाली
झोपा घेणारे बगळे
झोपेशी भांडत आहेत
आणि त्यांच्या पाठिंब्यावर
लचके तोडणाऱ्यांना–
धडकी भरली आहे.
'त्या'–
हिरव्या पानांचा रस
जखमांना
बरे करू शकले नाही
आश्वासनाच्या–
फुगलेल्या फोडामधून
'रक्त-पू' वाहून निघत आहे
हांका जखमांच्या

## कोर्ट

३.

दरवाजा खुला साक्षीला नि
खिडक्या बंद करून येतो
चोरटा आवाज खिदळण्याचा
'देवाची शपथ
खोटं बोलणार नाही'
म्हणत-म्हणत सुटून गेले
अनेक गुन्हेगार
याच कोर्टातून
निर्दोष होऊन.
आणि–
कायद्याचे माय-बाप
टूटलेल्या धाग्यांना
गाठ मारून
जाळे विणतात
कोळयाच्या जाळयाप्रमाणे
जिव जंतू-दुर्बलांना अडकविण्यासाठी।
पण, कायदा म्हणतो–
'मी सर्वांसाठी!'
दुर्बल जीव
मोजत नाही
कायद्याची लंबाई
न्यायमूर्तीच्या हृदय
चौकटीत.


४.

पोट भरून खा बरं
अश्रु? अश्रुचे काय
हे तर रोजच वाहत राहतात
तुम्ही जेवा पोट भरून....
...आणि कुशितून
पोरगा कटाक्ष मारला
माझ्या पहिल्या घासावर

**–वाहरू सोनावणे**
[श्रमिक संघटना
शहादा, जिल्हा धुळे]



# आदिवासी मतदारसंघातील मतदानप्रवाह



आदिवासी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि सांस्कृतिक व वांशिक वैशिष्ट्ये असलेल्या जमातींची भारतातील १९७१ च्या शिरगणतीप्रमाणे संख्या एकूण लोकसंख्येच्या ७% आहे. ह्या जमाती प्रामुख्याने उत्तर-पूर्वभारत, मध्यभारत आणि पश्चिम भागामध्ये विखुरलेल्या असून त्यांची वस्ती विशेषतः ग्रामीण विभागातच आहे. १९६१ साली फक्त २·६% आदिवासी शहरी विभागात राहात होते.

भारत स्वतंत्र झाला त्या वेळी या जमाती बहुतांश इतर भारतीय जनतेपेक्षा बहुतेक सर्व क्षेत्रांत (उदा. शिक्षण, आरोग्य, राजकीय जागृती इ.) मागासलेल्या होत्या. त्यांच्या स्वतंत्र अशा समस्या होत्या आणि त्यांच्यात नेत्यांचा अभाव होता. अशा परिस्थितीत त्यांच्या हितसंबंधांची योग्य जपणूक व्हावी, त्यांच्या समस्या सोडविण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न व्हावे या दृष्टीने त्यांना घटनेमध्ये विशेष स्थान देण्यात आले. उत्तरपूर्वेकडील बहुसंख्य आदिवासी लोक असणारे प्रदेश केंद्र शासनाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली ठेवण्यात आले व उरलेल्या प्रदेशांना घटनेच्या ५ व्या परिशिष्टात अंतर्भूत करण्यात येऊन ते प्रदेश ज्या राज्यांच्या कक्षेत येतात त्या राज्यांच्या राज्यपालांवर तेथील आदिवासी जनतेच्या सर्वांगीण उन्नतीवर विशेष लक्ष ठेवण्याची जबाबदारी सोपविण्यात आली.

स्वातंत्र्याच्या संधिकाळात आदिवासींमध्ये मुख्यतः तीन प्रकारचे विचारप्रवाह प्रचलित होते. ते असे :

(१) फुटीर (separatist) वृत्ति म्हणजे भारतापासून पूर्णपणे स्वतंत्र होण्याची महत्त्वाकांक्षा.

(२) भारतांतर्गत परंतु आदिवासी बहुसंख्य असणाऱ्या स्वायत्त राज्याची स्थापना.

(३) स्वातंत्र्याच्या वेळी ते ज्या संस्थानिकांच्या आधिपत्याखाली होते त्या संस्थानिकांबद्दल राजनिष्ठा.

पहिल्या प्रकारची महत्त्वाकांक्षा प्रामुख्याने उत्तर-पूर्वेकडील आताच्या नागालँड, मेघालय, अरुणाचल-प्रदेश आणि मिझोराम या नावाने ओळखल्या जाणाऱ्या राज्यांमधील आदिवासी जमातींची होती आणि स्वातंत्र्यानंतरही सतत चळवळ करून शेवटी त्यांनी आपली स्वतंत्र राज्ये निर्माण करून घेतली व भारतीय घटना मान्य करून भारताचा एक भाग म्हणून राहण्याचे मान्य केले. अजूनही मिझोराममध्ये अधूनमधून फुटून निघण्याचा प्रश्न डोके वर काढीतच असतो.

दुसऱ्या प्रकारची वृत्ती दक्षिण बिहार, ओरिसा व मध्यप्रदेशच्या पूर्वभागातील जमातींमध्ये होती या विभागांच्या जवळपणाने येथील जमातींमध्ये दळणवळण होते व थोडेफार सांस्कृतिक साधर्म्यही. त्यामुळे त्यांनी झारखंड नावाच्या स्वतंत्र राज्याच्या मागणीसाठी पुष्कळ दिवस चळवळ केली. आता ही चळवळ जवळ-जवळ थंडावली आहे. कारण ही चळवळ करणाऱ्या झारखंड पार्टीच्या कित्येक कार्यकर्त्यांना काँग्रेसने आपल्याकडे ओढण्यात यश मिळवले आहे.

तिसरी वृत्ती राजनिष्ठेची. मध्यप्रदेश आणि राजस्थानमधील बरीच आदिवासी लोकसंख्या भूतपूर्व संस्थानिकांच्या राज्यात राहात होती. अशिक्षित आदिवासींच्या मनातील राजा हा ईश्वरी अंश आहे ही भावना आणि काही राजांनी त्यांना सहानुभूतीची

वागणूक देऊन त्यांच्या मनात स्वतःबद्दल निर्माण केलेले श्रद्धा व प्रेम यामुळे हे आदिवासी त्यांच्या संस्थानी राजांबद्दल निष्ठा बाळगून असत. संस्थाने विलीन झाल्यानंतर सुद्धा ही श्रद्धा बहुतांश टिकून आहे.

स्वातंत्र्यपूर्वकाळात आदिवासींचे तत्कालीन ब्रिटिश राजवटीशी संघर्ष झाले; पण ते फार मर्यादित उद्दिष्टांकरिता होते. त्यांचा एकंदर ब्रिटिशांविरुद्धच्या राष्ट्रीय स्वातंत्र्य–लढ्याशी विशेष संबंध नव्हता. उलटपक्षी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मणिपूर आणि नागा टेकड्यांतील जमातींनी ब्रिटिश सरकारला जपानविरुद्ध लढण्यात खूप महत्त्वाची मदत केली होती.

आदिवासींना, ते ज्या राज्यात राहातात त्या राज्याच्या कारभारात त्यांच्या लोकसंख्येच्या मानाने प्रतिनिधित्व मिळावे म्हणून घटनेत तरतूद केली आहे. त्यानुसार एकूण भारतातील सर्व विधानसभांच्या सभासदसंख्येपैकी ७·४% जागा १९६७ च्या निवडणुकीच्या वेळी आदिवासींकरिता राखून ठेवण्यात आल्या होत्या. लोकसंख्यावाढीच्या प्रमाणात एकूण जागांच्या संख्येत अधूनमधून वाढ होते. तेव्हा आदिवासींच्या सुरक्षित जागांमध्येही त्या प्रमाणात वाढ करण्यात येते.

स्वातंत्र्योत्तर काळात निरनिराळे राजकीय पक्ष आदिवासींमध्ये आपापल्या पक्षाचा प्रभाव पाडण्याचा जारीने प्रयत्न करू लागले आणि तेव्हापासूनच या जमातीमध्ये राजकीय जाणिवांचा वाढत्या प्रमाणावर प्रादुर्भाव होऊ लागला. या जाणिवांचे प्रतिबिंब प्रत्यक्ष मतदानात कसे पडते याचा स्वातंत्र्योत्तर काळात १९७२ पर्यंत झालेल्या निवडणुकांच्या उपलब्ध आकडेवारीच्या अनुरोधाने झालेला अभ्यास उद्‌बोधक आहे. असा अभ्यास, अमेरिकेमधील 'मॅसॅच्युसेटस् इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी' येथील राज्यशास्त्राचे प्राध्यापक श्री. मायरन् वेनर (Mr. Myran Weiner) आणि त्याच संस्थेतील आंतरराष्ट्रीय अभ्यासकेंद्रातील संशोधनसहाय्यक श्री. जॉन ऑसगुड फिल्ड (John Osgood Field) यांनी केला आणि आपले निष्कर्ष १९७५ साली 'भारतीय राज्यातील निवडणुकांचे राजकारण' (Electoral Politics in Indian States) या नावाच्या पुस्तकात प्रसिद्ध केले. त्यांनी आदिवासींच्या बाबतीत पुढील प्रश्न उपस्थित केले. आणि निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीचे संख्याशास्त्रदृष्ट्या विश्लेषण करून त्यांची उत्तरे मिळविण्याचा प्रयत्न या संशोधनकार्यात केला आहे. ते प्रश्न असे.

(१) आदिवासी इतर भारतीयांइतकेच निवडणुकामध्ये सहभागी होतात काय ? निवडणूकप्रक्रियेमध्ये ते इतर भारतीयांप्रमाणेच एकजीव झाले आहेत काय ? म्हणजेच ज्या स्थानिक तात्कालिक कारणांमुळे भारतीयांच्या सहभागात चढउतार होतो त्याच कारणांमुळे आदिवासींच्या सहभागात चढउतार होतो काय ?

(२) आदिवासी एकसंध राजकीय शक्ती म्हणून वागतात काय ? निवडणुकीतील सहभागाच्या बाबतीत ते इतर भारतीयांच्या तुलनेने एकसंध दिसतात काय ? ते गटागटाने मतदान करतात काय ?

(३) आदिवासी केवळ आदिवासींच्या पक्षांना मते देतात की इतर स्थानिक व प्रादेशिक पक्षांनाही मते देतात ? कॉंग्रेस किंवा इतर राष्ट्रीय पक्षांना इतर भारतीय ज्या प्रमाणात मते देतात त्या प्रमाणात ते मते देतात काय ?

राज्यकारभारात प्रतिनिधित्व मिळाल्यामुळे आदिवासी पूर्वी उल्लेख केलेल्या मूळच्या तीन प्रवृत्ती–फुटीर, स्थानिक स्वायत्ततावादी आणि राजनिष्ठा यापासून मुक्त झाले आहेत काय? असल्यास त्यांची जागा कशाने घेतली आहे ?

(४) वरील तिन्ही प्रश्नांच्या बाबतीत आदिवासी जमातीजमातींमध्ये काही फरक दिसतात काय ? काही जमाती अधिक मोठ्या संख्येने इतर जमातींपेक्षा भाग घेतात काय ? काही इतर जमातींपेक्षा अधिक एकसंध आहेत काय ? काही अधिक राष्ट्रीय वृत्तीच्या आहेत काय ?

निवडणुकांतील मतदानाच्या आकडेवारीची तुलना करताना आदिवासी संघांची बिगर आदिवासी ग्रामीण मतदारसंघांशी तुलना केली आहे. कारण बहुतेक आदिवासी ग्रामीण भागातच राहातात.

१९५२ पासून १९७२ पर्यंत झालेल्या निवडणुकांमधील मतदानाच्या आकडेवारीचा आदिवासी व बिगर-आदिवासी मतदारांच्या सहभागाच्या दृष्टीने अभ्यास करता असे आढळून आले की, १९५२ मध्ये बिहारचा अपवाद वगळता, आदिवासी मतदानाची टक्केवारी इतर भारतीयांच्या मतदानाच्या टक्केवारीपेक्षा सतत कमी होती. राज्याराज्यांमध्ये ही तफावत कमीजास्त होती.

नमुन्याकरिता १९६२ आणि १९६७ या दोन निवडणुकांची टक्केवारी खाली दिली आहे :

| निवडणूक वर्ष | आदिवासी मतदारसंघातील मतदान | इतर भारतीय ग्रामीण मतदारसंघातील मतदान |
|---|---|---|
| | टक्के | टक्के |
| १९६२ | ४० | ५३ |
| १९६७ | ४४ | ५९ |

बिगरआदिवासी मतदारसंघातून मतदानाचे प्रमाण काही तुरळक अपवाद वगळता सतत वाढते आहे. आदिवासी भागात मात्र हे प्रमाण कमीजास्त झाल्याचे आढळले; पण सर्वसामान्यपणे कुठल्याही राज्यात ते बिगरआदिवासी ग्रामीण मतदारसंघातील मतदानापेक्षा जास्त झालेले नाही.

१९७२ च्या निवडणुकांत बिगरआदिवासी व आदिवासी मतदारसंघातील मतदान टक्केवारीतील काही मुख्य राज्यांतील तफावत पुढीलप्रमाणे होती :

बिहार–२१%, ओरिसा १९७१–१५%, महाराष्ट्र १३%, गुजरात–११%, मध्यप्रदेश–१०%, आसाम–४%, प. बंगाल–३%.

आणखी एक गोष्ट या अभ्यासात लक्षात आली की आदिवासी ज्या राज्यांत राहातात त्या राज्यांतील बिगरआदिवासी ग्रामीण मतदारसंघातील मतदानाचे प्रतिबिंब आदिवासी संघांच्या टक्केवारीत दिसते.

उदा. ओरिसामध्ये बिगरआदिवासी मतदानप्रमाण इतर राज्यांच्या तुलनेने कमी असले तर तेथील आदिवासी मतदारसंघातील मतदानाचे प्रमाणही त्या प्रमाणातच कमी असते.

आंध्रप्रदेश व महाराष्ट्रात बिगरआदिवासी मतदानप्रमाण राष्ट्रीय सरासरीच्या वर असते, तर त्या राज्यातील आदिवासी मतदारसंघातील मतदानाचे प्रमाणही राष्ट्रीय सरासरीच्या वर असते.

सर्वसाधारणपणे भारतातील निवडणुकांमध्ये स्पर्धा कमी असते म्हणजेच जिंकणारा आणि त्याचा निकटतम प्रतिस्पर्धी यांना मिळालेल्या मतसंख्येत बरीच तफावत असते.

| निवडणूक वर्ष | जिंकणारा व त्याचा निकटतम स्पर्धक यांच्या मतांमधील फरकाची एकूण मतांशी टक्केवारी | |
|---|---|---|
| | आदिवासी संघ | बिगरआदिवासी संघ |
| १९५७ | २५% | १९% |
| १९६२ | २०% | १८% |
| १९६७ | २०% | १७% |

वरील आकड्यांवरून हे स्पष्ट होते की दोन्ही प्रकारच्या मतदारसंघांत स्पर्धा कमीच असते; पण आदिवासीसंघातील स्पर्धा तुलनात्मकदृष्ट्या अधिक कमी असते. याचे कारण आदिवासी मतदारसंघातील आदिवासी मतदार अधिक एकसंधपणे मतदान करतो हे असू शकेल.

ज्या मतदारसंघात आदिवासींचे लोकप्रिय पक्ष अस्तित्वात असतात तिथे पूर्णपणे आदिवासी संघात ( Core constituency ) यशाचे प्रमाण खूपच अधिक आढळते. याउलट मिश्र आदिवासी राखीव संघात मात्र स्पर्धा वाढते. कारण बिगरआदिवासी, आदिवासींच्या पक्षाच्या उमेदवाराला मत द्यायला विशेष उत्सुक नसतात; पण आदिवासी मतदानाची शेकडेवारी मात्र इतर संघांच्या तुलनेने जास्त नसते. याचा अर्थ असा की पक्षामुळे आदिवासी मतदारांची एकसंधता वाढलेली दिसते.

## आदिवासींची पक्षनिवड

खालील कोष्टकात काँग्रेसला १९७२ च्या निवडणुकीत बिगरआदिवासी ग्रामीण आणि आदिवासी राखीव मतदारसंघात निरनिराळ्या राज्यांत मिळालेल्या मतांची टक्केवारी दिली आहे.

| राज्य | आदिवासी संघ | बिगरआदिवासी संघ |
|---|---|---|
| आसाम | ५३% | ५३% |
| बिहार | ३६% | ३६% |
| मध्यप्रदेश | ४७% | ४९% |
| ओरिसा | २७% | २८% |
| गुजराथ | ५४% | ५०% |
| महाराष्ट्र | ५८% | ५७% |
| राजस्थान | ४७% | ४१% |

वरील कोष्टकावरून एक गोष्ट स्पष्ट दिसते की, स्थूल मानाने १९७२ मध्ये काँग्रेसला आदिवासी आणि बिगरआदिवासी ग्रामीण भागात सारखीच मते मिळाली. बहुतेक भागात, बहुतेक निवडणुकांमध्ये काँग्रेसचे यशापयश आदिवासी आणि बिगरआदिवासी ग्रामीण मतदारसंघात स्थूलमानाने सारखेच राहिले आहे. याला लक्षणीय अपवाद आसाम १९५७ आणि १९६२ च्या निवडणुका, बिहार १९७२ पूर्वीच्या सर्व निवडणुका आणि ओरिसामधील पूर्णपणे आदिवासीसंघांमधील सर्व निवडणुकांचा आहे. याचे कारण या राज्यांमध्ये १९७२ पर्यंत स्थानिक आदिवासीपक्ष कार्यक्षम होते. असे असले तरी वरील तिन्ही राज्यांत बिगरआदिवासीसंघातील काँग्रेस मतदानाच्या संख्येतील चढउतार त्या त्या राज्यातील आदिवासीसंघातील काँग्रेसच्या मतदानातील चढउताराच्या स्वरूपात प्रतिबिंबित होतो आदिवासींवरील महाराजांच्या प्रभावाच्या बाबतीत निवडणूक आकडेवारी निश्चित असा प्रकाश टाकत नाही. प्रत्येक पार्टी त्या त्या भागातील आदिवासींवर पकड असणाऱ्या महाराजांना आपल्या पार्टीत ओढण्याचा प्रयत्न करते आणि महाराजाने पुरस्कार केलेल्या आदिवासीला आपला उमेदवार करते. तरी पण नेहमी असे उमेदवार निवडून येतीलच असे नाही. सामान्यपणे त्या राज्यात बिगरआदिवासी भागात निरनिराळे पक्ष ज्या प्रमाणात मते मिळवितात तेच प्रमाण आदिवासी उमेदवाराच्या बाबतीतही आढळते.

ज्या विभागात आदिवासींचे पक्ष नाहीत ते विभाग सोडून १९७२ च्या निवडणुकीपर्यंत काँग्रेसच सर्वत्र आघाडीवर होती. याला मध्यप्रदेशामध्ये जनसंघ, राजस्थान आणि ओरिसामध्ये स्वतंत्र आणि त्रिपुरामध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट हे अपवाद आहेत. स्थानिक आणि राज्य पातळीवरील पक्ष आदिवासींवर जवळजवळ मुळीच प्रभाव पाडू शकलेले नाहीत.

आदिवासींच्या मतदानप्रणालीची अनेक दृष्टिकोनांतून आकडेशास्त्रीय छाननी केल्यानंतर वर उपस्थित केलेल्या चार प्रश्नांना ठोकळमानाने खालील उत्तरे संशोधकांना मिळाली.

(१) बहुतेक सर्व राज्यांत १९७२ पर्यंतच्या सर्व निवडणुकांमध्ये आदिवासीसंघातील मतदान बिगरआदिवासी ग्रामीण संघातील मतदानापेक्षा कमी प्रमाणात झाले. बिगरआदिवासी संघात १९५२ नंतर मतदानाचे प्रमाण बहुतेक राज्यांत वाढले तसे ते आदिवासीसंघातही वाढले; पण वाढीचा वेग कमी होता' आदिवासी आणि बिगरआदिवासी संघांतील मतदानाच्या प्रमाणातील तफावत पुष्कळ राज्यांत वाढली आहे.

(२) आदिवासी एकगठ्ठा मतदान करतात, या विधानाला पोषक पुरावा मिळत नाही. आदिवासी संघामध्ये बिगरआदिवासी संघापेक्षा अधिक मताधिक्य विजयी उमेदवाराला मिळते; पण हे आधिक्य बेताचेच असते. काही राज्यांत हा फरक नगण्य असतो. याला अपवाद आसाम, मेघालय, मिझोराम व बिहारमधील पूर्णत: आदिवासी मतदारसंघांचा आहे. कारण तेथे कार्यक्षम आदिवासीपक्ष आहेत. आदिवासीपक्षाचा उमेदवार जिंकतो तेव्हा त्याचा विजय खूपच अधिक मतांनी होतो आदिवासीपक्ष आपल्या क्षेत्रात मतदानाचे प्रमाण मात्र लक्षणीय प्रमाणांत वाढवू शकत नाहीत.

(३) अखिल भारताचा विचार करता कोणत्याही एका राजकीय पक्षाने आदिवासींवर विशेष उठून दिसण्याइतका प्रभाव पाडलेला दिसत नाही.

ज्या विभागात आदिवासीपक्ष कार्यरत आहेत त्यांना वगळून इतर भागात आदिवासी मतदारसंघातील मते काँग्रेस, उजवे,डावे आदि पक्षांमध्ये निरनिराळ्या प्रमाणात विखुरली जातात.

(४) कोणत्याही राज्यातील आदिवासी मतदारसंघ आणि त्याच राज्यातील बिगरआदिवासी मतदारसंघ यामध्ये दोन भिन्न राज्यांतील आदिवासीसंघापेक्षा अधिक साम्य आढळते. ज्या राज्यात बिगरआदिवासी संघात मतदान भारताच्या सरासरीच्या दृष्टीने कमी होते त्या राज्यात आदिवासींचे मतदानही कमी प्रमाणात होते. कोणत्याही राज्यातील काँग्रेस अथवा इतर पक्षांचे आदिवासीसंघातील यशापयश त्याच राज्यातील बिगरआदिवासी संघातील यशापयशाशी मिळते–जुळते असते.

एखाद्या राज्यात काँग्रेस पक्षाचे यशापयश बिगरआदिवासी–संघात जेव्हा वाढते अथवा घटते तेव्हा त्याच राज्यातील आदिवासीसंघातही त्याच प्रमाणात प्रभाव पडतो.

[ श्री. वायनर व श्री. फिल्ड यांनी संपादित केलेल्या 'इलेक्टोरल पॉलिटिक्स इन् दी इंडियन स्टेटस्' (भारतीय राज्यांतील निवडणुकीचे राजकारण.) या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडातील 'हाऊ ट्रायबल कॉंस्टिटचुएन्सीज् इन इंडिया व्होट' या प्रकरणावर श्री. वि. आ. आपटे यांनी प्रस्तुत टिपण तयार केले आहे. ]

# कोसबाडच्या कार्यांचे मूल्यमापन

पुस्तक परीक्षण

आदिवासी कल्याण व विकासावर होण्याऱ्या खर्चाचे आकडे पाहिले म्हणजे आदिवासी विकास करण्याचा सरकारने चंगच बांधला आहे असा विश्वास वाटतो. सरकार, स्वयंसेवी संस्था व परदेशी संस्थांच्या पैशाचा ओघ आदिवासी विकास घडविण्याकडे व त्याबाबत प्रयोग करण्याकडे आहे हे उघड आहे. हे प्रयोग बहुतेक आदिवासी प्रदेशात न राहणारे लोक करीत असतात.

स्वातंत्र्यपूर्वकाळातील सेवाभावाच्या प्रेरणेने काम करणाऱ्या कोसबाडच्या दोन संस्थांचा आदिवासी परिसरावर काय परिणाम झाला याचे मूल्यमापन देशपांडे व कुलकर्णी यांच्या पुस्तिकेत पाहावयास सापडते. मुंबईहून अवघ्या ऐंशी मैलांवर डहाणू तालुक्यात कोसबाड टेकडीवर गोखले एज्युकेशन सोसायटीची ' कृषि–शिक्षण संस्था ' व नूतन बाल शिक्षण संघाचे ' ग्रामबाल शिक्षा–केंद्र ' शेतीशास्त्राचा प्रचार व आदिवासी बालकांच्या शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य करीत आहे. कृषि–शिक्षण संस्थेने दहाबारा वाड्यांवर मिळून शेतीच्या शंभर खासगी विहिरी खोदल्या आहेत. शिवाय सामुदायिक विहिरीही खणल्या आहेत. त्याचबरोबर भाताच्या नव्या जाती, कलमी फळझाडे, भाजीपाला इत्यादीसाठी नवीन बियाणी वाटली आहेत. त्याच्या परिणामस्वरूप विहिरीवाल्या वारल्यांचे परिवर्तनचित्र पहायला मिळते. एक पीक जाऊन भाजीपाला, फळझाडे व दुबार पीके आली आहेत; परंतु संस्थेचे कार्यकर्ते सांगतात की, बहुतेक आदिवासींचा पाठपुरावा करावा लागतो. संस्था नसेल तर स्थैर्य नाहीसे होण्याची धास्ती वाटते. जे चांगले शेतकरी आहेत ते संस्थेत नोकरीला आहेत. जमिनीचा कस व वकूब याबद्दल वारली शेतकरी व शास्त्रज्ञांत मतभेद आहेत. दारूचे व्यसन हे कारणही वारल्यांच्या मागासलेपणास कारणीभूत आहे. काही सांस्कृतिक अडचणीही आहेत. इतर आदिवासींप्रमाणे, वारली गाईचे दूध काढीत नाही. दूध वासराकरिता असते ही त्यांची ठाम भूमिका. पांढरे कोंबडे वारल्यांच्या देवाला चालत नाही. उद्याचा विचार न करणाऱ्या वारल्यांना शेतीपेक्षा रोज मिळणारी मजुरी जास्त प्रिय.

## नव्या कल्पना साकारल्या

ग्रामबाल शिक्षणकेंद्राने अनुभवातून शिक्षण देण्याचे वेगवेगळे मार्ग शोधून काढले. बालवाडी, अंगणवाडी, कुरणशाळा, विकासवाडी अशा नव्या कल्पना साकारल्या गेल्या. अनौपचारिक शिक्षणाचे अनेक प्रयोग झाले. लोकांच्या दारिद्र्यामुळे या शिक्षणाबरोबर आर्थिक उत्पादनाचा ध्यास या संस्थेने नेहमी उराशी बाळगला. शिक्षित वारल्यांत दारूचे प्रमाण कमी आहे, भुता–खेतांवरचा विश्वासही कमी झाला आहे; परंतु ते अजून समाजाचे नेतृत्व करावयास लागले नाहीत.

या पुस्तिकेच्या लेखकांच्या मते आदिवासींचा प्रश्न केवळ आर्थिक विकासाचा नसून त्यांचे शोषण थांबण्याचाही आहे. अर्थात, नुसत्या संघर्षाने प्रश्न सुटत नाहीत त्याबरोबर रचनात्मक कार्यासही वाव आहे व गरज आहे. त्यांचे शिक्षण जाणीव–जागृतीतून व्हावे असे त्यांना वाटते. स्वयंसेवी संस्थांचा राष्ट्रीय विकासात काय वाटा असावा याबाबतही या पुस्तिकेत ऊहापोह आहे. राष्ट्रीय पातळीवर ठाम धोरण नसल्याने स्वयंसेवी संस्थांच्या हातून भरीव काम होत नाही असे लेखकांना वाटते. राज्य व राष्ट्र पातळीवर विकासाचे

धोरण घडविण्यास स्वयंसेवी संस्थांनी दडपण आणावे या विचाराशी दुमत असण्याचे कारण नाही; परंतु पक्षीय राजकारणाच्या बुजबुजाटात आज तरी हे कार्य अवघड झाले आहे.


लेखकांनी दोन स्वयंसेवी संस्थांच्या लोकशिक्षणाच्या कार्याचे योग्य मूल्यमापन केले आहे. स्वातंत्र्यपूर्व-काळातील पुढारी स्वयंसेवी संस्थांनी घडविले. त्यामुळे या पुढाऱ्यांनी सरकार स्थापन झाल्यावर स्वयंसेवी संस्थांना योग्य स्थान दिले. आज योजना, कार्यवाही इ. सगळेच नोकरशाहीच्या चौकटीत सापडले आहे निवडणुकीच्या राजकारणामुळे व अर्थकारणामुळे स्वयं-सेवी संस्थाही आपले आदर्श विसरत चालल्या आहेत. तरी कृति-शिक्षणसंस्था व ग्रामबाल शिक्षाकेंद्र या स्वयंसेवी संस्था आदिवासी भागात खंबीरपणे कार्य करीत आहेत त्यांच्यात व त्यांच्या शेजारील वारल्यांत शतकांचा दुरावा आहे.तो दुरावा दूर होणे हे आवश्यक असले तरी एकंदर शोषणव्यवस्था, अर्थव्यवस्था व संस्कृतीचे अंग असलेल्या एका छोटया टापूत ते शक्य आहे का ? प्रयोगशाळा सुसज्ज असल्या तरी लोकांनी त्या आत्मसात करावयास हव्यात ना ? देवीच्या लसीचा शोध व देवीरोगाचे उच्चाटन यांत दोनशे वर्षांचा कालावधी का जावा ? लोकसंख्यानियंत्रणाची साधने उपलब्ध असताना, लोकसंख्या कां वाढत आहे ? शेतीतंत्र विकसित झाले तरी त्या प्रमाणात शेतीउत्पादन का वाढत नाही ? या कठीण प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी विकास प्रयोगांचे संशोधन, अध्ययन आवश्यक आहे ते करावयाचा मार्ग देशपांडे, कुलकर्णी या संशोधकांनी या पुस्तिकेत दाखविला हे या या पुस्तिकेचे वैशिष्टय आहे.

**—ग्रंथप्रेमी**

**वर्किंग विथ ट्रायबल पिपल : द इन्स्टिटयूटस अॅट कोसबाड हिल, इंडिया**, स. ह. देशपांडे, वसंत देशपांडे, शरद कुलकर्णी, इंटरनॅशनल काउंसिल फॉर एज्युकेशनल डेव्हलपमेंट, यू. एस. ए., १९७९.
पृष्ठे १०१, किंमत : पांच डॉलर

# मुक्काम मार्गाची वाडी

**प्रदीप गायकवाड**



२३ जानेवारी १९७८

कर्जत बसस्थानकावर एस. टी. ची वाट पहात मी उभा होतो. या भागात पहिल्यांदाच येत होतो. हा भाग मला पूर्णत: अपरिचित होता. कॉलेजमधून बाहेर पडल्यावर मुंबई विद्यापीठाच्या पदवीधर स्वयंसेवक योजनेत अनेक वर्षे कृतिअभ्यास केला आणि विचारांचा प्रवाहच बदलला. आपण मूळचे खेडयातले, परत खेडयातच जावयास पाहिजे, गरीब शेतकरी, शेतमजूर यांच्या-बरोबरच मिळून, मिसळून राहून त्याच्यासाठी काही करता येते का ते पाहावे, अशी मनात इच्छा निर्माण झाली.

एकदाची एस्. टी. मिळाली. एक-दीड तासानंतर धुरळा उड-वीत चाललेली एस्. टी. एके ठिकाणी उभी राहिली. कंडक्टरने, " उतरा मार्गाची वाडी आली " असे मोठ्या आवाजात सांगितले. मी माझी वळकटी सावरीत खाली उतरलो.

डाव्या हातालाच दहा पंधरा झोपडया दिसल्या. उजव्या हाताला लांबवर डोंगराच्या रांगा पसरल्या होत्या. बाकी सर्वत्र तांबडया रंगाची माती. काही मुले इकडे तिकडे फिरताना दिसली. एका मलाला विचारले, " काय रे, शाळा कुठं आहे ?"

" हीच आहे साहेब ! " मुलगा

अगदी आज्ञाधारकपणे मला 'साहेब' म्हणाला. मी प्रथमच साहेब झालो होतो. शाळेकडे नजर टाकली. दोन-तीन झोपड्या होत्या. गाव आणि शाळा यात तसा काहीही फरक करता येत नव्हता.

मग मी त्याला विचारलं, "काय रे शाळेत गुरुजी आहेत का ?"

"होय साहेब, नाटकाची तालीम चालू आहे. तुम्हाला गुरुजींना भेटायचंय ?"

मी मानेनेच होकार दिला. मुलगा पुढे आणि मी मागे असे एका झोपडीत शिरलो. झोपडीत एकंदरीत नाटकाच्या तालमीचे वातावरण. नमस्कार — चमत्कार झाला आणि गुरुजींची ओळख करून घेतली. नाट्य व संगीताचा थोडासा अनुभव असल्याने त्यांच्या नाटकासाठी मदत करण्याचे मी मान्य केले. मग मी गुरुजींकडेच मुक्काम टाकला.

दिवसभर वाड्या-वाड्यांतून फिरणे, लोकांना भेटणे, असा मग कार्यक्रम ठरून गेला; परंतु लोक माझ्याशी बोलायला फारसे उत्सुक नसत. माझे बोलणेही त्यांना आवडत नसे. मला बघून लोक निघून जात. गावात फिरे तेव्हा बायका घरातच असत. मुलांना घरात बोलावून घेत. मी काही विचारले तरी मला उत्तर देत नसत. ही मंडळी अशी तुटकपणे का वागतात, याचे कारण त्या वेळी तरी मला समजले नाही. मात्र माझ्याविषयी त्यांच्यात कुजबूज चाले.

मग माझ्या लक्षात आलं. मी ज्या गुरुजींकडे राहायला होतो त्यांचा लोकांशी काही विशेष संबंध नव्हता म्हणून मी राहण्याची जागा बदलली. तरी पण लोकांत माझ्याविषयीची भावना कायमच. आदिवासी लोकांच्या मनात बाहेरून येणाऱ्यांबद्दल चांगली भावना नाही. कारण परकी माणसे त्यांच्याकडे येतात आणि त्यांचाच उपयोग करून ते त्यांचेच काही ना काही घेत असतात. म्हणून बाहेरील माणसांवर ते कधीही विश्वास ठेवीत नाहीत. मात्र दारू पाजवली तर तेवढ्या वेळात काय वाटेल ते द्यावयास, करावयास तयार होतात. आता अलीकडे आपण आदिवासी आहोत, आपल्याला सर्व काही फुकट मिळायला पाहिजे ही हात पसरायची भावना त्यांच्यात निर्माण व्हायला लागली आहे. तसे ते कुशल आहेत, हुशार आहेत. त्यांची निरीक्षणशक्ती मोठी आहे. त्यांचा माझ्यावर अविश्वास असला तरी त्यांची माझ्या हालचालींवर बारीक नजर होती आणि माझी त्यांच्यावर. असा आमचा एकमेकांच्या निरीक्षणाचाच खेळ बरेच दिवस चालला होता. अशा परिस्थितीत मला दिवस काढणे फार कठीण व्हायला लागले. माझी काम करण्याची इच्छाशक्तीच संपते की काय अशी भीती वाटायला लागली.

मग एके दिवशी गावचा कारभार पाहणाऱ्या एका आदिवासी ग्रामस्थाशी ओळख काढली. त्याच्याशी मैत्री करायला वेळ लागला नाही. झाले, परत माझी राहाण्याची जागा बदलली. आणि या वेळी ही मात्रा लागू पडली.

एक दिवस असाच एका वाडीत फिरत असता एका मुलगा पोटदुखीमुळे रडत होता. त्याला मी कुठल्या तरी पुस्तकात वाचलेले औषध बनवून दिले. मात्र मला रात्रभर झोप लागली नाही. त्या मुलाला परत जास्त झाले तर ? पण तसे काही झाले नाही. मुलाला चांगला गुण आला. माझ्या औषधामुळेच परिणाम झाला असे नाही; पण तेव्हापासून मी 'वैद्य' झालो. आणि त्याचा परिणाम म्हणून आजतागायत मी प्रथमोपचाराची पेटी सांभाळून आहे.

एकदा बोलता बोलता समजले, काही लोक एके ठिकाणी कामाला जातात. तेथे त्यांना मोजमाप बरोबर मिळत नाही. मी स्वत: त्यांच्याबरोबर कामावर गेलो. आणि तो साधा प्रश्न सुटला. अशा प्रकारे माझी काही वैयक्तिक मैत्री व्हायला लागली; पण त्या मैत्रीचा सामूहिक रूप काही येईना.

आदिवासी लोकांना मुळात संगीत, नृत्य याची विलक्षण आवड. या गुणाचा वापर करून पहावा म्हणून मी रोज संध्याकाळी पेटी घेऊन गाणे म्हणत बसायचो. नाटकातील हा अनुभव कामी आला. हळूहळू लोक गाणं ऐकायला येऊन बसू लागले. मग पेपरवाचन, चर्चा व्हायला लागली. लोक बोलायला लागले आणि मी अबोल झालो. त्याचे कारण म्हणजे लोकांचे प्रश्न होते. तुम्ही कोण ? कुठले ? कशासाठी इथे आलात ? तुमचा धंदा काय ? तुमचे उत्पन्न काय ? प्रश्नांची उत्तरे देऊनही ती त्यांना पटत नव्हती. साधारणपणे लोकांमध्ये पटवून घेण्याची किंवा विश्वास ठेवण्याची तीन

माध्यमे असतात. ती म्हणजे कान, डोळा व प्रत्यक्ष अनुभव. काही लोकांना एखादी गोष्ट चर्चेतून पटते. काही लोकांना एखादी गोष्ट प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय पटत नाही आणि काही लोकांना एखादी गोष्ट प्रत्यक्ष स्वत: अनुभव घेतल्याशिवाय पटत नाही. कानावर आणि डोळ्यावर विश्वास ठेवणारे फारच कमी लोक असल्याने माझ्या उत्तराने त्यांचे समाधान झाले नाही.

या वातावरणात आमच्या छोटयामोठया सभा व्हायला लागल्या. त्यात लोक मला स्पष्ट सांगायचे, "तुम्ही मतं मागायला आला असाल तर निघून जा!" (त्या वेळी लोकसभेची निवडणूक होती!)

"आमच्या जमिनी तुम्ही घ्याल!" असाही आरोप व्हायचा.

त्याच वेळी या भागात डोळ्यांची व खरजेची साथ आली. मी पुढाकार घेतला. डॉक्टरांनी पण साथ दिली आणि ही एक घटना उपयोगी पडली.

आता आमच्या वेळोवेळी मीटिंगा व्हायला लागल्या. आज मीटिंग आहे हे सांगण्यासाठी मलाच सर्वांकडे निरोप द्यावा लागे. ही गोष्ट लक्षात घेऊन लोकांनी प्रश्न उपस्थित केला. मीटिंगविषयी निरोप द्यायला एखाद्याला नेमायला पाहिजे. त्याला आपण सर्वांनी पगार द्यावा. अशी पुष्कळ चर्चा होऊन पंचांच्या कल्पनेने बळ धरले आणि प्रत्येक वाडीतून दोन पंच निर्माण झाले. आता हे पंच सर्व काम पाहायला लागले आहेत.

पुढे मीटिंगसाठी जागेचा प्रश्न निर्माण झाला आणि सर्वांनी मिळून श्रमदान करून एक चावडी (सामूहिक घर) बांधून घेतली.

एके रात्री नऊच्या सुमारास मी लिहीत बसलो असता कुणी तरी अंधारातून धावत माझ्याकडे आले. तो माझा ओळखीचा, शेजारच्या वाडीतला होता. तो दारूच्या नशेत होता. त्याच्या डोक्याला मोठी खोक पडली होती. रक्ताच्या धारा लागल्या होत्या. मी मनातून घाबरलो. लगेच स्वतः सावरलो. त्याला आत घेतलं. अगोदर डोक्याला पट्टी दिली आणि मग काय झालं ते विचारलं. प्रकरण विशेष नव्हते. भावाभावांतले भांडण. हा कालपासून दारू पीत असल्याने आज कामावर गेला नव्हता. त्याचा मोठा भाऊ संध्याकाळी कामाहून घरी आला. हा झोपलेला पाहून त्याला त्याचा राग आला. तू कामावर का आला नाहीस? यावरून भांडण वाढले. त्याच्या भावाने पाटा फेकून मारला आणि डोके फुटले!

हा काही तरी बडबडत होता. मी पंचांना बोलावले व यावर उपाय विचारला. पंचांनी सांगितले ते असे–"हे प्रकरण पाटलाकडे जाईल. पाटील दोघांकडून दंड घेईल व भांडण मिटेल. आपण त्यात काय करावयाचे?" मला हे पटले नाही. आपण याचा न्याय करू शकत नाही काय? हा प्रश्न निर्माण होऊन मग आमची गावकीची न्यायपंचायत निर्माण झाली.

आणि मग आमच्या प्रकरणाचा विचार आम्हीच करायला लागलो. न्याय मागायला लागलो. न्याय द्यायला लागलो. अशा प्रकारे जागृतीच्या कार्यासाठी एक प्रकारचे वातावरण निर्माण झाले. ❋






मानव विज्ञान परिषदेने चालू केलेल्या 'हाकारा' या त्रैमासिकाचा पहिला अंक संपूर्ण वाचला. मी स्वत: या त्रैमासिकाचा वर्गणीदार होत आहे व माझ्या इतर अनेक मित्रांना वर्गणीदार होण्याविषयी सांगत आहे. यावरूनच मला हा अंक आवडला हे स्पष्ट होते.

समाजपुरुषाचे एक महत्त्वाचे अंग असणाऱ्या आदिवासींच्या अनेक मूलभूत ज्वलंत प्रश्नांविषयी तथाकथित सुशिक्षित लोकांच्या मनात बहुतांशी अज्ञान व अनास्था आढळून येते. त्यापैकी काही लोक आदिवासीजीवनाविषयी काही जुजबी माहिती कोठे तरी वाचून अथवा ऐकून त्यांच्या प्रश्नांविषयी पोटतिडकीने बोलण्याचा आव आणतात; पण त्यात जराही जिव्हाळा नसतो. दुर्दैवाने समाजसेवा हा उच्चभ्रू वर्गाच्या सॉफिस्टिकेशनचा एक महत्त्वाचा भाग होऊ लागला आहे. ही सारी परिस्थिती 'हाकारा'सारखे एखादे त्रैमासिक एकदम बदलू शकेल असे मुळीच नाही. कारण हाकाराला मिळणारा अल्पवाचकवर्ग हा त्या प्रश्नांविषयी आधीच वेगळ्या प्रकारची आस्था बाळगणाराच असणार; पण अशा आस्थेला वास्तवाचे विशेष भान आणून देऊन अशी आस्था काही अंशी तरी अधिक क्रियाशील बनविण्याचे कार्य हे त्रैमासिक काही प्रमाणात करू शकेल असे मला वाटते.

आदिवासींची भौतिक प्रगती साधत असताताच त्यांच्यावर चांगले संस्कार करण्याचीही फार मोठी गरज आहे. त्यांचे जीवनमान सुधारणे म्हणजे त्यांना सुखलोलुप बनविणे नव्हे याची जाणीव सतत ठेवली पाहिजे. श्री. अशोक ताकमोगे यांचा 'परिवर्तन: आदिवासी मुलांचा दृष्टिकोन' हा लेख यादृष्टीने मला महत्त्वाचा वाटला. भौतिक प्रगती साधत असताना आदिवासी मन जर अधिक विचारशील व कार्यप्रवण बनले नाही तर ती भौतिक प्रगती कुचकामी ठरेल. इतकेच नव्हे तर अशी भौतिक प्रगती ही आदिवासींना केवळ इतरांच्या साहाय्याने पुरेशी मिळविता येणार नाही. एका स्तुत्य उपक्रमाबद्दल आपले व आपल्या सहकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन.

**मु. म. सायनेकर**
[ अंबरनाथ ]

'हाकारा'च्या प्रथम अंकात 'जबरन-जोत' प्रश्नासंबंधी सविस्तर व माहितीपूर्ण मजकूर दिल्याबद्दल धन्यवाद.

चंद्रपूर जिल्ह्यातील गडचिरोली तहसिलीमध्ये जबरन-जोत प्रश्नाने उग्र स्वरूप धारण केले आहे. तेथील नैनपूर, आमगाव, जांभूळखेडा, वनखेडा, शिवराजपूर आदि अनेक गावांतील कास्तकारांना दहा-दहा वर्षांच्या जुन्या जबरानी असूनही 'प्रोव्हिजनल पट्टे' सुद्धा मिळाले नाहीत. पट्टे पाहिजे असतील तर १०० रु. प्रति एकराप्रमाणे पैसे पडतील असे पटवारी खुशाल सांगतात. ते गरिबांनी कोठून व का म्हणून द्यावेत? याउलट देसाईगंजच्या ठेकेदार, व्यापारी व श्रीमंत शेतकऱ्यांनी सरकारी कर्मचाऱ्यांशी हातमिळवणी करून वर्षभरापूर्वी नैनपूरजवळील उभे जंगल साफ केले आहे व त्यांना त्या जमिनीचे पट्टे मिळाले आहेत देखील.

गरीब आदिवासींनी अत्यंत मेहनतीने उठीत केलेली जबरन जमीन मागीतली असता, पर्यावरणाच्या गोष्टी सांगणारे सरकार व त्याचे वन-खाते स्वत: मात्र स्वार्थापोटी जंगलभक्षकाचे काम करीत आहेत! श्री. सुखदेव उईके व 'छात्र युवा संघर्ष वाहिनी, चंद्रपूर'चे कार्यकर्ते या अन्यायाविरुद्ध आवाज उठवीत आहेत.

**मोहन हिराबाई हिरालाल**
[ चंद्रपूर ]

'हाकारा' चा पहिला अंक हाती आला. जबरन–जोत जमिनीच्या समस्येची उद्बोधक चर्चा त्यात आलेली असून, समस्येचे सर्वांगीण दर्शन त्यात झालेले आहे. या चर्चेतून एक महत्त्वाचा मुद्दा गळालेला दिसतो. तो मुद्दा ह्या जमिनीच्या मालकी–हक्काचा–स्वामित्वाचा आहे.

मालकी–हक्काच्या पायऱ्या असतात. काही वेळेला तो अधिकार संपूर्ण तर काही वेळेला तो मर्यादित असतो; ह्याचा अनुभव हिंदू समाजाला आहे. नवऱ्याच्या संपत्तीवरचे, त्याच्या विधवेचे अधिकार मर्यादित असत. आजही अज्ञानाच्या इस्टेटीवरचे त्याच्या पालकाचे अधिकार मर्यादित आहेत. अतिक्रमित जमिनी, नियमित करताना त्यावरती नवीन मालकाचे अधिकार कोणत्या प्रकारचे असावेत हा मुद्दा वरील चर्चेतून राहिलेला आहे; मग मुळात अशी चर्चा सुरू झालीच नाही, का ती चर्चा महत्त्वाची न वाटल्याने, तो मागे राहिला समजत नाही.

आदिवासींच्या जमिनीचा प्रश्न अनेकदा चर्चेला येत असतो. भारत स्वतंत्र झाल्यावर लौकरच त्याबद्दल महाराष्ट्र असेंब्लीत चर्चा झाली होती. त्यावर बोलताना त्या वेळच्या मुख्य मंत्र्यांनी, "संपत्तीचे मर्यादित अधिकार कमी प्रतीचे असतात. इतरांना संपूर्ण अधिकार देणे हा पक्षपात आहे." असा खुलासा केला व आदिवासींना संपूर्ण अधिकार देण्याचे तत्त्व मान्य करण्यात आले. त्यातूनच आदिवासींची जमीन मोठ्या प्रमाणात बिगरआदिवासींच्याकडे गेली. तेव्हा आज जबरन–जोत जमिनीचे हस्तांतरण करताना पर्यावरणाप्रमाणेच आदिवासींच्या सामाजिक मर्यादांचाही विचार झाला पाहिजे.

आदिवासी व अस्पृश्य भारतातील अतिदरिद्री थरांत मोठ्या प्रमाणात समाविष्ट आहेत. या थरातील माणसांना दिलेली स्थावर वा जंगम संपत्ती त्यांच्याजवळ फार काळ रहात नाही. ह्याबद्दलची स्वतंत्र भारतामधली माहिती गोळा केल्यास, संपत्ती घालवण्याचा प्रचंड वेग व प्रमाण ध्यानांत येते व इतर गट त्या संपत्तीवर पाहता–पाहता गबर होत असल्याचा प्रत्यय येतो.

अतिदरिद्री गट पुन्हा दरिद्रीच का होतो ह्याची कारणे शोधावी लागत नाहीत, इतकी ती स्पष्ट आहेत. अतिदारिद्र्य व उपासमार, अज्ञान व निरक्षरता सतत कर्ज काढण्याची व व्याज भरीत राहण्याची सवय, लग्न–श्राद्ध व अशाच अनुत्पादक गोष्टींवर करावा लागणारा खर्च व अशाच गोष्टींसाठी कर्ज देणारे सावकार, ह्या थरातही असणारी दारू व इतर व्यसने व त्या सर्वांच्या जोडीला नैसर्गिक आपत्ती, ह्या अनेक कारणांनी गांजलेला दरिद्रनारायण, संपत्ती सांभाळू शकतच नाहीत. तो पुनश्च कंगाल होतो व त्याचे कुटुंब पुन्हा एकदा उपासमार काढू लागते. उपासमारीची सवयच असल्याने त्यात काही चूक आहे, असेही त्याला वाटत नाही. "रोज दोनदा खाल्लेच पाहिजे, असे देवाने कुठे सांगितले आहे का ?" असाच प्रश्न तो करण्याचा संभव असतो.

अतिदलित व शोषित थरातील ह्या गटांच्या या मर्यादांच्या विचार करता, त्या गटातील माणसाला दिलेली संपत्ती, त्याच्याजवळ काही काळ तरी टिकावी, व काबाड–कष्ट करून का होईना, दोन वेळेला, निदान एक वेळेला पोटभर खाण्याची संवय त्याच्या मुलांना लागावी असे प्रयत्न त्या थरातील कार्यकर्त्यांनी करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने जबरन–जोत जमिनीचे हस्तांतर करतांना, आजघडीला तरी नवीन मालकाचे अधिकार मर्यादित ठेवावे, हे त्या गटाला अंती हितकारक व समाजाला फायदेशीर होणार आहे. हस्तांतरित जमिनीच्या उपभोगाचा अधिकार अविच्छिन्न ठेवून, हस्तांतरणावर मात्र मर्यादा घालता येईल; व जमिनीची विक्री, गहाण इत्यादी अशक्य करून जमिनीला शेतकरी व त्याचे कुटुंब मुकणार नाही, अशी व्यवस्था करता येईल.

स्वामित्वाच्या अधिकाराचा आणखीही एक पैल विचारांत घेणे आवश्यक आहे. दलितांच्या उत्थानासाठी चाललेल्या विविध प्रयत्नांत स्त्रिया व मुले ह्या दलित गटांच्या अस्तित्वाचा मागमूसही कोठे लागत नाही. जबरन–जोत चळवळही त्याला अपवाद नाही. स्त्रिया व मुले ही पुरुषाच्या जीवनाचीच अभिन्न अंगे आहेत, असे समाज समजतो व त्यांचे स्वतंत्र अस्तित्व नाकारतो. ह्या पायावर, कुठलाही समतावादी सामाजिक क्रांतीचा विचार रुजवता येत नाही.

शेतीची कामे मुख्यत्वे स्त्रिया व मुले करतात; नांगरणी तेवढी पुरुषाकडे असते. हे काम कठीण व कष्टाचे म्हणून ते पुरुषांवर सोपवलेले आहे, असा आपला अनुभवी व भावडा समज असतो. वस्तुस्थिती अशी आहे की, ह्या सर्व गटांत 'स्त्रियांनी नांगराला स्पर्श केल्यास, समाजावर दुर्धर आपत्ती कोसळते' असा समज आढळतो. ही लक्ष्मणरेषा, एखाद्या संकटकाळीदेखील ओलांडल्यास, जातीपंचायती स्त्रियांना कडक शिक्षा देतात. त्यामुळे शेतीचे इतर काम एकाकी निभवणाऱ्या स्त्रिया, घरात पुरुष–माणूस नसल्यास, मजूर

लावून किंवा कोणाला तरी बाबा–पुता करून हे काम करवून घेतात. ही स्थिती अन्यायाची आहे. शेती ज्यांच्या माथी चालते, त्यांना जमिनीच्या स्वामित्वांतही काही वाटा मिळणे योग्यच नव्हे तर आवश्यकही आहे. हा मुद्दा विचारात न घेता जमिनीचे अधिकार मर्यादित केले तर मुलांच्या हिताचे मात्र रक्षण होते व बायको मात्र पूर्वीप्रमाणेच नवऱ्याच्या दयेवर अवलंबून राहते. जमिनीचे पट्टे नवरा बायको दोघांच्या नावाने सामायिक करून देणे हा त्याला एक उपाय आहे.

जमिनीचे हक्क मर्यादित करताना भारताच्या वारसा – हक्ककायद्यांमुळे जमिनीचे होणारे fragmentation थांबविण्याच्या दृष्टीनेही काही उपाय शोधून नवीन तरतुदी करण्याची संधी मिळेल, हा एक अनपेक्षित फायदा.

स्त्रियांचे अधिकार व मुलांचे भविष्य ह्यांच्या संरक्षणाचा प्रश्न सर्वच जमिनीबाबत उभा राहात आहे. पण ह्याबाबत, कुठलेही पाऊल टाकणे शक्य होत नाही. कारण अशा परिवर्तनाला समाजाकडून प्रचंड विरोध होतो. हस्तांतरित जमिनी मुळातच नव्याने द्यावयाच्या असल्याने, त्या जमिनींबाबत काही नवीन तरतुदी करता येतील व त्या तरतुदी समाजाच्या पचनी पडल्यावर, वारसाहक्काच्या कायद्यामुळे होणारे जमिनीचे fragmentation थांबविण्यासाठी सर्वच जमिनीसाठी काही नवीन तरतुदी सुचवता येतील.

येथे उपस्थित केलेले मुद्दे जबरन–जोत चळवळीच्या कार्यकर्त्यांना विचार करण्याजोगे वाटतील. त्यांच्यावर भरीव चर्चा सुरू होईल, जमीन–हस्तांतराच्या प्रश्नाला त्यामुळे एक नवीन परिमाण लाभेल ही शक्यता आहे.

**–गीता साने**

श्रीमती गीता साने यांनी दोन मूलभूत मुद्दे उपस्थित केले आहेत व त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

आदिवासींच्या जमिनीचे मालकीहक्क मर्यादित असावेत असे त्यांचे म्हणणे आहे. आजची आदिवासींची स्थिती लक्षात घेता ते अगदी बरोबर वाटते. सरकारी कायदाही हे आज मान्य करतो. महाराष्ट्र सरकारच्या महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व कूळवहिवाट विधी (सुधारणा) कायद्यान्वये (कायदा क्रमांक 35/1974) आदिवासींच्या मालकीच्या जमिनींच्या हस्तांतरावर अनेक निर्बंध घालण्यात आले आहेत. हे निर्बंध आदिवासींच्या सर्वच जमिनींना लागू आहेत व त्यात अतिक्रमणे रीतसर झालेल्या जमिनीही अर्थात समाविष्ट आहेत. हे निर्बंध सर्वसाधारणपणे परिणामकारक वाटतात. काही ठिकाणी बिगर–आदिवासी तोंडी–बोलीने आदिवासींच्या जमिनी करावयास घेतात. हे व्यवहार बेकायदेशीर आहेत, पण ते चालतात. अर्थात यावर आदिवासींची जागृती हाच खरा उपाय आहे. आदिवासींत जागृती केल्याशिवाय व त्यांच्या प्रभावी संघटना बांधल्याशिवाय बेकायदेशीर गोष्टींना आळा बसणार नाही.

शेतीच्या मालकीत स्त्रियांनाही वाटा असावा हेही म्हणणे तत्त्वत: योग्य आहे. आज कायद्याने तसा काहीसा अधिकार आहे. कायद्याप्रमाणे मुलाइतकाच मुलीचाही हक्क बापाच्या जमिनीवर आहे. मात्र जमिनीवरचा हक्क सहसा मुली बजावीत नाहीत असे दिसून येते. बाप मेल्यानंतर मुलाचे नांव जमिनीच्या कागदपत्रात लावले जाते. मात्र मुलाच्या बायकोचे नाव लावले जात नाही. अशा परिस्थितीत पट्टे देताना नवरा–बायकोच्या नावाने सामायिक देणे कठीण वाटते, नवरा–बायकोने फारकत घेतल्यास प्रश्न निर्माण होतील. जमीन दोघांत वाटावयाची ठरल्यास तुकडेबंदी कायद्यामुळे ते अनेकदा अशक्य होईल,

केवळ वारसाहक्कामुळे स्त्रियांचा प्रश्न सुटणे कठीण आहे. अगदी काहीही मालमत्ता नसलेल्या अनेक स्त्रिया काम करून नवऱ्याचे पोट भरत असताना देखील नवऱ्याकडून मार किंवा बोलणी खाताना आढळतात. ही मानसिक गुलामी सामाजिक परिस्थितीतून निर्माण झालेली आहे. वास्तविक अशा स्त्रियांनी नवऱ्यांना घराबाहेर काढले पाहिजे, पण तसे होत नाही.

स्त्रियांमध्ये जागृती करणे, आपण स्वतंत्र आहोत आणि असे राहू असा विश्वास निर्माण करणे हाच खरा मार्ग आहे. केवळ जमिनीचे पट्टे सामायिक नावावर असल्यामुळे स्त्रीला संरक्षण मिळेल असे आजच्या परिस्थितीत वाटत नाही. जागृतीशिवाय व सामाजिक परिस्थिती बदलल्याशिवाय कायदा काही करू शकेल असे वाटत नाही.

मात्र या प्रश्नावर अधिक चर्चा झाली पाहिजे. स्त्रियांच्या पिळवणुकीवर आधारलेला समाज लांछनास्पद आहे यात शंका नाही.

**–शरद कुलकर्णी**

# मानव विज्ञान परिषद : चर्चासत्र

आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ (धडगाव) यांच्या सहकार्याने महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेमार्फत धडगाव, अक्राणी तालुका, जिल्हा धुळे येथे आदिवासी कार्यकर्त्यांचे एक चर्चासत्र ८ व ९ डिसेंबर ७९ रोजी आयोजित करण्यात आले होते. धुळे जिल्हातील सुमारे ३० आदिवासी कार्यकर्ते, पुणे विद्यापीठातील मानवशास्त्राचे १२ पदव्युत्तर विद्यार्थी व जळगाव आणि किनवट तालुका, जिल्हा नांदेड येथील काही कार्यकर्ते उपस्थित होते.

चर्चासत्राचे उद्घाटन माजी राज्यमंत्री श्री. दिलवरसिंग पाडवी यांच्या हस्ते झाले. प्रा. रा. के. मुटाटकर यांनी प्रास्ताविकात परिषदेची व चर्चासत्राची भूमिका स्पष्ट केली. प्रादेशिक स्वरूपाची चर्चासत्रे घेण्याची परिषदेची इच्छा असून त्यामुळे संघर्षात्मक व रचनात्मक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पक्षातीत, अराजकीय असे व्यापक व्यासपीठ मिळणार आहे, असे त्यांनी सांगितले.

श्री. शरद कुलकर्णी यांनी चर्चासत्राची रूपरेषा मांडताना चर्चेसाठी येणाऱ्या शिक्षणाचे प्रश्न, जंगलजमिनीचे प्रश्न, जमिनीच्या हस्तांतराचे प्रश्न व एकाधिकार व्यापारविषयक खालील मुद्दे मांडले.

१) जंगलजमिनीबाबत सरकारने अतिक्रमण रीतसर करण्याबद्दल जे आदेश काढले आहेत, त्याचा फक्त १० टक्के लोकांनाच फायदा होईल.

२) आदिवासींच्या जमिनी बिगरआदिवासींकडे गेल्या होत्या त्या परत आदिवासींकडे देण्याबाबत सरकारने कार्यवाही केली होती; परंतु उच्च न्यायालयाने रीतसर चौकशीतच दोष दाखवून त्या जमिनी परत बिगरआदिवासी मालकांकडे देण्याबाबत न्याय दिला आहे. अशी सुमारे ४००० प्रकरणे आहेत.

३) स्वयंसेवी संस्थांना नवीन आश्रमशाळा न देण्याबद्दल सरकारी आदेशाबाबत व जुन्या आश्रमशाळांना पुरेसे अनुदान मिळण्याबाबत चर्चा.

४) एकाधिकार व्यापाराखाली १८ रु. प्रतिक्विंटल मालवाहनाचा दर वाजवीपेक्षा जास्त आहे. तसेच ३ टक्के धान्याची कपात कट्टीपोटी ( वाहतुकीत इ. धान्याची तूट) गैरवाजवी असून ती हिशेबात दाखवली जात नाही.

श्री. कुलकर्णी यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर बोलताना श्री. पाडवी म्हणाले की, भूमीच्या ३३ टक्के जंगल असावे असा नियम आहे; परंतु जेव्हा जमिनीची गरज भासते, मग ती धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी असो अथवा परदेशांतून भारतात आलेल्या नागरिकांसाठी असो, नेहमी जंगल–जमिनीवरच अतिक्रमण केले जाते. त्यामुळे महाराष्ट्रात हल्ली केवळ २१ टक्के जंगलजमीन राहिलेली आहे आणि ती १५–१६ टक्क्यांवर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडू शकतात. सर्व जंगलजमीन जरी भूमिहीनांस वाटण्यात आली तरी भूमिहीनांचा प्रश्न सुटणार नाही. महाराष्ट्रात जंगलांचे उत्पन्न हे राज्याच्या उत्पन्नात दोन नंबरच्या स्थानावर आहे.

आश्रमशाळेबद्दल श्री. पाडवी म्हणाले की, स्वयंसेवी संस्था या आश्रमशाळांना एक किफायतशीर धंदा या अर्थी वापरतात. याकरिता देण्यात येणारे अनुदान रास्त पद्धतीने खर्चण्यात येत नाही. स्वतः सरकार जर जास्त आश्रमशाळा उघडत असेल तर त्याविरुद्ध आवाज उठविण्याची काहीच गरज नाही.

आठ डिसेंबरच्या दुपारच्या सत्रात श्री. जनार्दनमहाराज वळवी यांनी आदिवासी शिक्षणाविषयी खालील मुद्दे मांडले.

१) प्राथमिक शाळा नीट कार्य करीत नाहीत. त्यांच्यावर गुणात्मक नियंत्रण नाही. बहुतेक एकशिक्षकी शाळा या " पिशवी शाळा " असतात.

२) वसतिगृहाच्या व्यवस्थापकांचे प्रशिक्षण आवश्यक आहे. केवळ १०० रु. पगार असल्यामुळे स्वयंसेवी संस्था प्रशिक्षित व्यवस्थापक ठेवू शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य वळण लावण्यात अडचण येते.

३) स्वयंसेवी संस्थांच्या आश्रमशाळांना नेमलेल्या खर्चाच्या ९० टक्के सरकारी अनुदान मिळते. आदिवासी भागात १० टक्के तूट भरून काढणे जवळजवळ अशक्य असते. त्यामुळे शिक्षकांचे पगार वेळेवर दिले जात नाहीत व इतरही खर्चात तूट निर्माण होते. सरकारी व स्वयंसेवी आश्रमशाळांच्या पगारात व इतर भत्त्यात बराच फरक असतो.

४) स्वयंसेवी आश्रमशाळांत प्रत्येक विद्यार्थ्यामागे ३५ ते ४० रुपये अनुदान मिळते, तर सरकारी शाळात ते प्रत्येकी ६० रुपये असते.

५) आदिवासी भागात शिक्षणाचा प्रसार करावयाचा असल्यास व जिल्हा परिषदेच्या शाळा नीट चालत नसल्यामुळे जास्त वसतिगृहे हा एकमेव उपाय आहे.

या मुद्द्यांवर बरीच चर्चा झाली. केवळ स्वयंसेवी आश्रमशाळेत भ्रष्टाचार असतो व सरकारी आश्रमशाळांत नसतो हे म्हणणे चुकीचे आहे. गैरव्यवहाराचे प्रकार सर्वत्र सारखेच असतात. आश्रमशाळांचे सरकारीकरण झाल्याने आदिवासी शिक्षणाचा प्रश्न सुटेल असे नाही. सरकारी आश्रमशाळांचे मूल्यमापन करण्याची गरज आहे व विद्यापीठांनी आणि शिक्षणशास्त्र संस्थांनी ही जबाबदारी घ्यावी असा चर्चेचा सूर होता. मुलांना शाळेत पाठविण्यासाठी आदिवासी पालकांना उद्युक्त करण्याची गरज व त्यासाठी त्यांना मुलांच्या श्रमाचा मोबदला व मुलांना एक वेळचे जेवण देण्याची शिफारस मांडण्यात आली. तसेच दूध किंवा सुकडीवाटपाबाबत एका तालुक्यात तरी एकच धोरण वापरावे. संस्थांचे स्वयंसेवी रूप हे १० टक्के रक्कम गोळा करण्याच्या कार्यक्षमतेवर न ठरविता त्याकरिता गुणात्मक किंवा प्रयोगात्मक क्षमता असे निकष लावावेत. स्वयंसेवी संस्था या राजकारणाचे अड्डे बनू नयेत म्हणून त्यांना राजकारणात भाग घेण्याची मनाई असावी.


९ डिसेंबर रोजी सकाळी समारोपाचे तिसरे सत्र झाले. श्री. शरद कुलकर्णी यांनी जंगलजमिनीचा प्रश्न, हस्तांतरित जमीन व एकाधिकार व्यापार या समस्यांचा उपन्यास केला. बऱ्याचशा जंगलजमिनीवर जंगल नाही व अशा सुमारे ४०,००० चौ. हेक्टर जमिनीवर (गायराने धरून) आदिवासींनी अतिक्रमण केले. महाराष्ट्र सरकारने ४० कलमाच्या अंतर्गत १९६० ते १९७८ दरम्यान झालेली अतिक्रमणे रीतसर करण्याचे ठरविले. तथापि त्यातील कलमांचे पालन केल्यास ८४ टक्के आदिवासींना या तरतुदीचा फायदा मिळणार नाही. ज्या आदिवासींनी शिक्षा म्हणून दंड भरला असेल तो अतिक्रमणाचा पुरावा म्हणून सादर केला; परंतु ज्यांनी दंडापोटी सरकारी कर्मचाऱ्यांना दारू, कोंबडी इ. दिले त्यांना अतिक्रमणाबद्दलचा पुरावा सादर करता येत नाही.

श्री. कुलकर्णी यांनी याबाबत झालेल्या संघर्ष-मोहिमांची माहिती दिली. बऱ्याच कार्यकर्त्यांनी राजस्व व जंगलखात्याच्या कर्मचाऱ्यांनी लोकांना मालकीजमिनीबद्दल खोटी आश्वासने देऊन कसे लुबाडले याची माहिती सांगितली. परिषदेचे सह-चिटणीस श्री. जगदीश गोडबोले यांनी चंद्रपूरमधील आदिवासी भागातील जमिनीच्या मालकीहक्कासंबंधी विश्वासपात्र रेकॉर्डचा अभाव निदर्शनास आणला. हिमालयप्रदेशातील लोकांनी कंत्राटदारांपासून जंगल वाचविण्यासाठी व संवर्धनासाठी उभारलेल्या 'चिप-को' चळवळीची माहिती सांगितली. त्या भागात जंगलतोडीमुळे फार मोठ्या प्रमाणावर जमिनीची धूप होत आहे आणि स्थानिक लोकांना इंधनसामग्री, गवत व शेती आणि घराकरिता लागणाऱ्या लाकडांचा तुटवडा जाणवतो. कार्यकर्त्यांनी जंगलाच्या संवर्धनाची गरज प्रतिपादिली व त्याकरिता आदिवासींचे सहकार्य व सहभाग मिळत जावा असे सुचविले.

एकाधिकार व्यापारयोजना ही जरी चांगली असली तरी त्या योजनेच्या कायद्याच्या पळवाटांचा व्यापारी फायदा करून घेतात. आदिवासींचा या योजनेच्या व्यवस्थापनात सहभाग असल्याशिवाय ही योजना सफल होणार नाही. बऱ्याचदा महामंडळाच्या दुकानातील माल स्थानिक व्यापाऱ्यांना विकला जातो. आदिवासींच्या मालाचा मोबदला विकास महामंडळा-मार्फत त्वरित देणे आवश्यक आहे. राजकीय पुढाऱ्यांच्या जबाबामुळे भ्रष्टाचारी लोकांना नोकरीत घेतले जाते, याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. सहकारी सोसायट्यांबाबत व एकाधिकार व्यापाराबाबत आदिवासींचे शिक्षण करावे, तसेच आदिवासी विकास महामंडळाच्या कारभारात स्वयंसेवी संस्थांना योग्य स्थान असावे असेही विचार मांडण्यात आले.



# विदर्भ आदिवासी साहित्य परिषद : एक प्रतिक्रिया



विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती (भांदक) या गावी विदर्भ आदिवासी साहित्य परिषद नोव्हेंबर १९७९ च्या १० आणि ११ तारखांना भरविण्यात आली. अशा प्रकारची, आदिवासींनी पुढाकार घेऊन भरविलेली ही पहिलीच परिषद होती. भद्रावती येथे काही धडपडया आदिवासी युवकांनी पुढाकार घेऊन, १९७८ साली स्थापन केलेल्या ' राणी दुर्गावती वाचनालया 'तर्फे या परिषदेचे संयोजन करण्यात आले. संयोजनात प्रामुख्याने पुढाकार घेणारे श्री. विनायक तुमराम आणि श्री. कुळमेथेगुरुजी यांनी अपार मेहनत घेऊन ही पहिली परिषद मूर्त स्वरूपात आणली.

वणीचे ख्यातनाम साहित्यिक प्राचार्य श्री. राम शेवाळकर अध्यक्षस्थानी होते. नागपूर विद्यापीठातील प्रा. यशवंत मनोहर यांनी परिषदेचे उद्‌घाटन केले. या परिषदेत दोन दिवस विविध वक्त्यांची भाषणे झाली. त्यात वरोड्याचे प्रा. डॉ. श. गो. देवगावकर आणि श्री. जयवंत काकडे, नागपूरचे श्री. नेताजी राजगडकर, श्री. महावीर, श्री. ऋषी मसराम, मुंबईचे श्री. भुजंग मेश्राम, अमरावतीचे श्री. व्यंकटेश आत्राम व इतर अनेकांची भाषणे झाली. संयोजकांच्या सांगण्याप्रमाणे सुमारे शंभर ते सव्वाशेच्या जवळ आदिवासी-प्रतिनिधी उपस्थित होते. आदिवासी युवकांनी भाषेच्या, साहित्याच्या आणि आदिवासी संस्कृतीच्या विविध बाजूंवर भाषणे केली. भाषणावर चर्चा मात्र झाली नाही. पाहुण्या वक्त्यांनी आदिवासींकडे लक्ष केंद्रित करण्याऐवजी गैरआदिवासींच्या प्रस्थापित धर्म व संस्कृतीच्या प्रतीकांवर टीका करण्यावरच भर दिला. संयोजकांच्या मनात हे केवळ आदिवासी संमेलन म्हणून भरविण्याचे असून त्यात आदिवासींच्या समस्या, साहित्य या सगळ्याच बाबीवर विचार व्हावयाचा होता; पण ती ' साहित्य परिषद ' बनल्यावर त्या परिषदेने इतर साहित्य परिषदांची निष्फळ, पोकळ आणि परस्परांवरच आरोप-प्रत्यारोप करण्याची परंपराच डोळ्यांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला असे दुर्दैवाने म्हणावे लागते.

या संमेलनात खटकणारी आणखी एक गोष्ट म्हणजे चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासींपैकी बऱ्याच मोठ्या गोंडांच्या समूहाचे परंपरागत नेते अहेरीचे राजे विश्वेश्वरमहाराज किंवा त्यांच्या घराण्यातील कोणी प्रतिनिधी हजर नव्हते

आदिवासींनी धडाडीने एकत्रित येऊन नवोदित आदिवासी नेतृत्वाच्याच आधारावर चर्चा व त्यातून Action programme आखायला पाहिजे. ज्यांच्या समस्या भिन्न आहेत, ज्यांना उत्तम नेतृत्व पूर्वीच प्राप्त झाले आहे आणि ज्यांची सामाजिक ठेवण व सांस्कृतिक वारसा भिन्न आहे असे imported नेतृत्व आदिवासी विकासाच्या चळवळीचा पाया उमलत असतानाच त्यास नाउमेद करू शकेल. तसेच साहित्याचा विकास आणि आपल्या समस्यांची सोडवणूक होऊन विकासाची दिशा कशी लाभेल यावरच कटाक्षाने भर असावा असे या प्रथम विदर्भ-आदिवासी परिषदेच्या निमित्ताने आदिवासी बांधवांना सांगावेसे वाटते.

**—श. गो. देवगावकर**

PADMAJA/M

# अक्षय सुखाच्या चिरंतन ओळी






महाबँकेच्या आवर्त ठेव योजनेच्या तुमच्या
पासबुकाच्या प्रत्येक पानावरील या ओळी म्हणजे
तुमच्या भविष्यातील अक्षय सुखाची ग्वाहीच !
या योजनेमध्ये तुम्ही दरमहा पांच रुपयांपासून
बचत करु शकता.

**महाबँक आवर्त ठेव योजना म्हणजे बचतीचा उत्तम मार्ग !**

बँकिंग सेवा

## बँक ऑफ महाराष्ट्र

(भारत सरकारचा उपक्रम)

मुख्य कार्यालय : पुणे

व्यक्तिगत जिव्हाळा

संस्थापरिचय

# कृषि–शिक्षण संस्था, कोसबाड

महाराष्ट्रातील एक शैक्षणिक केंद्र म्हणून कोसबाड प्रसिद्ध आहे. येथे श्रीमती अनुताई वाघ व त्यांचे सहकारी चालवत असलेले ग्रामबाल शिक्षा-केंद्र आहे. त्याला लागूनच डॉ. जयंत पाटील चालवत असलेली कृषि–शिक्षण संस्था आहे. वास्तविक पहाता कोसबाड हा कैनाड गावाचा एक पाडा आहे. हे गाव डहाणू तालुक्यात आहे. या गावात प्रामुख्याने वारलीवस्ती आहे. बहुसंख्य वारली लहान शेतकरी आहेत. सर्वसाधारणपणे भाताचे एक पीक ते घेतात. त्यावर त्यांचे तीन–चार महिने भागते. त्यानंतर आंबील, कडूकंद, झाडपाला नाही तर उपास. कधीकधी इतरांच्या मळचात मजुरी. या भागातच कृषि–शिक्षण संस्थेतर्फे अनेक उपक्रम चालतात.

नामदार गोखल्यांपासून स्फूर्ती घेऊन कै. टी. ए. कुलकर्णी, आचार्य भिसे वगैरे मंडळींनी बोरडी येथे हायस्कूल काढले. या शाळेत शेतीशिक्षणाचे धडे दिले जातात. हरिश्चंद्र पाटील हे या शाळेचे विद्यार्थी. कृषि शिक्षण घेऊन ते त्या शाळेतच शिकवू लागले. त्यातूनच पुढे कृषि-शिक्षण संस्था उभी राहिली. १९४९ साली ही संस्था कोसबाड टेकडीवर सुरू झाली. १९६८ साली डॉ. जयंतराव पाटील या संस्थेचे प्राचार्य झाले. शेतीविस्तार आणि फळझाडे हा त्यांच्या खास अभ्यासाचा विषय, तर वेगवेगळ्या प्रकारच्या गवतांची लागवड करणे हा त्यांचा एक नाद.

आज या संस्थेकडे २६५ एकर शेतजमीन आहे एक अतिशय सुसज्ज प्रयोगशाळा आहे. संस्थेतर्फे एक हायस्कूल चालते. त्याशिवाय शेतीशिक्षण देणारा एक अभ्यासक्रमही चालतो. भोवतालच्या शेतकऱ्यांना सुधारित पद्धतीने भातशेती, चिक्कू, आंबा, बोरे यांची लागवड, मिरच्यांची लागवड यांचे शिक्षण देणे वगैरे उपक्रम चालतात. संस्थेतर्फे ग्रामसेवकांचे प्रशिक्षण-केंद्रही चालते.

डॉ. जयंत पाटल यांनी भोवतालच्या आदिवासींची शेती विकसित व्हावी म्हणून अनेक उपक्रम केले आहेत. केंद्रातर्फे भाताची रोपे पुरवली जातात. तसेच आंबा–चिकूचीही रोपे पुरवली जातात. त्यांच्या प्रयोगातून कोसभात नावाचे एक संकरित बियाणेही निघाले आहे. १९७२ नंतर तलासरी आणि वाकी येथेही भाताची रोपे पुरवण्याची व्यवस्था झाली आहे. येथील आश्रमविद्यालयात सुमारे १२० आदिवासी मुलेमुली शिक्षण घेत आहेत. महात्मा गांधी आदिवासी जनता विद्यालयात ठाणे, कुलाबा, नाशिक, धुळे आणि जळगाव या जिल्ह्यांतील आदिवासी विद्यार्थी घेतले जातात. त्यांच्यासाठी एक वर्षाच्या मुदतीचा एक अभ्यासक्रम आणि चार महिन्यांच्या मुदतीचा दुसरा अभ्यासक्रम असे दोन अभ्यासक्रम आहेत. दरवर्षी सुमारे १६० विद्यार्थी या अभ्यासक्रमांचा फायदा घेतात.

संस्थेतर्फे अनेक सामुदायिक विहिरी खणण्यात आल्या आहेत. त्याशिवाय आदिवासी शेतकऱ्यांसाठी व्यक्तिगत अशा सुमारे १०० विहिरी खणण्यात आल्या आहेत गोबरगॅस, कुक्कुटपालन, मधमाशापालन यांचाही प्रसार केला जातो. जगातल्या विविध भागातून त्यांनी अनेक प्रकारच्या गवताच्या जाती कोसबाडला आणल्या आहेत.

या संस्थेच्या कामाचा प्रभाव आदिवासी शेतकऱ्यांवर मर्यादित प्रमाणावरच झाला आहे. डॉ. जयंत पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना याची जाणीव आहे. बदल मर्यादित असण्याचे मुख्य कारण येथील परिस्थिती हेच आहे. आदिवासी शेतकऱ्याला नुसती नवी कौशल्ये देऊन भागणार नाही. त्यांच्या प्रवृत्तीतच खूप बदल व्हायला हवा. आदिवासी भागात आणि विशेषतः गरिबांत काम करणाऱ्यांना या संस्थेच्या अनुभवातून खूप शिकण्यासारखे आहे.

[ **कृषि–शिक्षण संस्था,**
कोसबाड हिल,
ता. डहाणू जि. ठाणे
४०१ ७०३. ]

# 'आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ'



धडगाव, जिल्हा धुळे

आदिवासींच्या सर्वांगीण विकासाचा शैक्षणिक प्रगती हा पाया आहे, अशा श्रद्धेने या पायात आपणाला सर्वस्वी गाडून वर्षानुवर्षे निरलसपणे काम करणाऱ्या ज्या संस्था व कार्यकर्ते महाराष्ट्रात आहेत, त्यामध्ये धुळे जिल्ह्यातील 'आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ, धडगाव' ही संस्था व त्या संस्थेचे अध्यक्ष श्री. जनार्दनमहाराज वळवी यांना मानाचे स्थान आहे.

१९६३ साली स्थापन झालेल्या या संस्थेने धुळे जिल्ह्यातील तळोदे, अक्कलकुवा, अक्राणी व शहादा या दुर्गम आणि मागास विभागातील आदिवासी-हरिजन समाजाची शैक्षणिक-आर्थिक उन्नती करण्याचे कठीण काम अनेक आपत्ती सोसूनही सातत्याने चालविले आहे. आदिवासींच्या गरजेच्या वस्तूंचे वाजवी किंमतीचे दुकान चालविण्यापासून ते व्यापार-उदीमात आदिवासींची फसवणूक होऊ नये म्हणून आपल्या विद्यार्थ्यांमार्फत आदिवासींचा माल तोलून-मापून देण्यापर्यंत अनेक उपक्रम संस्थेने केले आहेत.

संस्थेतर्फे आज खालील ठिकाणी आश्रमशाळा, वसतिगृहे, बालमंदिरे आदि चालविण्यात येतात–

१) पंडित नेहरू आश्रमशाळा, रार्थासिगपूर
२) अश्वत्थामा आश्रमशाळा, राजबर्डी
३) एस्. व्ही. ठकार माध्यमिक विद्यालय, धडगाव
४) नरेंद्र नवोदय छात्रालय, वडफळचा
५) बाळासाहेब खेर छात्रालय, मुंदलवाड
६) आदिवासी छात्रालय, सिसा
७) कस्तुरबा कन्या छात्रालय, सिसा
८) आदिवासी छात्रालय, मुंगबारी
९) कै. दयाराम पटेल आदिवासी छात्रालय, लोणखेडा

श्री. जनार्दन वळवींसारखा तळमळीचा व सचोटीचा अध्यक्ष संस्थेस लाभला आहे. संस्थेतील अनेक कर्मचाऱ्यानीही चांगल्या पगाराच्या सरकारी नोकरीच्या नेमणुका नाकारून संस्थेतच काम करण्याचे सेवाभावी व्रत अंगीकारले आहे. तथापि आश्रमशाळा-वसतिगृहासारख्या खर्चिक बाबींच्या आर्थिक जबाबदाऱ्या सांभाळताना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची फार ओढाताण होत आहे. मुख्य कार्यावर त्याचा अपरिहार्य परिणाम होत आहे. आदिवासी समाजाच्या शैक्षणिक कामाबद्दल आस्था असणाऱ्या दानशूर व्यक्ती व संस्थांकडून आर्थिक सहाय्याची अपेक्षा आहे. निधी उभारण्याच्या आधुनिक तंत्रात वाकबगार असणाऱ्यांचे मार्गदर्शन हवे आहे.

आपली शैक्षणिक संस्था कोणत्याही राजकीय चढाओढीत गुरफटली जाऊ नये याबाबत संस्थेचे कार्यकर्ते जागृत आहेत.

## हा का रा....

(१) आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

(२) कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण

(३) शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडविणे

(४) मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे

(५) मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या सर्व उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशांचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. या कार्यात आपणही सहभागी होऊ शकता. मानव विज्ञान परिषदेचे सदस्य आणि हाकाराचे वर्गणीदार होऊन ! मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व—

| | |
|---|---|
| आजीव सभासद | १०० रुपये |
| सभासद | १० रुपये वार्षिक |
| विद्यार्थी सभासद | १० रुपये वार्षिक |
| आणि | |
| हाकाराची वार्षिक वर्गणी | १२ रुपये |

आपली सदस्यत्व फी आणि वार्षिक वर्गणी कृपया

महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषद
मानवशास्त्र विभाग
पुणे विद्यापीठ, पुणे (४११ ००७)

या पत्त्यावर शक्य तेवढ्या लवकर पाठवा.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

# 'भूमिसेना झिंदाबाद

तरुण भावा बहिणींनो,

आपण ठरविलेले आहे की यापुढे गुलामासारखे जगायचे नाही. माणसासारखे ताठ मानेने जगायचे. सावकाराची बाकी काढून गुलामीत जगण्यापेक्षा स्वतंत्र व सुटे राहिलो तरच आपली एकी पक्की होऊ शकेल.

म्हणूनच जुन्या रितीने भरमसाठ खर्च करून गडी झालो तर गुलामासारखे जगावे लागेल.

एकाच दिवशी, एकाच वेळी एकदम लग्ने लावू.

ती सुद्धा कमी खर्चात करू या.

फक्त ३० रुपयांत लग्न करू. जादा खर्च नको.

१५ रु. नवरा
१५ रु. बायको

फक्त ३० रुपये.

तारीख : मंगळवार, १२ फेब्रुवारी १९८०

सकाळी १२ वाजतां : ठाकूरपाडा, सफाले

दुपारी ३ वाजता : आदिवासी (बस स्टॉप)

सूचना : दारू व ताडी पिऊन कार्यक्रमास येण्यास बंदी आहे.

भूमिसेना कचेरी, मनोर येथे ५ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करावी.

## कर्ज काढू नका। गडी राहू नका॥

[ भूमिसेनेतर्फे प्रकाशित पत्रक ]